# लोक-जीवन

१९५२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ९५७

अनुक्रम
दि
क्र
नं. दि.

काका कालेलकर

REFBK-0007762

नवजीवन प्रकाशन मंदिर
अहमदाबाद

# लोक-जीवन

काका कालेलकर

अनुक्रम ७७६१५
विभाग मा.जी.
क्रमांक
नों. दि.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ७७६२

REFBK-0007762

नवजीवन प्रकाशन मन्दिर
अहमदाबाद
१९५२

मुद्रक आणि प्रकाशक
जीवणजी डाह्याभाअी देसाअी
नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद – ९

सर्व हक्क प्रकाशक संस्थेच्या स्वाधीन आहेत.

संक्षिप्त आवृत्तिः प्रति २,०००

किंमत रु. १–४–०

डिसेम्बर, १९५२

# लोकजीवनाची विचारसरणी

अनुक्रम १७५९१ विभाग


समाज रूढीवादी सनातन वृत्तीचा जरी असला, तरीहि लोकजीवन स्थिर राहूं शकत नाहीं. 'जें जात असतें तें च जग' अशी जगाची व्युत्पत्ति आहे. जाणें, चालत असणें, बदलणें, रूपांतर करणें, हें च जगाचें खरें स्वरूप आहे. म्हणूनच 'सनातन' शब्दाची मला नवी व्याख्या करावी लागली. पाणी वाहत असतें तोंवरच तें ताजें असतें असें पाहून मीं व्याख्या बसविली कीं जें नित्यनूतन असतें तें च सनातन होऊं शकतें.

'अुच्च' वर्णी लोकांनीं स्वतःला शास्त्र आणि रूढी यांच्या दोरखंडानीं बांधून घेतलें आणि स्वतःची समजूत करून घेतली कीं आपण आतां स्थिर झालों. पण फरसबंदी अिमारतींत देखील ज्याप्रमाणें वडापिंपळांचीं मुळें शिरतात, त्याप्रमाणें जीवनचैतन्य रूढीबद्ध समाजांत देखील शिरून त्याचे दगड ढिले करते. शिष्ट समाजाची ही दशा, मग लोकजीवनाविषयीं काय सांगावयाचें !

कालबलाने आजचें समस्त राष्ट्रीय जीवनच झपाट्याने बदलत चाललें आहे. समाजसत्तावाद हळू हळू आपल्या देशांत देखील अंमलांत येअू राहिला आहे. आणि ते यथायोग्य आहे. सरकार मार्फत आपण जी कांहीं सुधारणा घडवून आणू ती समाजसत्तेच्या दिशेनेंच जाणार यांत शंका नाहीं. आणि कित्येक सुधारणा बघतां बघतां रूढि अितक्याच शिळया होणार.

अशा स्थितींत अि० स० १९३४ साली लिहवलेली लोकजीवनाची ही मीमांसा आज कालग्रस्त झाल्यास मुळींच आश्चर्य नाहीं. तसें खरोखर झालें असतें तर त्या पुस्तकाची ही संक्षिप्त आवृत्ती काढण्याला मी संमति दिली नसती. या लेखमालेंत समाज-रचनेपेक्षां समाज-

मानसाला अधिक महत्त्व दिलें आहे आणि येथें शहरापेक्षां खेड्यांचा प्रामुख्याने विचार केला आहे. या दोन्हीं कारणांमुळें या लेखमालेतील विचारसरणी आजहि चिंतनीय वाटेल असा विश्वास आहे. "हिंडलग्याचा प्रसाद" या नांवानें ही लेखमाला प्रथम प्रगट झाली होती. त्यातीलच कांही लेख पसंत करून माझे मित्र श्री वामनराव चोरघडे यांनीं ही संक्षिप्त आवृत्ति तयार केली आहे. मराठीतील माझें हें मौलिक लिखाण आहे, याचें त्यांना महत्त्व वाटून त्यांनीं या लिखाणाचें शुद्धलेखन कसोशीने तपासलें आहे.

आपलें सामाजिक जीवन आणि स्वराज्य मजबूत करण्यासाठीं लोकजीवनांत काय काय फेरफार केले पाहिजेत आणि लोकजीवन कोणच्या सामाजिक सिद्धान्तांवर अवलंबून आहे याचा विचार करीत असताना ही लेखमाला थोडीबहुत अुपयोगी पडेल अशा विश्वासाने ही येथें प्रकाशित केली जात आहे.

बेळगाव जवळील हिंडलग्याच्या जेलमध्यें लोकजीवनाची ही चर्चा चालू होती, त्याच काळीं संपूर्ण महाभारत वाचून काढलें होतें. त्यावेळची अेक नोंद या लेखमालेच्या शेवटीं दिली आहे. वाचकांना ती रोचक वाटली आहे.

नवी दिल्ली,
१–१२–'५२

काका कालेलकर

# अनुक्रमणिका


लोकजीवनाची विचारसरणी ३
१ ॐ नमो नारायणाय पुरुषोत्तमाय ३
२ धर्मसंस्करण ६
३ जातिधर्म व कुलधर्म १४
४ जातीजातींतील संबंध १८
५ सामाजिक रिवाज ३३
५ ग्रामव्यवस्था ४०
७ सत्तेचे स्वरूप ४१
८ खेडयांतील पक्ष ४२
९ दारिद्र्य ४४
१० कर्ज ४९
११ व्यसनें ५६
१२ अुधळपट्टी ६१
१३ सावकार ६३
१४ कोर्टबाजी ६८
१५ पंचायत अथवा लवाद ७३
१६ मजूरवर्ग आणि बेकारी ७७
१७ लोकशिक्षण ८१
१८ औद्योगिक शिक्षण ९३
१९ खेडेगांवांच्या पुनरुज्जीवनाचे मुद्दे ९८
२० महाभारताचा आस्वाद १०७


—— ० ——

# लोक-जीवन

महालय ठाणे
७७६२
अनुक्रमांक ५५५१२
विभाग
क्रमांक
नों. दि. ७।१।१

# ॐ नमो नारायणाय पुरुषोत्तमाय

अुच्च आशयाच्या समाज-सेवकाचा हा ध्यान-मंत्र आहे. मनुष्य-समाजाच्या धार्मिक अुपासनेची आधुनिक, शास्त्रशुद्ध आणि अत्यंत अुन्नत अशी पायरी वरील मंत्रामध्ये व्यक्त होते.

नारायण म्हणजे मनुष्यसमाजाच्या हृदयीं वास करणारें अंतर्यामी परमात्मतत्त्व. याची व्युत्पत्ति अशी आहे. नर म्हणजे मनुष्य; यांत स्त्रीपुरुषादि सर्व आले. या सर्वांचा त्रिकालव्यापी असा जो समूह अथवा समाज त्याला नार असें म्हणतात. नार म्हणजे समस्त मनुष्य-कोटी, मानव्य. मागे होअून गेलेले, आज असलेले व पुढे होणारे सर्व मनुष्यप्राणी ज्याच्यामध्ये अंतर्भूत होतात अशा सनातन मनुष्यजातीला नार म्हणतात.

हें नार ज्याचें अयन म्हणजे आश्रयस्थान झालें तो, मनुष्यहृदयांत अखंड व्यक्त होणारा परमात्मा, नारायण या नांवाने ओळखला जातो. या विश्वामध्ये जें कांही जडत्व भासतें तें नश्वर आहे, निःसार आहे. साररूप, सनातन, शुद्ध आणि नित्य आणि म्हणूनच अन्वेष्टव्य, मृग्य आणि प्राप्य असें जें नारायणतत्त्व त्यालाच जीवनाचें ध्येय करावें, त्याच्यासाठीच आणि त्यांतच जगावें. अशी दृढ निष्ठा ठेवणारा बलवान युवान भक्त सत्याग्रही प्रल्हाद हा नारायणाचा अुपासक असल्याने नारायण या नांवाबरोबर सत्याची वीर्ययुक्त अनन्य अुपास-नाहि ध्यानांत येते. प्रत्येक नराने म्हणजे स्त्री-पुरुषाने जीवनसाधनेच्या द्वारें अंतीं नारायणरूप व्हावयाचें आहे असें प्राचीन व अर्वाचीन

महात्मे सांगत आले आहेत. नारायणाचें ध्यान करणें म्हणजे नरजन्माचें अंतिम अुद्दिष्ट अथवा ध्येय अखंड लक्षांत बाळगणें होय. नराचा अंतिम आणि अनंत विकास हेंच तें नारायणतत्त्व.

ही स्थिति आज आपल्याला प्राप्त झालेली नाही. पण शक्य त्या अुपायांनी, शक्य तितक्या त्वरेने ही स्थिति प्राप्त करून घ्यावयाची आहे, याची स्मृति आणि साधना 'नमः' शब्दाने व्यक्त होते. नदी ज्याप्रमाणे सागराकडे वाहते त्याप्रमाणे अपूर्णाने पूर्णाकडे वाहणें यालाच 'नमस्कार' म्हणतात.

पुरुष म्हणजे नवद्वाराच्या या पुरांत अर्थात् देहांत शयन करणारा, राहणारा, वास करणारा आत्मा, साधनाक्षम असा जीव. स्त्री आणि पुमान् दोहोंचा यांत समावेश होतो. दिवस या शब्दांत ज्याप्रमाणें दिवस आणि रात्र या दोहोंचा समावेश होअू शकतो अथवा पितर या शब्दांत पिता व माता या दोहोंचा समावेश होतो त्याचप्रमाणें 'पुरुष' शब्दांत पुरुष आणि स्त्री या अुभयांचा समावेश होतो. हा पुरुष व्यक्तिरूपानें अेका देहांत राहतो; हाच समाजरूपाने त्रिकालव्यापी समुदायांत असतो; आणि विराटरूपाने सर्व विश्वांत असतो. व्यक्तीमध्ये ज्याप्रमाणे आपण याला 'पुरुष' रूपाने पर्सनॅलिटी म्हणून ओळखतों त्याप्रमाणे सर्व विश्वांत सूर्यचंद्रादि ग्रह-नक्षत्र-तारा यांच्या समुदायांत देखील पुरुषरूपानेच त्याला पाहिलें पाहिजे. मनुष्यसमाजाचा विचार करितांना देखील समष्टिरूपाने तो अेक पुरुष आहे हें आपण ओळखलें पाहिजे.

'पुरुष अेवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम्।' विविधवर्णात्मक मनुष्यसमाज हाहि अविकल पुरुषच होय. या पुरुषाच्या क्षर आणि अक्षर अशा दोन बाजू आहेत. भूतरूपाने पाहतां हा क्षर आहेसा दिसतो. त्यांतील कूटस्थ तत्त्वांचा विचार करितां तो अक्षर आहे असें अुमगतें. या क्षराक्षराची सर्व साधना ज्या आदर्शाला सिद्ध करूं पहात आहे त्या पुरुषतत्त्वाच्या अंतिम भूमिकेला 'पुरुषोत्तम' असें नांव आहे.

आजचा मनुष्य अपूर्ण आहे, असम आहे आणि सदोष आहे. आजचें विश्व अपूर्ण आहे, असम आहे आणि सदोष आहे. याला पूर्ण, सम आणि निर्दोष अर्थात् भूमा आणि बृहत् व्हावयाचें आहे म्हणजे पुरुषोत्तम व्हावयाचें आहे. विराट पुरुषाचा हा जो अंतिम आदर्श तोच पुरुषोत्तम. आत्मौपम्याच्या द्वारां विश्वात्मैक्याचा साक्षात्कार केला तरच हें पुरुषोत्तम पद प्राप्त होणार. म्हणून विश्वात्मैक्य हाच पुरुषाचा 'पुरुषार्थ'. मोक्ष हें विश्वात्मैक्याचें केवळ प्राथमिक साधन आहे. धर्म-अर्थ-काम ही त्रयी पुरुषाला ज्या मानाने मोक्षाकडे घेऊन जाणार त्या मानाने तिलाही उपलक्षणेने पुरुषार्थ म्हणावयास हरकत नाही. पुरुषोत्तमप्राप्तीसाठी पुरुषाने जी साधना करावयाची, जो पुरुषार्थ करावयाचा, जो निरलस अखंड आणि वर्धमान पराक्रम करावयाचा तो 'नमः' या शब्दाने व्यक्त केला आहे.

या सर्वांचें आद्य कारण अथवा मूळ आधार अशी आस्तिक्यरूपी जी श्रद्धा तिलाच 'ॐ' असें नांव आहे. 'ॐ' म्हणजे 'होय'. जेथे नकाराला, निषेधाला, अभावाला, अश्रद्धेला, तिळमात्र स्थान नाही त्या पदवीला, त्या वृत्तीला, त्या श्रद्धेला 'ॐ' असें म्हणतात. ॐ ही अजरामर आणि अखंड अशी आस्तिकता आहे. माझें जीवन सत्यरूप आहे, त्याचा अंतिम आदर्श सत्यरूप आहे, त्या आदर्शाला पोहोचणें शक्य आहे; या पोहोचण्याची यात्रा अथवा साधना कृतार्थ होण्याला समर्थ आहे असा जो दृढ विश्वास तोच हा ॐकार होय. सच्चिदानंदरूपी प्रभूहून तो भिन्न नाही. म्हणून त्याच्या स्मरणपूर्वकच सर्व ध्यान चालावयाचें असतें आणि ध्यानपूर्वकच सर्व साधना म्हणजे पराक्रम व्हावयाचा असतो आणि ही साधना जसजशी सिद्ध होत जाईल, ध्येयाचा जसजसा साक्षात्कार होत जाईल तसतसा प्राप्तीचा आनंदहि या मंत्रानेच व्यक्त व्हावयाचा असतो. हा सर्व हेतु मनांत धरूनच या मंत्राचा सरहस्य जप सांगितला आहे.

# २

# धर्मसंस्करण

मानवी जीवनाचा साकल्याने विचार करणारा जर कोणी असेल तर तो धर्म आहे. जीवनाचें स्थायी अथवा अस्थायी असें अेक हि अंग नाही कीं ज्याचा धर्माला विचार कर्तव्य नाहीं.

म्हणून धर्म हा मनुष्याच्या सनातन जीवनाअितकाच अथवा त्याहून अधिक व्यापक असला पाहिजे आणि अशेष जीवन हें त्याचें क्षेत्र असल्याने तो अत्यन्त अुत्कटपणे आणि परमार्थतया जिवंत असला पाहिजे.

आज जगामध्यें जे प्रख्यात धर्म आहेत ते सर्व बऱ्याच अंशाने असे व्यापक आहेत. स्थापनाकाळीं तर ते जिवंत होतेच पण वेळो-वेळीं धार्मिक पुरुषांनी स्वतःच्या तपस्येनें व नव विचारानें धर्माचा जिवंतपणा पुनः पुनः साधलेला आहे. शेगडींतील विस्तव जसा स्वभावें करून पुनः पुनः मंद होतो आणि म्हणून त्याला वारंवार कोळसे पुरवून आणि वेळोवेळीं फुंकर घालून त्याचें संस्करण करावें लागतें, त्याला जागृत ठेवावें लागतें, त्याचप्रमाणे धर्मतेज समाजांत जागृत ठेवण्यासाठीं त्याला पोषण आणि फुंकर घालण्याचें काम धर्मपरायण समाजपुरुषांना करावें लागतें. हें काम जर वेळोंवेळीं न झालें तर धर्मजीवन क्षीण व विकृत होत जातें; आणि धर्माचें क्षीण व विकृत स्वरूप अधर्माअितकेंच बाधक असतें. धर्मतेज जिवंत व प्रज्वलित राखण्याचें काम धर्मैकपरायण व्यक्तीच्या हातूनच होत असतें. ही शक्ति धर्मग्रंथामध्ये नाही, धार्मिक रिवाज किंवा संस्कारांमध्ये नाही, धार्मिक संस्थामध्ये नाही आणि धर्माला टेका देणाऱ्या राज्यव्यवस्थेंतहि नाही. शास्त्रग्रंथ, संस्कार, रिवाज आणि

धार्मिक व राजकीय संस्था यांचा धार्मिक जीवनाला कमी अधिक प्रमाणानें अुपयोग आहे. धार्मिक वातावरण स्थिर करण्याच्या कामीं यांची सेवा बहुमोल आहे. पण मूळशक्ति धर्मप्राण अशा ऋषींची व संतांची आणि महात्म्यांचीच होय. धर्माचा अंतिम आधार मनुष्यहृदय आहे. 'धर्मशास्त्रं महर्षीणां अंतःकरणसंभृतम्' असें जें अुपनिषदांत म्हटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे.

धर्मजिज्ञासा आणि धर्माचार हा मनुष्याचा स्वभावच आहे व म्हणून सर्वकाळीं व सर्वदेशीं अुन्नतीच्या पायरीप्रमाणें मनुष्यहृदयांत धर्माचा आविर्भाव होतच असतो. हा हृदयधर्म कितीहि कलुषित असला, मलिन असला तरी मूळ वस्तु शुद्ध आहे. अशुद्ध सोनें म्हणजे कांही पितळ नव्हे आणि पितळ कितीहि शुद्ध, लखलखीत आणि घोटीव असलें तरी त्याला सोनें म्हणतां येत नाही. केवळ बुद्धीच्या जोरावर जमवलेला, लोकांमधील रागद्वेषांचा फायदा घेअून चालू केलेला आणि थोडचा अथवा अधिक सामर्थ्यशाली लोकांच्या स्वार्थाला पोषण देणारा धर्म तो धर्म नव्हे. असंस्कारी हृदयांतील क्षुद्र वासना आणि दंभामुळे अुत्पन्न होणारी विकृति यांवर झांकण घालणारा शिष्टाचार आणि चातुर्याच्या तर्कानें केलेला त्याचा बचाव हाहि धर्म नव्हे. अज्ञान म्हणजे अल्पज्ञान, भोळसटपणा आणि अंधश्रद्धा यामुळे कलुषित झालेला धर्म अधर्माच्या कोटीला पोहोचला असला तरी ती वस्तु निराळी आणि मुळांतच जो धर्म नव्हे पण केवळ शिताफीनें धर्माचें रूप धारण करणारी वस्तु ती निराळी. मानवी अितिहासांत वरील दोन्ही प्रकार मुबलकपणानें सांपडण्याअितका मनुष्यसमाज परिणत झाला आहे; पण या दोन्ही वस्तूंचें पृथक्करण करून त्याचें यथार्थ स्वरूप ओळखण्याची तसदी मनुष्यानें अजून घेतली नाही.

हृदयधर्म जेव्हा बुद्धिप्रधान लोकांत आपलें कार्य करूं लागतो, शिष्टमान्य होतो आणि त्यामुळे जेव्हां धर्माचें संस्थीभवन होतें, तेव्हा शास्त्रें निर्माण होतात; शास्त्राचा अर्थ लावणारी मीमांसा अुत्पन्न

होते; आणि अंतिम निर्णय देणारा शास्त्रज्ञांचा वर्ग तयार होतो, अथवा अेखादी अधिकारारूढ व्यक्ति स्वीकारण्यांत येते.

धर्माचें शास्त्रग्रथन आणि संस्थीभवन हें व्यवहारज्ञ आणि बुद्धि-प्रधान अशा लोकांकडून होत असल्याने त्यायोगें धर्माची स्वाभाविक भविष्योन्मुख दृष्टि क्षीण होते आणि तीवर भूतकालाचींच पुटें जडतात. भूतकालामध्ये अग्नीपेक्षां राख अधिक असल्याने धर्मतेज गुदमरून जातें हें निराळें सांगावयास नको. म्हणूनच दरेक धर्माला संस्करणाची आवश्यकता असते.

तुकारामबोवा बाजारांत जाअू लागले म्हणजे गांवच्या अनेक लोकांनी त्यांच्या सज्जनतेचा फायदा घेअून तेल आणण्यासाठीं आपापली तेलाची नळकांडीं त्यांच्याकडे सोपवावीं, व त्यांनीहि संतोषाने अशा नळकांड्यांची वजनदार माळ गळयांत घालून सांगितलेलें काम नियमित करावें. जनस्वभाव हा असाच आहे. मुलें अथवा लोक अेखाद्याचें मुकाट्याने अैकतात असें पाहिलें कीं, मन वळविण्याचें काम त्याच्या मार्फतच करून घेण्यास अैतोबांचा जनसमाज प्रवृत्त होतो. अेखादें जहाज नियमितपणे आणि वेगाने अिष्ट मुक्कामीं जात असलें तर त्याचा वेग क्षीण होअीतोंपर्यंत आणि तें बुडण्याची पाळी येअीतोंपर्यंत त्यांतच आपला माल भरण्याचा आग्रह लोकांमध्ये दिसून येतो. धर्माची सार्वभौम शक्ति पाहून दरेक लोभ्याने आपापल्या लोभांचें कार्य कोणत्याना कोणत्या रूपाने धर्माच्या गळयांत बांधलेंच आहे. या कारणामुळे देखील धर्मतेज वारंवार क्षीण होतें.

अेखादें चालतें दुकान आपली भरभराट कायम टिकावी आणि वाढावी यासाठीं ज्याप्रमाणे वेळोवेळी जुना व कुचकामाचा होअू पहाणारा माल काढून टाकतें आणि चांगला माल जर पडून पडून विघडला असेल तर तो अुजळून काढतें त्याप्रमाणे धर्मांनी वेळोवेळीं स्वतःचें संस्करण केलें पाहिजे. मात्र हें संस्करण खरें सोनें कोण-त्याहि रूपांत पारखण्याची आणि संभाळून ठेवण्याची शक्ति ज्यांच्या

मध्यें आहे अशा कुशल, धर्मज्ञ समाजसेवकांच्या हातूनच झालें पाहिजे. जगांत माजलेल्या बऱ्याचशा नास्तिकतेचें मूळ कारण धर्मसंस्करणाचा अभाव हेंच होय.

कोणताहि समाज म्हातारा किंवा क्षीणवीर्य होतो त्याचीं कारणें दोन : विलासिता आणि धर्मजडता.

समाज विलासी झाला म्हणजे असलेली साधनसंपत्ति त्याला पुरेनाशी होते; पुरुषार्थ आपोआप कमी होतो; 'यांत काय आहे, त्यांत काय आहे, कशांत कांहींच नाहीं,' अशा प्रकारचें नैष्कर्म्य व अेक प्रकारची झोंपाळू जडता समाजांत येते. मग नवा नवा अनुभव घेअून तो पारखण्यास तयार होण्याच्या अैवजीं जुन्या विषयींचा कृत्रिम आदर आणि आग्रह वाढून तें ढाल म्हणून पुढे केलें जातें.

दुसऱ्या बाजूने मनुष्यामध्ये जेव्हा बौद्धिक जागृति मंद पडते, प्रयोगापेक्षा प्रामाण्यावरच भिस्त ठेवण्याची वृत्ति वाढते तेव्हा समाजांत अेक प्रकारचें धर्मजाड्य अुत्पन्न होतें. हें धर्मजाड्य दिसण्यांत धर्माभिमानासारखें दिसतें पण वस्तुतः ती अेक प्रकारची नास्तिकताच असते. अभिमान आणि आग्रह यांच्या मुळाशी खरा आदर किंवा खरी श्रद्धा असतेच असा अनुभव नाही.

आज हिन्दुस्थानांत खेडेगावांतील समाजाची असाधारण दुर्दशा आहे. शहरांतून परदेशी माल व चैनीच्या वस्तु खेडेगावांत पोहो-चतात पण अुद्योगधंदे खेडेगांवांत पोहोचत नाहीत. शहरी अुधळ-पट्टी, असंस्कारिता व अितर समाजविनाशक दुर्गुण खेडेगांवांत झपा-ट्याने पसरूं लागले आहेत. पण शहरांत जी धर्मविचाराची जागृति, राजकीय प्रगति आणि समाजसुधारणा थोड्या फार अंशाने दिसतात, त्याचें लोण खेडेगांवांपर्यंत फारच थोड्या प्रमाणाने पोहोचतें. ज्या हिंदु धर्माने व आर्य तत्त्वज्ञानानें आपण जगाचे डोळे आज दिपवीत आहोंत, तो धर्म व तें तत्त्वज्ञान कोणत्या रूपाने आजच्या खेड्यांतील समाजांत नांदत आहे हें पाहिलें असतां 'नेदं यदिदमुपासते' असेंच

म्हणावें लागेल. खेडेगांवामध्यें खरीखुरी धर्मनिष्ठा, पवित्र आस्तिकता, व अुच्च चारित्र्यसंपत्ति अगदी परवां परवांपर्यंत होत्या, आजहि त्यांचे अवशेष दिसून येतात; पण अशुद्धि, जडता आणि नास्तिकता यांचें साम्राज्य खेडेगांवांतून सार्वत्रिक होअू पहात आहे. यामुळे शहराच्या मानानें खेडेगांवच्या समाजांत वार्धक्य अधिक दिसून येतें. खेडेगांवांत अज्ञान आहे, अनारोग्य आहे आणि दारिद्र्य आहे. हीं तीन दूर न केलीं तर खेडेगांवांतील समाज आतां जगणेंच शक्य नाहीं. पण ज्ञान, आरोग्य आणि अुद्योग हीं लोकांवर वाहेरून कितपत लादतां येणार ? लादण्याच्या अुपायाला स्वाभाविक मर्यादा आहेत. या गोष्टी लोकांनी स्वेच्छेनेच स्वीकारल्या पाहिजेत आणि स्वेच्छेने स्वीकारण्यास समाजाचें वार्धक्य प्रथम गेलें पाहिजे. समाजांत अुत्साह व अुत्थान हीं आलीं पाहिजेत. धर्मसंस्करणावांचून ही गोष्ट होणें नाहीं. म्हणून अितर सर्व गोष्टींच्या आधीं खेडेगांवांतून धर्मसंस्करणाचा यथायोग्य प्रयत्न झाला पाहिजे.

खेडेगांवांतून जो धर्म मानला किंवा पाळला जातो त्यामध्ये भीति, लालूच, दैववाद आणि जादूवजा कर्मकांड हेंच मुख्य असतें. मग तो धर्म हिंदूमध्यें नांदत असो, मुसलमानांत असो अथवा खिस्ती लोकांत असो. खेडेगांवांतील लोकांना स्वतःच्या दुर्बळतेची, अज्ञानाची, भोळसटपणाची, आणि अनाथ स्थितीची अितकी कांहीं कटु — अनुभवमूलक जाणीव असते कीं स्वभावतः ते शक्तिअुपासक होतात — मग ते अहिंसावादी जैन असोत कीं शिवतत्त्वाचे अुपासक लिंगायतहि असोत. या अज्ञानमूलक शक्तिपूजेचा जादूवर विश्वास बसतो आणि जादूला धर्माची प्रतिष्ठा मिळते. धर्म म्हणजे जबरदस्तांची आराधना अथवा विकत घेतलेली राखण असा अर्थ सामान्य जनतेमध्यें होअून बसला आहे. धर्माच्या योगानें मांगल्यावरील श्रद्धा वाढवावयाची असते; चारित्र्याची तेजस्विता स्वाभाविक करावयाची असते; अैहिक अनुभवांत पदोपदीं जो विषाद प्राप्त होतो तो दूर

१५१९४ ता. १७ १९५१

करणारें दैवी आश्वासन मिळवावयाचें असतें आणि जीवनांतर्गत प्रत्येक तत्त्वाचें नवीन दृष्टीने नवीनच मूल्य करावयाचें असतें. सफळतेची व निष्फळतेची कल्पनाचं बदलून या भौतिक जगांत आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवावयाचें असतें.

तात्त्विक विवेचनाच्या दृष्टीनें हें दृष्टयंतर फारच अवघड वाटतें पण हृदय हृदयाशी बोलूं लागलें म्हणजे अुन्नत भूमिकेचें आमंत्रण तेथे सरळ जाअून पोहोचतें अथवा भिडतें आणि अेकदा हृदयांत असें परिवर्तन झालें म्हणजे कांही केल्या त्यानें माघार घेणें शक्य नसतें. हें आमंत्रण देणाऱ्या व्यक्तीच्या हृदयांत कोणाच्याही सम्बंधाने तुच्छ भाव नसावा. आपलें आमंत्रण अमोघ आहे अशी अमर आस्तिकता असली पाहिजे आणि मनुष्यमात्राच्या हृदयाविषयीं प्रेम आणि आदर असला पाहिजे.

धर्मज्ञान देतां घेतांना ग्रहण करणाऱ्याच्या अधिकाराविषयीं आजवर बेसुमार चर्चा झाली आहे. धर्मज्ञानाचें दान करणाऱ्याच्या अधिकाराचा अूहापोह करण्याचे दिवस आता आले आहेत. वर वर्णिलेली आस्तिकता असेल त्यानेच धर्मबोधाचें व धर्मसंस्करणाचें काम हातीं घ्यावें.

धर्मांधतेच्या रूपाने खेडेगांवांतून आज नास्तिकता किती पसरली आहे याची बरोबर कल्पना झाल्यास मनाला आघातच पोहोंचावा.

प्रत्येक धर्मांत मुबलक काव्य सांठविलेलें असतें. खरें पाहूं जातां धर्मज्ञानाचें वाहन युक्ति आणि तर्क नसून काव्यच आहे. म्हणून काव्य-विहीन धर्म असूंच शकत नाही. पण जेथे समाजांत अज्ञान आणि जडता यांचें साम्राज्य असतें तेथे धार्मिक काव्याचा शब्दार्थ खरा मानला जातो आणि स्वतःच्या अज्ञानामुळे नाही तेथेहि गूढतेचें व जादूचें आरोपण केलें जातें. या वृत्तीहून धर्मविघातक दुसरी अेकादी वृत्ति असेल कीं काय याविषयीं शंकाच आहे. अुलटपक्षीं धर्मवेडाची ज्याना चीड वाटते असे लोक अशा प्रसंगीं धर्मांत असलेलें काव्य पुसून टाकण्याचा निरर्थक आणि निष्फळ प्रयास

करितात. खरा अुपाय म्हणजे लोकांची बुद्धि तीव्र करून आणि लोकांमधील काव्यरसिकता जाणती करून काव्य वाढविलें पाहिजे. लोकांची काव्यशक्ति वाढविली म्हणजे त्यांना धर्म समजणें सोपें जातें आणि धार्मिक भोळ्या समजुती सहज ओळखतां येतात.

पण हें सर्व करण्यास जाणत्या लोकांनी खेडेगांवांतील लोकांच्या श्रमपूत व निसर्गमधुर अशा दैनिक जीवनामध्ये ओतप्रोत झालें पाहिजे. 'स्वामी गोसावी' होअून चालावयाचें नाही.

कोणताहि समाज युगकल्पनेच्या दृष्टीने मागे राहून कधीहि निभावयाचा नाही. आजचें युग केवळ मानवी समानतेचें नाही. स्त्री-पुरुषांची समानता, जातीजातींची समानता आज कबूल केलीच पाहिजे अेवढेंच नव्हे तर सर्व धर्मांना समान दर्जा मिळाला पाहिजे. सर्वच धर्मांविषयीं सारखा अनादर अथवा सारखी अनास्था, अथवा सारखेंच अज्ञान हा अेक समानतेचा मार्ग मानला जातो, पण तो घातक आहे. आजच्या युगांत समाजांत राहणाऱ्या प्रत्येक मनुष्यास जगांतील प्रमुख प्रमुख धर्मांची सामान्य माहिती असली पाहिजे. मात्र ही माहिती देतां घेतांना तार्किक, चिकित्सक अथवा केवळ अैतिहासिक दृष्टि असतां कामा नये. प्रेम, आदर आणि सहानुभूति यांसहित डोळस जिज्ञासा-बुद्धीने सर्व धर्मांचा परिचय झालेला असावा. खेडेगांवांतील धर्मज्ञान बरेंच मागासलेलें असतें; दृष्टि संकुचित असते; आणि जीवनाचा आशय फारसा अुन्नत नसतो. अशा वेळीं विशेष प्रेमाने जगांतील निरनिराळया धर्मांतील सत्पुरुषांनी आणि चारित्र्यपरायण संतांनी चालविलेल्या प्रयत्नांची माहिती करून दिली पाहिजे. मात्र येथें अुद्देश धर्मजागृति हा असावा. केवळ बहु-श्रुतता किंवा पंथ-प्रचार हा नसावा.

आजच्या समाजांतील अेक महान् दोष म्हणजे वर्ग-विग्रह हा होय. लोकांना अीर्ष्या, द्वेष, मत्सर करावयास अेकादी ध्यानमूर्ति हवी असते. स्त्रियांनी पुरुषांविरुद्ध तक्रार करावी, युवानांनी वृद्धांविरुद्ध.

गरीबांनी श्रीमंतांविरुद्ध, हिंदुमुसलमानांनी परस्परांविरुद्ध, गोऱ्या लोकांनी काळ्या व पिवळ्या लोकांविरुद्ध; सर्वत्र असें विग्रहाचेंच वातावरण आहे. थोड्याअधिक लोकांचें संघटन करून त्यांचा पुढाकार मिळवावयाचा असल्यास त्या सगळ्यांची द्वेषबुद्धि केंद्रित करून त्यांच्या द्वेषाला अेक ध्याननूर्ति देअून टाकावी आणि संशयाचें वातावरण अुत्पन्न करावें म्हणजे झालें.

हा रोग धर्मामध्ये फार लवकर शिरूं शकतो. या दिशेने प्रयत्नहि जोरकस चालू आहेत. यांचा परिणाम परस्परहत्या व अंतीं आत्महत्या हाच होणार ! आपण ज्या धर्मसंस्करणाचा विचार करीत आहोंत त्यामध्ये वरील रोगांपासून मुक्त रहाण्याची पुरी पुरी खबरदारी घेतली पाहिजे.

वाअीट गोष्टी काढून टाकतांना अेवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं त्या जागीं चांगल्या सात्त्विक भरीव गोष्टी अुभ्या केल्या पाहिजेत. केवळ शून्य पोकळी ही भयानक आहे.

व्यवहारकुशल लोक म्हणतील कीं हें सर्व विवेचन सुंदर आहे, अुद्बोधक आहे, पण येथे योजना अशी मुळीच दिसत नाही.

राजसभेंत कायदे करतांना प्रथम कायद्याचा अुद्देश स्वीकारला जातो व मग कायद्याचीं कलमें येतात. पण व्यवहारांत हातांत कायद्याचीं कलमें आल्याबरोबर हेतु आणि अुद्देश गौण होअून विसरून जातात. समाजाला कलमबंदी योजनेची संवय झाली आहे. पण त्यायोगे जीवन यांत्रिक होतें. भावनेची जागा योजनेने कशी भरून निघणार ? भावनेचें क्षेत्र शिक्षणाने खुलतें. योजना सरते शेवटीं राज्यव्यवस्थेचें रूप धारण करते. येथे नमूद केलेलें परिवर्तन कोणत्याहि सत्तेच्या जोरावर व्हावयाचें नसून तें शिक्षणद्वारां आणि प्रत्यक्ष अुदाहरणद्वारां हृदयपरिवर्तन केल्याने व्हावयाचें आहे. यासाठी सार्वत्रिक योजना करून चालावयाचें नाही. भावना शुद्ध, सुरक्षित व जिवंत राहिली तर ती आवश्यकतेनुसार स्वतःची योजना अुत्पन्न करील आणि बदलत राहील.

३

# जातिधर्म व कुलधर्म

कुल आणि जाति या दोन संस्था प्रकृतिगत असल्याने स्वयंभू, स्वयंप्रेरित आणि सनातन आहेत, अर्थात् शाश्वत आहेत. दोहोंमध्ये रक्ताचा संबंधहि येतो. ज्यांचीं रक्तें अेक आहेत तें अेक कुल. ज्यांचीं रक्तें अेक होअू शकतात (विवाहसंबंधानें) ते अेक जाति. जन्मना जातिः।

कामविकाराची प्रेरणा, अपत्यैषणा, अपत्यवात्सल्य हीं या दोन्ही संस्थांच्या मुळाशी आहेत. समूह करून रहाणें, आणि समूहशक्तीच्या जोरावर जगणें, वाढणें, आणि विजय मिळविणें, (निसर्गावर अथवा परकीयांवर) ही वृत्तिहि या दोन्ही संस्थांच्या मुळाशी आहे. या सर्व वृत्ती प्राणिसहज (बायॉलाजिकल) आहेत म्हणूनच त्यांचें जतन करण्याचा फारसा प्रयत्न करावा लागत नाही. या वृत्ति आंधळ्या, जबरदस्त आणि स्वाभाविक आहेत. या जीवनाला पोषक आहेत पण त्यांना जीवनसाफल्याची कल्पना नाही. जीवनसाफल्याचा जेथे विचार सुरू होतो तेथेच जीवन संसृतीमध्ये संस्कृति (कल्चर) अुत्पन्न होते. या संस्कृतीच्या परिपोषासाठी आश्रमव्यवस्थेप्रमाणे वर्णव्यवस्थाहि निर्माण झाली आहे. वर्ण आणि जाति एक नव्हेत. जाति वर्णाचा पोटभेद आहे असेंहि नव्हे. या दोन्ही संस्था परस्पर संमिश्र असल्या तरी तत्त्वतः आणि स्वरूपतः परस्पर विभिन्न आहेत. जातिसंकर आणि वर्ण-संकर हेहि अेक नव्हेत. वर्ण हे संस्कृति-प्रधान आहेत.

आनुवंशिक संस्कार, कौटुंबिक जीवनांतील संस्कार, व कुलधर्मामध्ये आणि जातिधर्मामध्ये अुत्पन्न झालेलें ब्रीद-रूपी सांस्कृतिक तत्त्व

या सर्वांचा विचार करितां वर्णव्यवस्थेंत देखील जातीचें तत्त्व प्रादुर्भूत होणें अयोग्य नाही. पण केवळ जाति-तत्त्वाला प्राधान्य मिळतां कामा नये. वर सांगितलेल्या कारणांनी जातितत्त्व संस्कार-परंपरेला व विकासाला पोषक असल्याने जाति आणि वर्ण दोहोंना अेका प्रवाहांत नेअून सोडणें शक्य आणि शास्त्रशुद्ध आहे. पण या बाबतींत कडक नियम केल्याने मूळ अुद्देश मारला जातो.

समान भूमिकेवरील भिन्नभिन्न समाजांमध्ये मिश्रविवाहांना अुत्तेजन देण्याचा केव्हा केव्हा काळ येतो आणि केव्हा केव्हा होतां होअील तों मिश्रण टाळून पार्थक्य टिकवणेंच अिष्ट वाटूं लागतें. जेव्हां दोन समाज समकक्ष आणि तुल्यबल असतात आणि दोघांनी मिळून नवीन पुरुषार्थ करावयाचा असतो अथवा नवीन संस्कृतीला जन्म द्यावयाचा असतो तेव्हा समान आदर्श, समान विचारसरणी आणि समान पुरुषार्थ पाहून संमिश्रणाला अुत्तेजन देणें हेंच योग्य आहे. अुलटपक्षीं जेव्हा परस्पर परिचय नसतो अथवा फार थोडा असतो, दोन्ही पक्ष तुल्यबल नसतात, आणि अेक पक्ष दुसऱ्याच्या आहारीं पडण्याची भीति असते, तेव्हा तेजो-वधकारी संमिश्रण टाळणें हेंच अिष्ट असतें. अशा वेळीं पार्थक्याला महत्त्व दिलें पाहिजे. नेपोलियनचें लष्करी वाक्य येथें निराळया अर्थानें लागू पडतें, "वुअी युनाअिट टु स्ट्राअिक, अँड सेपरेट टु लिव्."

जगांतील विवाहसंस्थेचा अितिहास पहातां सर्व प्रकारच्या समाजांमध्यें जर महत्त्वाचें विचारसाम्य कोठें दिसून येत असेल तर तें या बाबतींत कीं सख्ख्या बाप-कन्येचा किंवा आअी-पुत्राचा किंवा भाअू-बहिणीचा विवाहसंबंध सर्वत्र निरतिशय निंद्य मानला गेला आहे. प्राचीनकाळीं अिराणांत, अुत्तर हिंदुस्थानांत आणि अन्यत्र भाअू-बहिणीचे विवाह होत असत, पण असे विवाह लौकरच सर्वत्र त्याज्य ठरले. आणि मनुष्यहृदयांत अशा विवाहासंबंधाने अतोनात घृणा कमावली गेली.

यापुढे जवळच्या नात्यांत विवाह करणें घातुक आणि निंद्य आहे हा विचार कमी अधिक प्रमाणानें सर्वत्र पसरला. या अभिप्रायाच्या मुळाशी अलिखित असा जबरदस्त आणि कटु अनुभव सार्वत्रिक असला पाहिजे. जवळच्या संबंधांत वैवाहिक प्रेम अुत्पन्न होअू शकत नाही, टिकूं शकत नाही. अुन्माद असला तर तो क्षणिक ठरतो, असें अनुभवास आलें आहे. मानसशास्त्रदृष्ट्या ही स्थिति झाली.

वैद्यकीयदृष्ट्या अतिजवळच्या विवाहाची प्रजा निःसत्त्व, भेकड, संयमशून्य, आणि मंद-बुद्धि अशी तयार होते आणि पुढे पुढे संतान-वृद्धिहि क्षीण होते असा अनुभव आला.

संस्काराच्या दृष्टीनें भिन्नकुळांतील संस्कारांचा जो अिष्ट संयोग अपत्यांना लाभला पाहिजे तो लाभत नाहीं. यामुळे कूपमंडूकवृत्ति अथवा सांचलेल्या तळयांतील कुजक्या पाण्याची स्थिति त्या कुटुंबाची होते.

आरोग्यदृष्ट्या भिन्न कुटुंबांतील विवाहापासून झालेली प्रजा आनुवंशिक रोगांशी झगडण्यास जशी समर्थ असते तशी अेक कुटुंबीय विवाहाची प्रजा समर्थ नसते.

सामाजिकदृष्ट्या अेक कुटुंब आंतल्याआंत विवाह करूं लागलें तर समाज म्हणून तयार होणें कठिण होअील. समाज म्हणजे पर-स्परावलंबन. हें योग्य मर्यादेंत जितकें व्यापक आणि विविध असेल तितका समाज जोमदार होणार. 'स्वात्मनि अेव समाप्त-व्याप्ति' अशी अेक कुटुंबी समाजाची स्थिति समाजशास्त्राला असह्य झाली पाहिजे.

शास्त्रधर्माच्या बाहेर असलेले, मागसलेले किंवा रानटी गणले जाणारे लोक देखील जवळच्या संबंधाचीं लग्नें निषिद्ध मानतात. अेकाच गांवांतील मुलेंमुली भावाबहिणीप्रमाणें समजलीं पाहिजेत. अशी समजूत पुष्कळ ठिकाणीं आहे. सामाजिक व्यवहार निर्धास्त आणि निश्चित चालण्यास देखील नजीकचे विवाह निषिद्ध असले

पाहिजेत. जेथें दिवसरात्र मोकळा व्यवहार असणें अिष्ट आहे तेथें जर घोटाळे होअूं लागले आणि त्याला विवाहाची मान्यता द्यावी लागली तर सामाजिक व्यवहार संकुचित आणि शंका-कलुषित होअील. अेका गुरूच्या हाताखालीं अेकत्रपणें संस्कार प्राप्त करणाऱ्या युवक आणि युवतींमध्यें भावा-बहिणीचेंच नातें समजलें पाहिजे, हा नियमहि या दृष्टीनें अिष्टच आहे.

धर्माची ही दृष्टि आणि ही मर्यादा आतां थोडीशी वाढविण्याचा प्रसंग प्राप्त झाला आहे. जातिबहुल हिंदुसमाजांत पोटजातींचें प्रस्थ फार माजलें आहे. हजार हजार किंवा त्याहून ही कमी कुटुंबांच्याच लहान लहान जाती पडणें हें सर्वथैव अनिष्ट आहे. आणि आज तर शंभर सव्वाशे कुटुंबांच्या जातीहि दृग्गोचर होतात. ज्याप्रमाणे शेतामध्यें वरचें पाणी खालीं वाहून जाअूं नये म्हणून लहान लहान वाफे वा गादे तयार करितात, त्याप्रमाणे गरीबांच्या सगळ्याच मुली श्रीमंत घरांत वाहून जाऊं नयेत म्हणून लहान लहान पोटजाती नव्याने निर्माण करण्याकडेहि गुजरात सारख्या प्रांतांत प्रवृत्ति आहे. मोठमोठीं ज्ञातिभोजनें करण्याचा खर्च पडूं नये यासाठी देखील लहानग्या आटोपशीर जाती करण्याची प्रवृत्ति आहे. वरील विवाहमीमांसेंत जवळच्या संबंधांतील विवाहाचे जे दोष दाखविले आहेत ते सर्व या पोटजातींतील विवाहांत दृग्गोचर होअूं लागले आहेत. तेव्हा धर्माची दृष्टि, समाजशास्त्राचा अनुभव आणि भावी प्रजेचें कल्याण यांचा विचार करून आता कडक नियम केला पाहिजे की, स्वतःच्या पोटजातींत विवाह करणें हें अेका कुटुंबांत किंवा अेकाच गोत्रांत लग्न करण्याअितकें निंद्य आणि त्याज्य आहे.

आजकाल ज्या सामाजिक सुधारणा सुचविल्या जातात त्यांहून ही सुधारणा निराळी आहे. अितर सुधारणा धर्ममर्यादा शिथिल करण्याच्या दृष्टीनें सुचविल्या जात असतील. ही सुधारणा धर्मदृष्टि अधिक जागृत करण्याच्या दृष्टीने सुचविली आहे.

कोणी म्हणतील, तुम्ही जातिभेद मोडूं पहात आहां. जातिभेद मोडणें अिष्ट आहे किंवा नाही हा प्रश्न बाजूस ठेवून अुत्तर देतां येअील की, सगोत्राबाहेर लग्नें करण्याने जर गोत्रें बुडत नाहीत, भिन्न कुटुंबियांच्या विवाहांमुळे जर कुटुंबें तुटत नाहीत, तर पोट-जातींच्या बाहेरच विवाह झाला पाहिजे असा नियम केल्याने पोटजाती तरी कशा तुटतील? आणि पोटजाती तुटल्याच तरी त्यांत जातींचें काय अनिष्ट आहे? वर्णव्यवस्थेला तर कोणत्याहि रीतीने धोका नाही. संघटनप्रिय काळाने तरी या सुधारणेस विरोध करतां कामा नये.

४

## जातीजातींतील संबंध

लॅओत्सी अशा अिंग्रजी अुच्चाराने ओळखला जाणारा अेक चिनी तत्त्वज्ञ व धर्मज्ञ मध्यचीनमध्ये होअून गेला. त्याचें वचन म्हणून असें सांगतात की, त्याला लोकांमध्ये संतोष अथवा तृप्ति हाच मोठा गुण वाटत होता. रिकामटेकडी जिज्ञासा हा अेक मोठा रोगच आहे असें त्याला वाटे. खेडेगांवाविषयींचा त्याचा आदर्श असा की 'खेडेगांवांतील लोकांनी आपलें गांव सोडून कोठेहि जाअूं नये. आसपासच्या खेडेगांवांतील वेशीवर असणारीं कुत्रीं भुंकलेलीं या खेडेगांवांत अैकूं आलीं तरी तें कसलें खेडेगांव आहे हें पाहण्यासाठी देखील येथून तेथे कोणी जाअूं नये.' कोलंबसापूर्वीं युरोप आणि अमेरिकेला अेकमेकांविषयीं जेवढी माहिती होती त्याहून अधिक माहिती अितक्या जवळच्या दोन खेड्यांमधून नसणें शक्य आहे किंवा कसें याचा विचार न करितां आपण हिन्दुस्थानची स्थिति तपासूं.

हिंदुस्थानांतील खेडवळ लोक जिज्ञासेसाठी फारसे प्रख्यात नाहीत. अितर प्रांतांत काय चाललें आहे याची माहिती त्यांना बहुतेक

नसतेच. अितर धर्मांचीं तत्त्वें काय, आदर्श काय, याची स्पष्ट माहिती कोणालाच नसते. प्रवाहांत पडलेल्या ओंडक्याप्रमाणे समाज मुकाट्याने चालत आहे. सामाजिक परिस्थितींत फरक होतो खरा पण त्या स्थित्यंतराची जबाबदारी अितर कोणाचीहि असो, खेडेगांवांतील जनतेची ती खास नव्हे. 'हरि ठेवील तैसें रहावें' हा जड तत्त्वाचा वेदांत लोकांना अुत्तम पटला आहे. कोणालाहि विचारा, जबाब अेकच मिळावयाचा, 'अहं करोमीति वृथाभिमानः'.

हिंदुस्थानांतील सामाजिक जीवनांत फरक होत नाहीत असें नाही; पण ते सर्व फरक परवश अशा जड तत्त्वांत होणारे फरक होत. पाणी विस्तवाने गरम होतें, वाऱ्याने थंड होतें; पण त्यांत त्याचा स्वतःचा असा आग्रह नसतो. पाणी कधी रागाने लाल झालें नाही अथवा कधी तो राग विवेकपूर्वक गिळून तें थंड झालें नाही. स्वतःच्या पुरुषार्थाने अिरादापूर्वक फेरफार करणें तसेंच पूर्वी योजून ठेविलेल्या दिशेकडे प्रयाण करणें हा चैतन्याचा गुण आहे. पण वेदान्ताने सांगितलें कीं, मुक्त पुरुषाने 'जडवल्लोक आचरेत्.' मुक्त होण्याच्या पूर्वीच आपण तो बोध स्वीकारला, आणि वत् प्रत्यय अगदींच विसरून गेलों.

हिंदुस्थानांतील — अर्थात् हिंदुस्थानांतील खेडेगांवांतील — जातीजातींचा प्रश्न हा असाच अेक जडतेचा प्रश्न होअून बसला आहे, व तो सबन्ध जनतेने सोडवावयाचा आहे. जनता ज्ञानमय, चैतन्यमय आणि यौवनमय झाली म्हणजे तो आपोआप सुटेल. जनता रूढीला चिकटून रहाते. यामध्ये समाजाचें स्थैर्य आहे, संतोष समाधान आहे. अमुक माणूस अमुक तऱ्हेनेच वागेल किंवा न वागेल याची खात्री आहे. रूढीचे असे कितीतरी गुण आहेत. कारण ते सर्व जडाचे गुण आहेत. पुलाचे धोंडे ठेवल्या जागींच असतात, पक्ष्यांप्रमाणे अुडून चरावयास जात नाहीत म्हणूनच पुलावर विश्वास ठेवून

आपणाला गाडी हांकतां येते. गाडीला भिअून पूल वाकत नाही हाहि कांही थोडाथोडका लाभ नाही. पण समाजामध्ये केवळ जडाचे स्थैर्यादि गुण असणें यांत अुत्कर्ष नाही, कृतार्थता ही नाही. थोडासा धूर लावून मधमाशांना पिटाळून ज्याप्रमाणे मध लुटण्याचा धंदा पाश्चिमात्य लोक अहर्निश करीत असतात, त्याप्रमाणे आपल्या येथील जड समाजाला न कळत त्याच्याकडून वाटेल तें काम करून घेतां येतें; त्याला वाटेल त्या स्थितीप्रत पोहोंचवितां येतें. मधमाशांप्रमाणेच हा समाज बुजणार नाही अेवढी काळजी घेतली म्हणजे बस्स.

हिंदुस्थानांत जातीजातींमध्ये जर कांही असेल तर तें परस्परां-विषयींचें गाढ आणि भयानक असें अज्ञान आहे आणि जेथे अज्ञान नाही तेथे विषारी कुज्ञान आहे. वाटेल तसल्या भ्रामक कल्पना अेकमेकांनी अेकमेकांविषयीं चालू केल्या आहेत, आणि त्या रूढीच्या जडतेने जगत आल्या आहेत. 'ब्राह्मण आणि साप बरोबर,' 'मारवाडी चामडी देअील पण दमडी देणार नाही,' 'मुसलमान बडे बेअिमान,' अशा प्रकार-च्या म्हणी या कुज्ञानाच्या द्योतक आहेत. याचा अेक पुरावा हा आहे कीं, असल्या बहुतेक सर्व म्हणी निंदामूलकच असतात. हिंदुस्थानांत अशी अेकहि जात, धर्म किंवा पंथ नाही की, ज्याच्याविषयीं अशी अेखादी अनुदार वृत्तीची म्हण सांपडणार नाही आणि या म्हणी जबाबदार लोक देखील वापरतांना आढळतात.

जातीजातींचा प्रश्न सोडविण्याचा सर्वांत पहिला आणि महत्त्वाचा मार्ग म्हटला म्हणजे जातींचा अेकमेकांविषयीं हा जो अज्ञानमूलक किंवा कुज्ञानमूलक अभिप्राय दृढमूल झाला आहे त्याच्यावर घाव घालावयाचा. चार मंडळी जमली असतांना ज्या जातीचे लोक हजर नाहीत त्यांची निंदा ही चालावयाचीच. ती येथवर कीं, आयांच्या पोटीं जन्मलेल्या पुरुषांनी सरसहा सर्व बायकांची यथेच्छ निंदा

करावी, आणि 'अनृतं साहसं माया' अित्यादि अधार्मिक वचनें धर्म म्हणून चालू ठेवावींत. कोणीहि कोणाची जातीवरून निंदा केली तर शहाण्यांनी तात्काळ त्याचा तेथेंच विरोध केला पाहिजे. गैरहजर जातींविषयीं वाटेल तसे अनुदार अुद्‌गार काढणें यांत नामर्दाअी आहे, पिशुनता आहे, असंस्कारिता आहे हें समाजाच्या हाडींमासीं खिळलें पाहिजे. परस्पर चांगुलपणाच्या जितक्या खऱ्या गोष्टी अुपलब्ध होतील त्या सर्व चलनी नाण्याप्रमाणे समाजांत चालू केल्या पाहिजेत. मि. अॅन्ड्रयूज अिंग्रज असूनहि चांगला आहे, डॉ० अन्सारी मुसलमान असूनहि न्यायनिष्ठ आहेत, अमुक गृहस्थ मारवाडी असूनहि अुदार आहे, फलाणा गृहस्थ कोकणस्थ असूनहि खरा साधु आहे, वगैरे वगैरे वचनें आपण अैकतों. गैरसमज तोडणारा अनुभव आला तरी मूळ गैरसमज टिकवावा असाच त्यांचा अुद्देश असतो. कारण, लक्षावधि अपवाद अेकाच वेळीं आपल्या समोर येत नसतात. आलेल्या अपवादांची अशा रीतीनें तेव्हाच वासलात लावली म्हणजे खराखुरा अनुभव मृतप्राय होतो आणि दुर्जनतेचा काल्पनिक गैरसमज जगत राहतो.

लोकमानसाच्या या सर्व खुब्या ध्यानांत घेअून प्रत्येक ज्ञात्यानें जातीजातींविषयींच्या सर्व अनुदार अुद्‌गारांना मूठमाती देण्यासाठी अेक होअून कंबर कसली पाहिजे. हें काम पॉलिसी म्हणून करून कधीहि साधावयाचें नाही.

युरोपमध्ये भौतिकशास्त्रांची आणि औद्योगिक कारखान्यांची अभूतपूर्व प्रगति झाल्यामुळे लोकांना धर्मावांचून समाज टिकूं शकेल असें वाटूं लागलें. गेल्या पन्नास पाअूणशे वर्षांतील प्रगतीचे बहुतेक सर्व प्रयत्न, मानवी स्वभाव सुधारण्याचे सर्व प्राचीन मार्ग सोडून, केवळ बाह्य परिस्थिति सुधारण्याच्या दिशेनेच झालेले आहेत. सामाजिक रचना बदलावी, कायदे बदलावेत, ते अधिक व्यापक करावेत, सार्वजनिक पैशांतून सुखासमाधानाच्या सोअी वाढवाव्यात,

शिक्षणद्वारां बहुजन-समाजाच्या डोक्यांतील माहिती वाढवावी आणि निरनिराळया रोगांवर निरनिराळीं औषधें तयार करावींत हीच काय ती आज-कालची प्रगति. मनुष्यस्वभाव आहे तसाच राहणार, तो वदलणें फारसें शक्य नाही आणि शक्य असो वा नसो तो बदलण्याचें आपलें काम नाही, अशा प्रकारची वृत्ति गेल्या दोन पिढयांनी दाखविली आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, भांडणें मिटवावयाचीं तीं मन मोठें करण्याच्या अुच्च भूमिकेवर जाअून न मिटवितां, परस्पर स्वार्थांचा मेळ घालून तात्पुरती तडजोड करण्याच्या तत्त्वानेच तीं मिटविण्याचे प्रयत्न होतात. यामुळे स्वार्थी प्रवृत्ति बळावते. भांडणें चालू ठेविलीं तरच आपणांस कांही तरी मिळणार असें वळेंच लोकांना वाटूं लागतें; निर्लज्जपणा वाढतो आणि नैतिक आदर्श आपल्या डोळ्यांदेखत नाश पावतात.

धर्माधर्मांचीं आणि जातीजातींचीं भांडणें हिंदुस्थानांत तरी पॉलिसीच्या जोरावर मिटावयाचीं नाहीत. सर्व भांडणांच्या मुळाशी अज्ञान आणि अनुदारता आहे. अेक दोष बौद्धिक आहे आणि दुसरा नैतिक; दोन्ही दूर केले पाहिजेत. भांडण मिटविण्यासाठी प्रति-पक्षाला समजावून सांगण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा प्रतिपक्षाला समजण्याचा अधिक प्रयत्न झाला पाहिजे; आणि अुदारतेचा अुपदेश दरेक पक्षानें स्वकीयांनाच केला पाहिजे. क्षुद्रतेचा आणि अविश्वा-साचा खड्डा भरून निघाल्यानंतर परस्पर अुदारतेची चढाओढ लागेल, आणि ती कल्याणकारक सिद्ध होअील.

केवळ अुच्च स्वार्थाच्या दृष्टीनें पहाणाराला अेवढी श्रद्धा आली पाहिजे कीं कोणीहि कोणाचें खरें सामर्थ्य लुटून घेअूं शकत नाही. जो अुदारतेनें कांही देअूं करतो त्याचें सामर्थ्य कमी न होतां वाढतें आणि दुर्बळाला आणि अज्ञान्याला सर्व कांही देअून टाकलें तरी तो आपल्या सामर्थ्याअितकेंच ठेवून घेअूं शकणार अथवा वापरूं शकणार यांत शंका नाही. सामर्थ्य वाढण्यास लोभ आणि हाव न

वाढवितां जबाबदारीचें क्षेत्र वाढविलें पाहिजे. अुच्च वातावरणांत वावरलें पाहिजे; आळस आणि विलासिता कमी केल्या पाहिजेत. अखंड अुद्योग, डोळ्यांत तेल घालून केलेली काटकसर आणि विशाल हृदय यांतच सर्व प्रकारचें सामर्थ्य आहे.

या बाबतींत शहराअितकें हीन वातावरण खेडेगांवांत नसतें हा अेक मोठा लाभ आहे. शेतकऱ्यांमध्ये सहकार विशेष असतो; व्यापाऱ्यांमध्ये चढाओढ विशेष असते; आणि सरकारी नोकरांमध्ये अेकमेकाचे पाय ओढून हीन स्वार्थ साधण्याचें नीतिबाह्य वर्तन अधिक दिसून येतें. खेडेगांवांतून नोकरीचा प्रश्न फारसा नसतो, व्यापार बेताचाच असतो, आणि मुख्य व्यवसाय शेती व मजूरीचा व गौण व्यवसाय मुमूर्षुदशेला येअून पोहोंचलेल्या अशा अुद्योगधंद्यांचा. अशी स्थिति असल्याने खेडेगांवांतून जातीजातींच्या भांडणांना फारसा अवकाश नसावा.

पण खेडेगांवांतील जनता जितकी अज्ञान तितकीच विकारवश असते. धर्माच्या नांवाने, जातीच्या नांवाने, कोणत्याहि विकाराच्या नांवाने लोकांच्या मनोविकारांना पेट लावून देणें फारसें कठीण नसतें. तरीहि असला दावानल शहराच्या मानाने खेडेगांवांत कमी पेट घेतो. कारण खेडेगांवांतून जीवनसहकाराचा ओलावा अधिक असल्याने सर्व जाती व धर्म अधिक ओतप्रोत असतात.

सामान्यपणे भांडणास तोंड लागलें म्हणजे तोंडीस तोंड करतां करतां प्रत्येक बाजूला आपला धर्म दुसऱ्याच्या स्वभावाअितकाच हीन, संकुचित, भांडखोर, आणि आंधळा बनवावा लागतो आणि मग परस्पर अुखाळ्या पाखाळ्या काढण्याचें दोघांनाहि सुचतें. दुसऱ्यास काळा ठरविण्यासाठी त्याच्या तोंडास काजळ फांसण्यापेक्षा आपण आपलें तोंड जर धुअून पुसून अुजळ ठेविलें तर दुसरा आपोआप काळा ठरेल, व दुसऱ्यालाहि तोंड धुण्याची आवश्यकता भासूं लागेल.

दोन मुलें पाटीवर वर्तुळ काढीत असतां अेकाचें वर्तुळ वाकडें आलें, आणि दुसऱ्याचें अगदीं बरोबर आलें तर ज्याचें बिघडलें असेल तो आपलें सुधारण्याचा प्रयत्न करणारच; निदान आपलें वर्तुळ कमी दर्जाचें आहे अेवढें तरी तो मनांत समजणारच आणि त्याने मनांत समजावें अेवढेंच समाधान सर्वांना वस्स असावें. त्याच्याकडून कबुली-जबाब घेण्याचा कधीहि प्रयत्न करूं नये.

जीवनाचे औद्योगिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय, शिक्षण-विषयक असे विभाग आपण विचाराच्या आणि चर्चेच्या सोयीसाठी पाडतों. मुळांत जीवन अेकरूपच आहे. त्याचे तुकडे पाडून त्याला जिवंत ठेवणें शक्य नाही. औद्योगिक किंवा राजकीय फेरफार तुम्हांला करावयाचे असतील ते करा, पण धर्मांत आणि सामाजिक व्यवस्थेंत हात घालूं नका, असें म्हणणारे कित्येक लोक असतात. जणूं काय, सामाजिक आणि धार्मिक चुका अथवा दोष प्रजाकीय प्रगतीला बाधतच नाहीत ! अथवा धर्म आणि समाजव्यवस्था कधी सदोष असतच नाहीत ! खेडेगांवांतून धार्मिक सुधारणा होण्याचीच अत्यंत आवश्यकता आहे. खाण्यापिण्याच्या बाबतींत शुचिर्भूतपणा ठेवणें आणि अुच्च आदर्शाचा आग्रह ठेवणें हें संस्कारिता आणि सामर्थ्य यांच्या दृष्टीने आवश्यक आहे. पण आज आपल्या समाजांत जें सोवळया ओवळयाचें, खरकटयानिर्लेपाचें व शिवाशिवीचें बंड बोकाळलें आहे तें प्रजाकीय कल्याणाच्या दृष्टीनें मोडलेंच पाहिजे. कारण त्यांत शुचिर्भूतपणाचें अंग असल्यास तें अत्यंत अल्प आहे; केवळ मोठेपणाची प्रतिष्ठा आणि आढयताच त्यांत अधिक आहे. आणि हिंदुस्वभावांत अज्ञानमूलक आग्रहाने प्रत्येक गोष्टीचा अतिरेक करण्याचा दोष प्रथमपासून आहे. खेडेगांवांतून असलीं बंडें मोडण्याचा प्रयत्न खऱ्याखुऱ्या धार्मिक लोकांनीच केला पाहिजे; आणि तो भीतभीत न करितां झपाटयाने, दृढतेनें आणि लोकांची समजूत घालून केला पाहिजे.

मनुष्य कोणत्याहि जातीचा अथवा धर्माचा असो तो अत्यंत अमंगळ नसेल अशा वेळीं त्याला शिवावयास कोणताच प्रत्यवाय नसावा. त्याचप्रमाणे जर स्वयंपाक योग्य लोकांच्या हातून शुचिर्भूतपणे झाला असेल आणि तोच पंक्तींत वाढला जात असेल आणि वाढणारे वाढण्याचे नियम पाळत असतील तर पंक्तीला बसणारे लोक कोणत्या जातीचे अथवा धर्माचे आहेत याची शहानिशा करण्याचें कांहीच कारण नसावें. दुसऱ्याची ठेव बुडविणारे, खोट्या साक्षी देणारे, व्यभिचार करणारे, नातेवाअीकांना देखील दगा देणारे आणि चोरून मारून अभक्ष्यभक्षण व अपेयपान करणारे असे सजातीय लोक आज अेका पंक्तीला बसतातच. तेव्हा पंक्तिव्यवहाराच्या नियमांत पवित्र आचरण किंवा सदाचार यांचें तत्त्व राखलेलें दिसत नाही. सरकारी दरबारांत ज्याप्रमाणे मानाचा अुच्चनीच भाव असतो त्याचप्रमाणे सामाजिक जीवनांत दरबारी अुच्चनीच भाव अुत्पन्न करून प्रपंचाचे नियम रचलेले दिसतात; निदान आजतरी निष्प्राण झालेल्या कलेवराप्रमाणे पंक्तिभेदाचे नियम दुर्गंधी पसरवीत आहेत.

आपली बाटण्याची कल्पना आपण अर्थविहीन आणि नाजूक करून ठेविली आहे. आणि गोऱ्या लोकांच्या मिजासीप्रमाणे ब्राह्मणशाहीचे मिजासखोर नियम आपण आजहि चालवूं पहात आहोंत. दुर्दैवाची गोष्ट ही की मिजासखोरपणा सुटूनहि मिजासखोरीचे नियम मात्र धर्माच्या नांवाने चिकटून राहिले आहेत आणि ज्यांनी हे नियम सोडले आहेत त्यांनी धार्मिक शुद्धीच्या दृष्टीने तसें केलें असेल तर अुत्तम; पण बरेच लोक कांहीसा धर्मलंडपणा आलेला आहे त्यामुळे केवळ सोयीच्या दृष्टीनेहि कांही अिष्ट सुधारणा अनिष्ट रीतीने घडवून आणीत आहेत.

धार्मिक जीवनाचा अत्यंत आग्रह बाळगणाऱ्या समाजसेवकांनी ठिकठिकाणीं आश्रम स्थापून तेथील जीवनांत या सुधारणा केल्या

पाहिजेत. म्हणजे समाजांत धर्मनिष्ठाहि वाढेल आणि सामाजिक जीवनाचें संस्करणहि होअील. असें केल्यावांचून आपला समाज सुदृढ होणार नाही. पांढरपेशा हिंदु जातींना, आपण अितर जातींचा किती अपमान करतों, किती पाणअुतारा करतों, किती हृदय-वध करतों, आणि त्यांना किती दूर लोटतों याची कल्पनाच येत नाही; म्हणून त्यांना प्रामाणिकपणे वाटतें की, आपण अगदी निर्दोष असून आपल्या दुरवस्थेचा फायदा घेअून अितर लोक शिरजोरपणे आपल्यावर हल्ला करीत आहेत.

जीवनशुद्धि केल्यानंतरच जातीजातींमधील वैमनस्य दूर करणें कांही अंशीं सोपें जाअील. मुख्य भर प्रेमाच्या अुदारतेवरच नेहमी असला पाहिजे.

रवींद्रनाथ ठाकूर म्हणतात कीं, 'जात हा शब्दच जन्मवाची आहे, आणि जोंवर जातीजातींमध्ये आणि भिन्नधर्मीयांमध्ये देखील मोकळेपणानें लग्नें होणार नाहीत तोंवर जातिवैमनस्याचें घोंगडें भिजतच रहाणार !'

भिन्नधर्मीयांमध्यें विवाह होणें सामान्यपणें अनिष्टच. दोघांनाहि धर्माविषयीं सारखीच अनास्था असेल तर त्यांना भिन्नधर्मी म्हणतांच यावयाचें नाही. धर्म म्हणजे व्यापकतम अशी जीवनव्यवस्था. ही व्याख्या जर खरी असेल तर भिन्न तत्त्वांवर रचलेल्या जीवनव्यवस्थांमध्ये विवाहासारखा जीवनव्यापी संबंध सुखावह होणार नाही, टिकणार नाही आणि कसाबसा टिकलाच तर अशा विवाहाच्या अपत्यांना तो पोषक होणें कठीण.

असें असलें तरी जर आज समाजांत असले विवाह झाले तर समाजानें चिडून न जातां वाटल्यास स्वतःचा तात्त्विक मतभेद व्यक्त करून स्वस्थ असावें; सामाजिक बहिष्काराच्या भानगडींत पडूं नये. रोटीव्यवहाराचें धोरण वर लिहिल्याप्रमाणे जर ठेवलें

तर पंक्तिबहिष्कार किंवा भोजनबहिष्कार ही वस्तुच निघून जाते. लग्नसंबंधाच्या बहिष्काराचा प्रश्न, मुलें होअून तीं लग्नाच्या वयाचीं होतील तेव्हाच अुठावयाचा. त्यावेळचा समाज त्याचें निराकरण करील आणि तेंहि आअीबापांच्या आचारअनाचाराचा विचार करून नव्हे, पण अपत्यांच्या संस्कारितेचा विचार करून.

अेकाच धर्मांत भिन्नवर्णीयांमध्ये लग्नें होणें हितकर नाही; पण याहि बाबतींत समाजानें बहिष्कारांचें शस्त्र अुचलूं नये. वर्णव्यवस्था ही रहाणी-करणी – विचारसरणीची परस्परानुकूलता आणि अुपजीविकेचा धंदा अबाधित ठेवण्यासाठी आहे. विवाहसंबंधांत वर्णाचा विचार करणें प्राप्त होतें खरें पण तो विचार जबरदस्तीने लोकांवर न लादतां सामाजिक शिक्षणानेंच तो टिकविला पाहिजे. ज्याप्रमाणे प्रत्येक मनुष्य स्वतः वातुळ किंवा पित्तकर आहार स्वतःच्या प्रकृतीचा विचार करून टाळण्याचें ठरवितो, ज्याप्रमाणे रूढ धर्माची आडकाठी नसूनहि श्रीमंत-गरीबांमध्ये विवाह फारसे होत नाहीत, ज्याप्रमाणे केवळ सामाजिक मताच्या जोरावर वृद्ध-बालिकाविवाहाची आणि बहु-पत्नीकत्वाची चाल आपण जवळ जवळ नामशेष केली आहे, त्याचप्रमाणे विवाह सवर्णांतच व्हावेत हा नियम देखील सामाजिक समजुतीवरच टिकवावा.

पोटजातीच्या विवाहासंबंधाने थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्याप्रमाणे अेकाच गोत्रांत विवाह होत नाहीत, भिन्न गोत्रच पहावें लागतें, त्याप्रमाणे विवाह अेका पोटजातींत होअूं नयेत. विवाह म्हटला म्हणजे तो दुसऱ्या पोटजातीशीच झाला पाहिजे हा सिद्धांत धर्मनिष्ठ समाजाग्रणींनी लोकांना अुत्तम रीतीने समजावून दिला पाहिजे.

आज हिंदु समाजांत जशा जाती जिवंत आहेत तसे वर्ण जिवंत नाहीत. तेव्हा वर्ण ठरविणें तो जुना अैतिहासिक पुरावा

शोधीत न वसतां संबंध जातीची हल्लींची रहाणीकरणी व मुख्य व्यवसाय पाहूनच त्यावरून ठरविला पाहिजे. अशा रीतीचा वर्णनिर्णय शहरी समाजांत कदाचित् कठीण जाअील परंतु खेडेगांवांत हें काम फार सोपें आहे.

भिन्नवर्णी विवाह नापसंत असले तरी ते पापमूलक आहेत असें मानण्याचें कारण नाही. आअीबापांच्या किंवा पालकांच्या संमतीनें अुघडपणे भिन्नवर्णीयांमध्ये निर्मळ संबंध झाला तर अेक सामाजिक प्रयोग होत आहे असें समजून त्याचा निषेध किंवा प्रचार अेकहि न करतां निरीक्षणदृष्टीच ठेवावी.

भिन्नधर्मीयांमध्ये आज सलोखा जवळ जवळ नाहीच म्हटलें तरी चालेल. अेकमेकांच्या घरीं जाणें व बसणें अुठणें, अेकमेकांच्या सुखदुःखाच्या वेळीं हजर असणें, मदत करणें, अेकमेकांच्या अुत्सवांत भाग घेणें, अेकमेकांच्या धर्माचे व सामाजिक रूढीचे सिद्धांत सहानुभूतिपूर्वक समजून घेणें, स्वतःच्या दृष्टीने जें चांगलें दिसेल त्याचा स्वतःच्या समाजांत स्वीकार करणें हें अखंड चाललें पाहिजे. आज संकुचित संघटनाने आणि परस्पर अविश्वासाने याच्या अगदी अुलट प्रकार सुरू झाला आहे. परस्पर सहिष्णुता आणि धार्मिक रूढींना झेपेल अितका सलोखा या दोन गोष्टी खेडेगांवांतील लोकांच्या हाडींमासीं खिळलेल्या आहेत पण हल्लीं याचा अेकसारखा ध्वंस सुरू झाला आहे. अुदारतेवर अविश्वास आणि 'मुत्सद्देगिरी' वर अलोट विश्वास हें सामाजिक अधःपाताचें मुख्य लक्षण आहे. समाज विस्कळित करावयास या व्यतिरिक्त दुसरें कांही साधन नसलें तरी चालेल !

हा जातीजातींमधील आणि भिन्न समाजांतील घरोबा केवळ पुरुषांपुरता नसून बायकामुलांतहि दिसून आला पाहिजे.

असा घरोबा प्रथम सुरू करून मगच त्याला अनुरूप असें वातावरण मिळविणें शक्य आहे. पांढरपेशा जातींतील बायकांमध्ये शिवा-

शिवीचें प्रस्थ अतिशय असे. त्याचा अुद्देश अनिष्ट घरोवा टाळण्याचाच असण्याचा संभव वराच आहे. पण आता ही अनिष्टता राहिली नाही. अुलट घरोबा नसणें हेंच अेक अनिष्ट अथवा अरिष्ट आहे. ही शिवाशिव प्रथम काढून टाकिली पाहिजे. घरोबा सुरू झाला म्हणजे मग खालच्या जातींतून स्वच्छता, नीटनेटकेपणा, शुचिर्भूतता हीं सहज यावयास लागतील. पांढरपेशा राहणींतील अेक गोष्ट सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांनी घेतली पाहिजे व ती म्हणजे अुच्छिष्टसेवन न करणें ही होय. भांडीं, पाणी आणि खाद्यपदार्थ कधीहि अुष्टें कोणास देअूं नयेत. वरच्या जाती पुष्कळदा आपलें अुष्टें अुघडपणे किंवा चोरून खालच्या जातीस देतात आणि म्हणतात कीं, त्यांना चालतें. त्यांना चाललें तरी आपणांस तें चालतां कामा नये.

दुसरा प्रश्न मांसाहाराचा. मांसाहारी जातींनी अन्नाहारी जातींशी सलोखा वाढण्यासाठी कांही गोष्टींत जपलें पाहिजे. अुभयतांच्या सहभोजनाच्या वेळीं मांसाहार नसावा. भांडीं वगैरे सर्व कांही शुद्ध केलेलें असावें व घरच्या मुलांलेकरांना व नोकराचाकरांना सुद्धा या बावतींत शिक्षण देअून ठेविलेलें असावें. कांही थोर मुसलमान खानदानांमध्ये ही गोष्ट पहावयास मिळते. अशांच्या घरीं जेवण्यांत कांहीच संकोच वाटत नाही. युरोपियन मिशनरी कुटुंबांत देखील ही गोष्ट साधणें अशक्य नाही. कांही ख्रिश्चन कुटुंबांतून ब्राह्मणी पद्धत चांगलीच आंगवळणी पडलेली दिसते. पण याचा अर्थ असा नव्हे की, त्यांनी अंडीं कोंबडीं किंवा अितर मांस सोडून दिलेलें असतें. अन्नाहारी लोकांसंबंधाचा प्रेमादर व्यक्त करण्यासाठीच त्यांचे-बरोवर ते ब्राह्मणी थाट ठेवतात आणि अेवढें आपणास बस्स झालें पाहिजे. जर मांसाहार त्याज्य असेल तर त्या तत्त्वाचा प्रचार

झाला पाहिजे पण मांसाहारी लोकांचा त्याग करून हा प्रचार होणें नाही. आपण केवळ अन्नाहाराचे कुशल मिशनरी बनलें पाहिजे. शहरांतून गाअी बाळगणें जितकें कठीण आहे तितकेंच सोवळ्याओवळ्याचे आणि शिवाशिवीचे जुने नियम पाळणें कठीण आहे. लोकांची रहाणी जसजशी बदलत गेली तसतसे जुने सामाजिक रिवाज मावळत गेले. अस्पृश्यतानिवारणाची चळवळ खेडेगांवापेक्षां शहरांत अधिक झाली असल्याकारणानें वर सांगितलेल्या शहरी वळणाला स्वाभाविक अुत्तेजन मिळालें. जेथे जेथे अस्पृश्यता नाहीशी झाली आहे तेथे तेथे ती न्यायाच्या आग्रहाने झाली आहे असें म्हणतां येत नाही; तरी अस्पृश्यता अन्यायमूलक आहे, त्यांत धर्म नसून अधर्म आहे हें लोकांना आतां चांगलेंच पटूं लागलें आहे. म्हणून जेथे अस्पृश्यता पाळण्यांत येते तेथेहि तिचा बचाव आता पूर्वीसारखा जोराने होत नाही. धर्माभिमानी हिंदु म्हटला म्हणजे तो अस्पृश्यतेचा बचाव करावयाचाच, ही स्थिति आता राहिली नसून बरेचसे सनातनी लोक असेच म्हणतांना आढळतात की, हजारों वर्षें चालत आलेली रूढि आणि तीहि धर्माच्या नांवाने चालत आलेली रूढि अेकाअेकी मोडणार नाही, जरा दमानेच घेतलें पाहिजे. अस्पृश्यता पापमूलक आहे याविषयीं आता कोणी डिवचल्यावांचून चर्चा अथवा विरोध करीत नाही.

परंतु विरोध अेक वेळीं पत्करला पण हें दमाने घेण्याचें तत्त्वज्ञान मोठें भयंकर आहे. अमेरिकेंतील स्वातंत्र्य-वीर वुअिल्यम लॉअिड गॅरीझन जेव्हा गुलामीचा विरोध निकराने करूं लागला तेव्हा 'व्यवहारदक्ष' लोक त्याला म्हणूं लागले, 'असे जहाल होअूं नका, जरा बेताने घ्या, दमाने घ्या, हळूंहळूं पाअूल टाका' तेव्हा तो चिडून म्हणतो: 'हळूंहळूं पाअूल कसें टाकावयाचें तें मला

समजत नाही. तुमच्या घरास आग लागली असली आणि तुम्हांस कोणी सांगितलें की, आगीचा बंब जरा दमाने चालवा, पाणी थोडें थोडें शिपा, तर तुम्ही त्याचें अैकाल काय ? तुमचें घर कोणी लुटत आहे, तर त्या चोराचा विरोध धीरे धीरे कसा करावयाचा ? तुमच्या आअीवर कोणी अत्याचार करीत आहे अशा नराधमाचा प्रतिकार सावकाश कसा करावयाचा ?' सुधारणा व प्रगति ही वाटल्यास सावकाश चालोत पण अन्यायनिर्मूलन मात्र तत्काल झालें पाहिजे. निदान आपला प्रयत्न तरी तसा असला पाहिजे. शुद्ध अन्याय, घडधडीत पाप, महान् अधर्म, मानवी स्वातंत्र्याची पायमल्ली, यांच्यांशी देवाण घेवाण तें काय करावयाचें ? शरीरांत गरम रक्ताचा अेक थेंब अुरला असेल तोंवर या अनाचाराचा तीव्रातितीव्र निषेधच केला पाहिजे. अेक तर अस्पृश्यतेचा नायनाट व्हावा किंवा अुघड्या डोळ्यांनी तिला पहाणाऱ्या आपला नायनाट व्हावा.

धनवान्, विद्वान्, हिकमती, कल्पक, हिंमतवान आणि महत्त्वाकांक्षी अशा सर्वच लोकांनी खेडेगांवांचा त्याग करून खेडेगांवांचा आणि मनुष्यसमाजाचा द्रोह केला आहे. किराणा माल ज्याप्रमाणे खेडेगांवांतील लोकांना जुना, शिळा, किडका मिळावयाचा, त्याचप्रमाणे धर्माच्या, सामाजिक कल्याणाच्या, आर्थिक हिताच्या, तरुण पिढीच्या शिक्षणाच्या, सर्वच कल्पना तेथें सडक्या रूपांत नांदावयाच्या. जुनें तेवढें वाअीट असें म्हणण्याचा आमचा आशय नाही. घरांत जुनीं भांडीं असू नयेत असें आम्ही म्हणत नाही. जुनीं भांडीं घरंदाजपणाचें, प्राचीन वैभवाचें आणि संस्कारितेचें द्योतक आहेत; पण जुनीं भांडीं देखील रोजच्या रोज घासूनच वापरलीं पाहिजेत. जुन्या कळकटलेल्या भांड्यांवरील हिरवा जहर गंज देखील संभाळून ठेविला पाहिजे, आणि स्वयंपाकाबरोबर तो पोटांत गेला पाहिजे असें म्हणणाऱ्या भूतकालाच्या अुपासकांनी मरून भूतच झालें पाहिजे.

जगण्यांत, जिवंत राहण्यांतहि भूतकाळाचा द्रोह होतो तो कोणाला टाळता येअील का?

आधुनिक समाजांत धर्मजागृति करून नवीन छाप पाडणारे बहुतेक सत्पुरुष आणि महात्मे शहरांतच संचार करितात. प्रवासाच्या सुखसोयींचीं साधनें जेथवर पोहोंचतात तेथवर यांचीं चरणकमलें पोहोंचावयाचीं! अशी स्थिति असल्याने खेडेगांवांतून अस्पृश्यता-निवारणाची चळवळ फार थोडी झाली आहे. हरिदास, पुराणिक, कथेकरी वगैरे लोक वैराग्याच्या रसाळ गोष्टी आशाळभूतपणे सांगत असतांना लोकांना काय रुचेल याचाच विचार करीत असतात. लोकांच्या हिताचें काय आहे याचा विचार करण्याची त्यांना संवय किंवा हिंमत नाही. आपल्या वाणींत आधुनिकता आणण्याची जरूर त्यांना भासूं लागली आहे. पण धर्मतेजाची त्यांना जरूर भासेल तेव्हाच ते समाजाचे खरे सेवक व नेते बनतील. तोंवर समाजरंजक म्हणून त्यांचा अुपयोग आहे तेवढाच असणार!

अस्पृश्यता-निवारण करण्याची जबाबदारी धर्मनिष्ठ, प्रजा-हितैषी, निस्पृह, आणि नीतिधैर्याच्या लोकांचीच आहे. स्वतःच्या मनांतून अस्पृश्यतेचें भूत काढून टाकिलें म्हणजे बस्स झालें नाही. धर्म म्हणून, रूढि म्हणून, अथवा संस्था म्हणून जें पाप समाजांत घुसतें तें कालांतराने अपौरुषेय होअून बसतें; म्हणजे त्याची जबाबदारी अेका विशिष्ट व्यक्तीवर असल्याचें दिसून येत नाही. अशा रूढीचा निर्दयपणा, घातकीपणा, असह्य अन्याय, हीं सर्व बिचाऱ्या अंत्यजासारख्यांना सहन करावीं लागतात. पण ती रूढि चालविणाऱ्या व्यक्ती स्वभावाने निर्दय, घातकी अथवा अन्यायी असतातच असें म्हणतां येत नाही. रूढीची निंदा केली तर व्यक्तींना वाटतें कीं, आमच्यावर हा नाहक ताशेरा आहे. पण दोषमुक्त ठरविल्याने पापमूलक रूढीला बळी पडलेल्या वर्गाचा जाच कांही कमी होत नाही. जे लोक व्यक्तींवर चिडतात, जशास तसें या

न्यायाने स्पृश्य समाजांतील व्यक्तीचें शासन करूं पहातात ते या पापी रूढीचें कंबरडें मोडण्याच्या अैवजी मजबूतच करतात. कोणतीहि समाज-सुधारणा करितांना ही गोष्ट कधीहि विसरतां कामा नये. प्राचीन काळापासून आजवर ही गोष्ट विसरून जाअून समाजाने पापी रूढींविषयींचा स्वतःचा पुण्यप्रकोप, अंधपणें रूढि चालविणाऱ्या व्यक्तींवर काढून नवे अन्याय व नवे घोंटाळे अुत्पन्न केले आहेत. अितिहासाचें* प्रत्येक पान या गोष्टीचें साक्षी आहे.

अनुक्र. १५५ दि. १०

## ५

## सामाजिक रिवाज

भारतीय संस्कृति फार प्राचीन असून तींमध्ये समाजहितविचार फार खोलवर जाअून केलेला आहे आणि ही संस्कृति कालाच्या कसोटीने समर्थ व टिकाअूहि ठरलेली आहे. दीर्घ जीवनासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक असतात त्या त्या या संस्कृतीला वेळोवेळीं मिळत आल्या आहेत, व त्यामुळेच अत्यंत पुरातन म्हणजे जुनाट असूनहि ही संस्कृति जीर्ण झाली नाही.

या संस्कृतीची अेक श्रद्धा अशी आहे कीं, खरोखर चांगलीं अशीं कितीहि तत्त्वें अेकत्र आलीं तरी तीं परस्पर विघातक होणार नाहीत; मात्र त्या तत्त्वांना अेकत्र कसें आणावयाचें याची कला आपणांस अवगत असली पाहिजे. हें सर्व विश्व अेकरूप आहे, यांतील सर्व चांगल्या गोष्टींचा परस्परांशी मेळ बसलाच पाहिजे आणि अनुकूल व स्थायी असा मेळ बसला म्हणजे त्यांतून आत्मसाक्षात्कार करविणारें समृद्ध संगीत — जीवनसंगीत — निघालेंच पाहिजे; ही श्रद्धा भारतीय संस्कृतीचें वैशिष्टय आहे, प्राण आहे.

---

* समाजहिताचें चिंतन करतां करतां आतां वाटतें कीं भिन्नवर्णी आणि भिन्नधर्मी विवाहांना समाजानें प्रोत्साहन दिलें पाहिजे.

म्हणूनच भारतीय संस्कृतीमध्ये युद्ध, जीवनकलह अथवा द्रोह यांना तात्त्विक स्थान नाही. मनुष्यस्वभावामध्यें जे अनेक दोष आहेत, जे महान रिपु आहेत त्यांच्या प्रादुर्भावाने युद्धें होवोत, पण युद्धांना आपण जीवनव्यवस्थेंतील अेक आवश्यक आणि आध्यात्मिक अंग म्हणून अितरांप्रमाणे कधीहि स्वीकारलेलें नाही.

भिन्नधर्मीयांमध्ये विवाह झाला तर तो कोणत्या शास्त्राप्रमाणें, कोणत्या कायद्याप्रमाणे व्हावयाचा हें जसें तटस्थपणे, तिऱ्हाअीतपणें आणि अुच्च भूमिकेवर जाअून ठरवावें लागतें, त्याचप्रमाणे भिन्न भिन्न संस्कृती अेकत्र येअून त्यांच्यामध्यें सहचार सुरू झाला म्हणजे त्यांचा मिलाफ कोणच्या तत्त्वांवर व्हावयाचा हेंहि ठरवावें लागतें. ‘वळी तो कान पिळी’ हा न्याय प्रकृतीमध्ये दिसून येतो खरा, पण तो तिर्यक् सृष्टीचा आहे. त्यांत आध्यात्मिक अुच्चता नाही. दोन संस्कृती अेकत्र आल्या म्हणजे त्यांनी भांडलेंच पाहिजे आणि अंतीं अेकीने दुसरीच्या आहारीं पडलें पाहिजे असा कांही निरपवाद नियम नाही. आर्य आणि द्रविड या भिन्न संस्कृती मानल्या तर त्यांचा सहचार युद्धद्वारें साधला असें म्हणतां यावयाचें नाहीं. दुधांत साखर मिसळावी त्याप्रमाणे त्या परस्परांत ओतप्रोत झाल्या. दुसरें अुदाहरण आहे हिंदी आणि चिनी संस्कृतींच्या सहचाराचें.

अशा सहचाराचें सामान्य तत्त्व, किंवा सामान्य शास्त्र, अेकत्र येअू पहाणाऱ्या संस्कृतींशी मिळतें असूनहि त्यांच्याहून अुच्च व श्रेष्ठ असें असलें पाहिजे.

भारतीय अितिहास सांगतो कीं, सहचाराचें हें तत्त्व म्हणजे परस्पर प्रेम व आदर, सद्भाव व समानभाव हें होय. सत्य, अहिंसा, सरळपणा, समानता, सहनशीलता, त्याग, अुत्साह आणि विविधते-मध्ये अुच्च अेकता पहाण्याची दिव्य दृष्टि, अितक्या गुणांचा जो

समुच्चय त्यालाच सहचाराचें रसायन म्हणतां येअील. हें रसायन भारतीय जनसमाजांमध्ये ज्या मानाने मुरलें असेल त्या मानाने विश्वैक्य साधण्याचें काम भारतवर्ष करूं शकेल.

भारतवर्षामध्ये सर्वांना प्रवेश आहे, सर्वांना आमंत्रण आहे, सर्वांचें स्वागत आहे. येथे कोणाचाहि त्याग नाही, बहिष्कार नाही, व्यक्ति, समाज, समाजमान्य रीतिरिवाज आणि विविध संस्कृति, कोणाशीच आत्यंतिक असहकार नाही. मात्र सर्वांनी वर सांगितलेली सहचाराची निष्ठा अथवा भारतीय रसायन स्वीकारलें पाहिजे. जे न स्वीकारतील त्यांचाहि बहिष्कार नाही, पण त्यांना या रसायनाचें महत्त्व कळेतोंपर्यंत भारतीय प्रेमसंगीताचा सूर कोणालाहि अैकू यावयाचा नाही.

जगांत जोपर्यंत कलहवृत्ति आहे तोपर्यंत भारतीय संस्कृतीला पुनःपुनः क्रूसावर चढून पुनरुत्थान करून दाखविलें पाहिजे. भारतीय संस्कृतीचें भाग्यच असें आहे. लोभाने किंवा अीर्ष्येने कोणीही समुद्रमंथन केलें तरी विषाचा वांटा महादेवाकडेच यावयाचा !

ज्याला रोज अग्निप्रवेश करावा लागतो त्याच्यामध्ये अेक प्रकारचें तेज, अेक प्रकारचें मार्दव, अेक प्रकारची सौम्यता आणि त्या बरोबरच अेक प्रकारचा कणखरपणा, प्रकट होतात. सत्त्व, स्वत्व आणि सर्वंग्राहकत्व हीं सात्त्विक तत्त्वें दिसून येत असतात.

हिंदुस्थानांतील सामाजिक रीतिरिवाज आर्यसंस्कृतीचे द्योतक आहेत. त्यांच्यामध्ये जातिनिहाय आणि प्रांतानिहाय कितीहि भेद असले तरी अेक प्रधान साम्य सर्वत्र अनुस्यूत आहेच. भारतवर्षांतील पगडया, फेटे, रुमाल यांच्यामध्ये जितकी विविधता आहे तितकी जगांतील दुसऱ्या कोणत्याहि देशांत नसेल. अितकें असूनहि भारतीय शिरोवेष्टन अितर देशांतील शिरोवेष्टनांहून सहजच निराळें पडलें. हीच गोष्ट सर्व रीतिरिवाजांची !

असें असलें तरी पिढी दरपिढी या रिवाजांत फेरफार झालाच पाहिजे. असे फेरफार शहरांतून लवकर होतात. परिवर्तनाची लाट खेडेगांवांत आणि मागसलेल्या प्रांतांत फार अुशिरा जाअून पोहोंचते. तलावांत धोंडा टाकला म्हणजे वीचिमालांची वलयें अेकामागून अेक कांठाकडे जात असतात त्याचप्रमाणे संस्कृतीचें आहे. चातुर्वर्ण्याच्या कल्पनेवर नवीं नवीं पुटें देअून 'अठरा पगड' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या पण संख्येने २५०—३०० भरणाऱ्या जाती आपण पडू दिल्या आहेत आणि जणू काय या सर्वांना मोठ्या समारंभाने दरबारांत बसवावयाचें आहे असें समजून त्यांच्यामध्यें 'अुच्चनीच भेद' ठरवून टाकला. सर्व जातींमध्यें अनुस्यूत असलेलें हें अुच्चनीचभावाचें तत्त्व खरोखर जीवनसूत्र नसून अेकाच वेळीं सर्वांना फांशी देण्याचा हा यमपाश आहे. पण खेडेगांवांतील लोकांना ही गोष्ट पटवून देतां देतां नाकीं नअू येणार आहेत ! कारण अुच्चनीच भाव त्यांच्या हाडींमासीं खिळण्याअितके हातोडे आपण त्यांना पूर्वी मारले आहेत. हे सर्व खिळे आतां पुनः अुपटून काढावयाचे म्हणजे कांही क्लेश हे होणारच !

कुटुंबामध्ये किंवा जातीमध्ये लहानमोठा असा भेद असतो. वयामुळे, नात्यामुळे, अनुभवामुळे अथवा सामर्थ्यामुळे लहानमोठा असा भेद पडतोच. पण येथे हा भेद विश्वरूप नसतो. पहिली गोष्ट अशी कीं, हा भेद सर्वांनी प्रेमाने स्वीकारलेला असतो. यांत मतभेद नसतो आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट ही की, या संबंधांत जो अुच्च असेल त्याला सर्वांचा दास बनावें लागतें. सर्वांची सेवा, सर्वांसाठी स्वसुखाचा त्याग या बाबतींत मर्यादाच नसणें, खंड नसणें हेंच कुटुंबाचें लक्षण होय. सर्वांचीं बोलणीं सोसणें, सर्वांच्या आग्रहाला मान देणें, सर्वांचे दोष मोठेपणाने गिळून टाकणें, आणि समाधानपूर्वक सर्वांच्या पायांखालीं तुडविली जाणारी धूळ बनण्यापर्यंत शून्य होणें हेंच कुटुंबांतील मोठेपणाचें लक्षण आहे. पृथ्वीलाच 'क्षमा' म्हणतात. जें

कांही पृथु, विशाल आहे तें क्षमावान असतेंच. अशा स्थितींत मोठे-पणाचा अभिमान, मोठेपणाचे हक्क, मोठेपणाचा तोरा आणि मोठ्याचा मोठा वांटा या गोष्टींना अवकाश कोठून असणार ? कौटुंबिक न्यायाचा मोठेपणा जगांत ज्याला घ्यावयाचा असेल त्यानें खुशाल घ्यावा. त्याला कोणीच नाही म्हणणार नाही. ख्रिस्तानें असला मोठेपणा स्वतःच्या अनुयायांस घ्यावयास सांगितलें होतें; कदाचित् हिंदुधर्माच्या वांट्यास हा मोठेपणा येअील. अथवा असेंहि संभवतें की, असला मोठेपणा समाजा-समाजांत स्थापन होण्याच्या सुमारास सर्वच धर्मांचें हृदयैक्य होअून जाअील.

जेथे अैक्य आहे तेथे समानतेचा बरोबरीचा प्रश्नच रहात नाही. डोकें वर कां व पाय खालीं कां असा झगडा माणसांनी किंवा झाडांनी कधींच केलेला नाही. जेथे अजून अैक्य स्थापन व्हावयाचें आहे तेथे समानता अत्यन्त आग्रहपूर्वक संभाळलीच पाहिजे. बरोबरीच्या नात्यानेच भिन्न समाज बरोबर चालूं शकतील.

आपण अेक अुदाहरण घेअूं. मांसाहार त्याज्य आहे असें मानणाऱ्या दोघांपैकी अेकाला त्याग करितां आला आहे व दुसऱ्याच्यानें अजून मांस सोडवत नाही. अशा स्थितींत हा दुसरा प्रकृति-दुर्बळ पहिल्या संस्कार-समर्थाला आपण होअून श्रेष्ठ मानील व हा श्रेष्ठ स्वतःचा श्रेष्ठपणा विसरून प्रकृति-दुर्बळाला जवळ करण्यांत, त्याला मदत करण्यांत, समाधान मानील. मी श्रेष्ठ आहें, मी पवित्र आहें म्हणून मी सामान्य लोकांना दूर ठेवीन असें म्हणणारा किंवा मानणारा विशिष्ट आचारांत कितीहि शुद्ध असला तरी माणुसकीच्या दृष्टीनें तो महापातकी आहे.

आतां ज्याला मांसाहार त्याज्य आहे हें पटलेंच नाही, मांसा-हारांत अयोग्य असें कांहीच नाही असें ज्याला वाटतें तो स्वतःला निरामिषाहाऱ्याहून कनिष्ठ काय म्हणून मानेल ? आणि निरामिषा-

हान्याला त्याच्याशी मोठेपणाने वागण्याचा अधिकार तरी कसा पोहोंचतो ? त्याने मनांत वाटेल तें मानावें पण मोठेपणाचा आव आणूं नये. आणि अनुभवहि असेंच सांगतो कीं, अेका बाबतींतला मोठेपणा मनुष्याला सार्वत्रिक मोठेपणा देअूं शकत नाही. रूढीने किंवा वंशपरंपरेने जो निरामिषाहारी आहे त्याचें हृदय संकुचित, निर्दय व कपटी असण्याचाहि कोठे कोठे संभव असतो आणि जो रूढीने मांसाहारी आहे व रूढीमुळेच ज्याला मांसाहारीची त्याज्यता पटणें मुष्कील झालें आहे असा अेखादा मनुष्य अन्य रीतीने पाहतां प्रेमळ, अुदार, स्वार्थत्यागी आणि विश्वासपात्र असा असूं शकेल. जीवनतोलनाच्या दृष्टीने येथे श्रेष्ठकनिष्ठभाव कसा ठेवावयाचा ?

म्हणूनच जीवन-शास्त्र्यांनी ठरविलें आहे की, तोलन करण्याच्या भरीस पडूं नये. सर्वांना समान लेखावें. सर्व व्यक्ति, सर्व जाती, सर्व वर्ण, सर्व आश्रम व सर्व धर्म समान आहेत. विशेषतः धर्माच्या बाबतींत आजच्या व आपल्या वांटचास आलेल्या त्या त्या धर्माच्या अनुयायांवरून कोणत्याहि धर्माची प्रतिष्ठा नक्की करतां कामा नये. प्रत्येक धर्म स्वतःच्या अनुयायांपेक्षा तर मोठा असतोच पण त्या त्या धर्माच्या धर्मग्रंथाहून आणि शास्त्रवचनांहूनहि मोठा असतो.

प्रत्येक हृदयांत आत्म्याचा वास आहे असें आपण म्हणतों; पण दुष्ट, दगलबाज, कृतघ्न, हीन, द्रोही अशा हृदयांत देखील आत्मा आहे व यथाकाळीं तेथेहि आत्म्याचा म्हणजे धर्मबुद्धीचाच विजय होणार आहे अेवढी श्रद्धा अथवा आस्तिकता मात्र आपण दाखवीत नसतों. ही आस्तिकता जेव्हा आपल्यामध्यें अुदय पावेल तेव्हाच आपलें आचरण अचूक धर्मानुकूल होअील.

धर्माधर्माच्या बाबतींत अेवढीहि श्रद्धा आपण दाखवीत नाही. सर्वच धर्मांत अीश्वर आहे, आत्मतेज आहे; सर्वच धर्म अुन्नतिगामी आहेत. सर्वच धर्मांमध्यें सत्यपरायणता, प्रेमपरायणता आहे. सर्वच

धर्म ओीश्वराला प्रिय आहेत. आओीला ज्याप्रमाणे स्वतःचीं सगळींच लेकरें अत्यंत प्रिय असतात त्याप्रमाणे ओीश्वराला सगळेच धर्म अत्यंत प्रिय आहेत.

सर्व जाती, सर्व धर्म, सर्व पंथ समान आहेत; सर्व आदरणीय आहेत; ओेवढी खात्री झाली म्हणजे परस्परांत कसें वागावें हें आपो-आप समजेल. भिन्नांनी विभक्त न राहतां ओेकमेकांशी ओतप्रोत होण्याचा प्रयत्न चालवावा, मदतीची देवघेव करावी, ओेकमेकांच्या अुत्सवांत भाग घ्यावा, जेथे आघात पोहोंचण्याचा संभव असेल तेथे संभाळून घ्यावें व अशा रीतीने स्वतःस व दुसऱ्यास समृद्ध करावें. येथे स्वतःची निष्ठा सोडावयाची नसून ती अुदात्त करावयाची असते.

प्रत्येक जण स्वतःच्या पुरतेंच अथवा आपल्या कुटुंबापुरतेंच पहात असतो, त्याअैवजी त्याने सामाजिक कल्याणाची व्यापक दृष्टि आग्रहाने स्वतःमध्ये आणिली पाहिजे. सार्वजनिक हिताचीं कामें संघशक्तीने करण्याचा अुत्साह वाढविला पाहिजे. सर्वत्र सामाजिक जीवन अुन्नत होओील असे प्रयत्न नेहमी चालले पाहिजेत. वारंवार विचार, चर्चा, होअून लोकमत जागृत होओील असे नवे रिवाज पाडिले पाहिजेत.

# ६

# ग्रामव्यवस्था

कारू, नारू, अलुते, बलुते हे शब्द आता अगदी परके वाटतात. पण यांच्या मुळाशी आपल्या पूर्वजांनी घडविलेली अेक विशाल संस्कृति आणि समाजव्यवस्था होती, हें आपण विसरतां कामा नये. समाजरचनेचे भिन्नभिन्न सिद्धांत जगापुढे मांडणाऱ्या हौशी तत्त्वज्ञांच्या कानीं जर आपली ही व्यवस्था पडेल तर ते आश्चर्यचकित होअून म्हणतील कीं, खरोखर आजच्या जगाला असलीच कांहीशी व्यवस्था हवी आहे. आपली वर्णव्यवस्था आणि ग्रामव्यवस्था या दोन्हींचीं तत्त्वें नीट समजून घेअून तीं जगापुढे मांडलीं पाहिजेत. सर्वांना सुख व्हावें, सर्वांत सलोखा नांदावा, प्रत्येकाला विकासाचा अवकाश मिळावा, आणि अधिकाधिक सामाजिक अुन्नति व्हावी या दृष्टीने या अंतःशासित संस्था आपल्या पूर्वजांनी तयार केल्या होत्या. सामुदायिक जबाबदारी आणि समाजांतील श्रेष्ठ लोकांच्या हातीं अधिकार या दोन्हींचा समन्वय देखील यांत अुत्तम साधला होता. सामाजिक कल्याणाला 'धर्म' असें नांव देअून त्याच्या अंकुशाखालीं आर्थिक व्यवस्थेची मांडणी केल्यामुळे स्थैर्य आणि प्रगति या दोहोंमध्यें मेळ बसला होता. आपल्या पूर्वजांच्या समाजरचनेंत कायदा (कॉन्स्टिटयूशन), राजा, परंपरा, अंतिमसत्ता, स्वदेशभावना, सर्व कांही हा धर्मच होता. सामाजिक सुव्यवस्थेच्या अखिल तंत्राला 'धर्म' हें नांव देअून प्रत्येक व्यक्तीने करावयाच्या सर्व कर्तव्यांना 'स्वधर्मपालन' असें नांव दिलें होतें. सर्व जगाच्या सुरळीत रहाटीसाठी स्वधर्माचें हें प्रेरक तत्त्व जगाला केव्हा तरी स्वीकारावें लागणार आहे.

## ७

# सत्तेचें स्वरूप

अेक जुनी म्हण आहे: 'राजा वोले दळ हाले, वुढ्ढा बोले दाढी हाले.' मनुष्य दुसऱ्याच्या सांगण्याने कांही करण्यास किंवा न करण्यास प्रवृत्त होतो, तें त्याचें सामर्थ्य ओळखून अथवा आपला स्वतःचा लाभ पाहून. सत्त्वहीनाचें कोणी अैकत नाही. (अर्थात् स्वतःला पटून स्वेच्छेने वागणाऱ्यांचा येथे विचार नाही.) आज्ञा पालन केली जाते याचें कारण आज्ञेच्या मागे आज्ञाभंग करणारास धाक, जरब, दरारा असतो अथवा आज्ञापालनार्थ कांही आमिष दाखविलेलें असतें हें होय. आज्ञेला पाठिंवा म्हणून जी वस्तु ठेविलेली असते तिला अिंग्रजींत सँक्शन् असें म्हणतात. बहुजनसमाजासाठी शरीरदंड, अर्थदंड, प्राणदंड किंवा अशाच कांही दुसऱ्या दुःखाचें भय; अथवा पैशाची किंवा सामाजिक प्रतिष्ठेची लालूच यांचेंच पाठबळ (सॅक्शन) असतें. भय आणि लालूच या दोन्ही हीन वृत्ती आहेत. यांच्या आधारावर लोकांना वश ठेवणें हें अुच्च संस्कृतीचें लक्षण नव्हे. कायदा आणि राजसत्ता यांचेजवळ याहून श्रेष्ठ असें सँक्शन् नसतें. म्हणून मनुष्यहित-चिंतकांनी 'राजसत्ता ही पशुबलावर अुभारलेली आहे' असें म्हटलें आहे.

धर्मप्रधान भारतीय संस्कृतीमध्ये मनुष्यजीवन संस्काराच्या आधीन ठेवून धर्मज्ञान, धार्मिक आचार, धर्मश्रद्धा, आणि पारमार्थिक जीवनोद्देश यांचें सामर्थ्य वाढविलें आहे. यामुळे भारतीय सत्पुरु अंतःप्रेरणेनेच आर्य वृत्ति धारण करतो; भयाने किंवा लोभाने प्रेरित न होतां वासनांवर विजय मिळवून निर्भय वीराप्रमाणे स्वेच्छेने शुद्धाचरण करितो. तपस्वी, पवित्र, धर्मशील पुरुष कायक्लेशाला भीत नाही, खुशामतीला बधत नाही, मोहाने धर्मच्युत होत नाही.

असा मनुष्य राजसत्तेच्या कह्यांत नसतो. अशांची संख्या वाढली आणि सामान्य जनसमुदाय अशांच्या अनुरोधाने वागण्यांत स्वतःचें कल्याण मानूं लागला म्हणजे जगांत राजसत्तेची आवश्यकता अुरणार नाही. व्यवस्थेसाठी म्युनिसिपालिटीसारखें अथवा स्वेच्छा-संघटित संस्थेसारखें तंत्र चालूं ठेवणें केव्हाहि आवश्यक आहे. पण तें सत्तामूलक नसून सेवामूलक असेल. स्वातंत्र्य मर्यादित करण्याचा तेथे प्रश्नच नसतो.

## ८

## खेड्यांतील पक्ष

मध्वाचार्यांनी दोन वोटें वर करून जगाला ठासून सांगितलें कीं 'सत्यं भिदा;' रामदास स्वामींनी आपल्या लाक्षणिक शैलींत म्हटलें आहे कीं, 'भेद अीश्वर करून गेला। त्याच्या वाचेन न वचे मोडिला।' जगामध्ये मतभेद, दृष्टिभेद, वृत्तिभेद आणि हितभेद हीं असावयाचींच. ठार करून, मारून, भांडून, वादविवाद करून, चर्चा करून तडजोड करून, पायां पडून किंवा गप्प बसून हे भेद जावयाचे नाहीत. तेव्हा खेडेगांवांतून तरी भेदाचा नाश कसा व्हावा? खेडेगांवांतील जीवन संकुचित असो, किंवा अज्ञानमय असो, कसेंहि असलें तरी तें संपूर्ण जीवन आहे. जिवंत लोकांचा तो समाज आहे. तेथे या सर्व गोष्टी असावयाच्याच. याहून पुढें जाअून असेंहि म्हणतां येअील की भेद जीवनसमृद्धीला आवश्यक आहे. अगदी साध्या संगीताला देखील चार पांच स्वर लागतात. अुच्च संगीताला बावीस श्रुतींची गरज असते. समाज जसजसा वाढावयाचा तसतशा त्याच्या प्रवृत्ती विविध व्हावयाच्या आणि अनुभवभेदाने, आदर्शभेदाने, त्याचप्रमाणे आस्था-भेदानेहि साध्यांत व साधनांत व कार्याच्या पद्धतींत भिन्नमति यावयाचीच.

तेव्हा प्रश्न हा नाही की मतभेद कसे टाळावेत; पण मतभेदांविषयीं सहिष्णुता आणि आदर राखून अेकोपा कसा संभाळावा हा खरा प्रश्न आहे. घरांत भाकरी अेकच असली आणि खाणार आअी आणि मुलगा असे दोन असले तर दोघांचे हितसंबंध – स्वार्थ — परस्पर-विरोधी आहेत यांत शंका नाही. पण तेवढ्याने त्या दोघांत भांडण अुत्पन्न होत नसतें. कारण दोघांमधील समंजसपणा स्वार्थ-त्याग आणि प्रेम यांची शक्ति बलवत्तर असते.

समाजांतहि भांडण मिटविण्यासाठीं याच गुणांचा परिपोष केला पाहिजे. विभक्तांमध्ये अविभक्ताला ओळखणें, क्षुद्रवासना असतील तेथे अव्ययभावाचें महत्त्व स्थापणें यांतच समाजाचें कल्याण आहे असें गीतेनेंहि सांगितलें आहे. मतभेद कितीहि असले तरी त्यासाठी माणुसकी सोडण्याचें कारण नाही. माणुसकी सोडल्याने सर्वांचेंच अनहित होतें, कोणाचेंच हित साधत नाही, अेवढी समज लोकांत अुत्पन्न केली पाहिजे आणि स्वतःचें नाक कापून घेअूनहि दुसऱ्याला अपशकुन करण्याची वृत्ति समाजांत जी बोकाळली आहे ती नाहीशी केली पाहिजे.

हें काम सरकारी न्यायमंदिरांद्वारा होण्याचें नसून समाजाच्या हृदयमंदिरांमार्फत झालें पाहिजे. व्यक्तीव्यक्तींच्या स्वार्थ-अीर्ष्या-असूया-मूलक भांडणांपासून तें तहत द्वैत अद्वैताच्या सनातन विवादापर्यंत सर्वत्र माणुसकीचें, सज्जनतेचें लोण पोहोंचविलें पाहिजे.

समाजांतील शिष्ट, प्रतिष्ठित, धर्मनिष्ठ, व कारुण्यवृत्तीच्या लोकांनी समाजाच्या रहाटींत मन घातलें पाहिजे व तटस्थपणें सर्वांच्या बऱ्याची दृष्टि राखून सल्लामसलत दिली पाहिजे. या कामासाठी देखील स्वतःची सत्ता, प्रतिष्ठा, यांचा आग्रह त्यांनी धरतां कामा नये. जेथे सत्ता आली तेथे प्रेमसंबंध मावळलाच, निदान म्लान तरी झालाच. वकीली वृत्तीनें हें वातावरण अुत्पन्न करतां यावयाचें नाही. धर्मनिष्ठा आणि मोठें मन यांतच सामाजिक अैक्याची आणि सामर्थ्याची किल्ली आहे.

'हा निव्वळ धर्मोपदेश झाला, हा व्यवहाराचा मार्ग नव्हे' असें कांही लोक म्हणतील पण 'व्यवहाराचा मार्ग' शेंकडों वर्षे झालीं आपण अजमावून पहात आहोंत. तथापि फलाच्या दृष्टीने तपासतां मात्र तो व्यवहार्य ठरला नाही! खरा व्यवहार्य मार्ग वर सांगितला तोच आहे.

दरेक गांवांत किंवा समाजांत ग्रामकंटक म्हणून असतातच. त्यांचा विरोध केल्यास ते अधिकाधिक विघडतात आणि साधन साध्याच्या बावतींत कसलाच विधिनिषेध त्यांना ठाअूक नसल्याने आणि सामान्य लोकांत दुष्टता, भोळसटपणा आणि अीर्ष्येला पडून गाढवावर बसण्याची वृत्ति यांचें मिश्रण पुष्कळदा दिसत असल्याने ग्रामकंटकांची पोळी चांगलीच पिकते. खरा अुपाय ग्रामकंटकांच्या युक्त्यांचा विरोध करीत बसणें हा नसून त्यांचें व त्यांच्या पद्धतींचें स्वरूप अुघडें करणें हा होय.

## ९

# दारिद्र्य

हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति दिवसेंदिवस खालावत चालली आहे. या निर्विवाद गोष्टीविषयीं देखील अेक प्रतिपक्ष अुत्पन्न झाला आहे! पण हिंदुस्थानांतील खेडीं दिवसेंदिवस अधिकाधिक कंगाल होत चाललीं आहेत याविषयीं मात्र कोठेंहि दुमत नाही. या दारिद्र्याचीं कारणें अनेक आहेत. त्या सर्वांची चर्चा येथे न करतां जीं कारणें दूर करणें आज शेतकऱ्यांच्या स्वतःच्या हातीं आहे तेवढ्यांचाच येथे विचार करूं.

लोकांचा खर्च हळूहळू वाढत आहे. आवश्यक वस्तु महाग होणें, आणि अनावश्यक वस्तूंची चटक लागणें हीं खर्च वाढण्याचीं दोन

प्रधान कारणें आहेत. अनाठायीं खर्च आणि शेतसारा व कर्ज यांचा बोजा वाढणें हेंहि खर्च वाढण्याचें अेक कारण आहे. आजारी पडून औषधापायीं बेसुमार खर्च होणें हीहि विचारांत घेण्या जोगी बाब आहे. खर्चाच्या मानाने जर अुत्पन्न वाढत गेलें तर खर्चाचें ओझे भासणार नाही. अुलटपक्षी खर्च आहे तेवढाच राहिला आणि अुत्पन्न मात्र कमी झालें तर पूर्वींचा स्वाभाविक खर्च आज अस्वाभाविक भासूं लागतो आणि परोपरीने जाचूं लागतो. आपल्या शेतकऱ्यांची फसगत दुहेरी आहे; खर्च वाढला आहे आणि अुत्पन्न कमी होअूं लागलें आहे. शेतकरी नसलेले असे जे कारागीर, मजूर किंवा आश्रित धंदे करणारे अितर लोक खेडेगांवांस अजून चिकटून राहिले आहेत, त्यांची दैना शेतकऱ्यांहून हि अधिक आहे. कारण शेतकऱ्याचें अुत्पन्न कमी झालें तरी त्याला तें वाढविणें केव्हा केव्हा शक्य असतें, आणि शेतकऱ्याला महागाअीचा फायदाहि मिळूं शकतो. पण बाकीचे अुद्योगधंदे पार ठार झाले आहेत. जीवनास लागणाऱ्या लहानमोठ्या सर्वच वस्तू शहरांतून किंवा परदेशांतून येअूं लागल्या आहेत आणि लोकांची अभिरुचि बदलल्यानेहि खेडगांवांतील बरेचसे धंदे बसत चालले आहेत.

दारिद्र्याचें दुसरें अेक महत्त्वाचें कारण आपल्या अुद्योगधंद्याची आणि गृहसंसाराची गबाळी पद्धति हें होय. बाहेरील पुरुषार्थ व पराक्रम कमी झाला म्हणजे आपापसांत विनाकारण तंटे अुपस्थित होतात, आणि स्वतःच्या नालायकीचा राग अेकमेकांवर काढला जातो. हा अनुभव सार्वत्रिक आहेच. पराक्रम वाढत असल्यावेळीं लोक वेगळे वेगळे राहिले तरी चालतें. पण अशावेळींच लोकांना अेकत्र रहाणें सोपें जातें. अुलटपक्षीं जेव्हा स्थिति खालावलेली असते तेव्हा पुष्कळांनी अेकत्र राहून अंधपंगून्यायाने अेकमेकांच्या आश्रयाने रहाणें अत्यावश्यक असतें, अशा वेळींच जीवनकलह असह्य होअून सहजासहजीं भांडणें अुत्पन्न होतात.

आपल्या लोकांचें जीवन बऱ्याच अंशीं अव्यवस्थित असतें. अुत्पन्न कितीहि कमी झालें तरी खर्च कमी करण्याचें आपल्यास

सुचत नाही; अथवा खर्च कमी होतच नसेल तेथे सर्वांनी जिवापाड मेहनत करून अुत्पन्न वाढविलें पाहिजे, हेंहि कुटुंबांतील बहुतेकांना सुचत नसतें. सावकारांनी स्वतःच्या कुळांना वांचवून त्यांची शक्ति वाढवून त्यांच्या वाढत्या अुत्पन्नांतून वाढता नफा मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी; तसें न करितां ते कुळांना पिळून काढून नफा करण्यांत कुळांच्या जिवावरच अुठतात. महाभारतांत जें सांगितलें आहे कीं, प्रजेशी वागतांना माळ्याप्रमाणे नफा मिळवावा, कोळसे-विक्या लोणाऱ्याप्रमाणे नव्हे, ती गोष्ट आजचे लोक पारच विसरले आहेत. अेक मिळवता मनुष्य असला म्हणजे तो नेहमी पाठबळ आणि मनुष्यबळ याची अपेक्षा करीत असतो, बाहेरून मिळवून आणून घरांत टाकलेल्या संपत्तीची नीट व्यवस्था लावणारा आणि तिचें चीज करणारा जर घरांत कोणी असला तर मिळविणाऱ्याला दुप्पट अुमेद येते. जिवाला जीव देणाऱ्या जिव्हाळ्याच्या व कर्तबगार लोकांचा संघ वाढला तर तें संघसामर्थ्य जवळ जवळ दुर्जय होतें. पण आपल्या समाजांत अेकजण अुत्साहाने काम करूं लागला म्हणजे अितरांना मत्सर तरी आठवतो किंवा आळस तरी आठवतो. पुढे जाणाऱ्याचे पाय ओढावेत, पोहणाऱ्याच्या गळ्यांत धोंड होअून पडून रहावें, अेक कर्ता दिसला म्हणजे आश्रितांनी शेवाळाप्रमाणें त्याच्या भोंवतीं जमावें आणि आपापले क्षुद्र हेतू साधण्याचा प्रयत्न करावा असा अनुभव खेडेगांवांतून तरी आहेच. खेडेगांवांतील महत्त्वाकांक्षा, खेडेगांवांतील या स्थितीला कंटाळून, साधनसंपत्तिनिशी शहराकडे धांव घेते, असा अनुभव सार्वत्रिक आहे; पण याचें पृथःकरण मात्र अजून झालें नाही.

खेडेगांवांमध्ये जुनी सामाजिक संस्कृति कुजकट रूपाने कां होअीना अजून जिवंत आहे. ती ज्या प्रकारच्या जीवनाची आणि जबाबदारीची अपेक्षा व्यक्तींकडून करिते, ती टाळणें शक्य नसते. जुन्या-संस्कृतीचा हा आग्रह क्षीणवीर्य समाजांत भाररूप होअून बसतो. शहरांतील लोकांनी जुनी संस्कृति पार झुगारून दिली आहे. शहरां-

मध्यें मनुष्याला भीडमुर्वत सोडून स्वत:चा बिनजबाबदार स्वार्थ साधणें शक्य असतें. शहरांमधून सामाजिक संघटन अगदींच ढिलें झालें आहे व त्यामुळे व्यक्तीला व्यक्तिगत प्रगति साधणें फार सोपें जातें. राज्य मोडकळीस आलें म्हणजे ज्याप्रमाणें किंचित्काळ राज्यांतील सरदार लोक बळावतात, पण सरतेशेवटीं संघसामर्थ्याच्या अभावीं सर्वांचाच नाश होतो, त्याचप्रमाणें सामाजिक बंधनें तोडून टाकलीं म्हणजे व्यक्तींची बढती भराभर होते; पण पुढे ही वाढ अुच्च पोषणाच्या अभावीं खुरटून जाते. शहर आणि खेडेगांव यांमधील हा सांस्कृतिक भेद ध्यानांत घेतला पाहिजे. ग्रामोद्धाराची दिशा ठरविण्याच्या कामीं हा महत्त्वाचा आहे.

निदान हिंदुस्थानांत तरी शहरें खेडेगांवांवर अुपजीविका करितात असें म्हणण्यास हरकत नाही. पण ही अुपजीविका माळ्या-प्रमाणे न होतां लोणाऱ्याप्रमाणें चालली आहे. खेडेगांवांतील कच्चा माल, खेडेगांवांतील कर्तबगारी आणि साधनसंपत्ति हीं शहरांत येतात. खेडेगांवांतील अुद्योगधंद्यांना शहरें कांहीच आश्रय देत नाहीत. स्वत:ला लागणारा माल परदेशांतून जसा येअील आणि बाजारांत जसा मिळेल तसा घेण्याची जडता लोकांमध्ये वाढली आहे. पूर्वी जमीनदार, जहागिरदार आणि अितर श्रीमंत लोक स्वत:ला हवा असेल तसला माल मुद्दाम कारागीर हुन्नरी लोक राखून तयार करवीत, आणि अितर लोक त्यांचें अनुकरण करीत असल्याने संस्कृ-तीला वळण लागे आणि त्याबरोबर देशांतील कारागिरांना सार्वत्रिक अुत्तेजन मिळून त्यांची भरभराट होत जाअी. आजचा हिंदुस्थान आयत्या तयार होअून आलेल्या मालाचा आंधळा गिऱ्हाअीक झाला आहे. यामुळे देशाचें दारिद्र्य झपाट्याने वाढत आहे आणि लोकांना स्वदेशी घरगुती अुद्योग धंद्यांच्या वातावरणांतूनच जें शिक्षण आणि संस्कृति मिळावयास पाहिजे, ती मिळणें अशक्य झालें आहे.

स्वतःच्या रहाणीकरणींविषयीं समाजाने खोलवर विचार केलेला असणें, त्या रहाणीप्रमाणे वापरण्याच्या वस्तू कशा असाव्यात हें नक्की केलेलें असणें, जीवनाच्या आदर्शाप्रमाणें वागण्याचे नियम, शिष्टाचाराची पद्धति, सामाजिक धर्म (कर्तव्यें) आणि सामाजिक संस्था या नक्की होणें व त्याबरोबर स्वतःस लागणारा माल स्वतःच्या देखरेखीखालीं स्वतःच्या आवश्यकतेनुरूप आणि अभिरुचीनुरूप तयार करविणें हें जिवंत समाजाचें लक्षण आहे. कसला हि तयार माल पडेल त्या किंमतीला विकत घेऊन चालविण्याची संवय असंस्कारितेचें लक्षण आहे. आपल्याला हवा असलेला माल आपल्याच लोकांकडून स्वतःच्या देखरेखीखाली तयार करविणें यांत शिक्षण आहे, पुरुषार्थ आहे, आनंद आहे आणि यांतच जीवनाची संस्कृति आहे. आपला समाज जर अुठवळ झाला नसता तर त्याला हें सहज पटलें असतें. अुठवळ समाजाचें दारिद्र्य दूर करणें कुबेरालाहि शक्य नाही.

दारिद्र्य दूर करण्याला अनेक अुपाय केले पाहिजेत. पण त्यांतील मुख्य अुपाय म्हणजे सर्वच लोकांना विशेषतः पांढरपेशांना हातपाय वापरण्याची संवय लावणें हा आहे. हातपाय असून तुम्ही बसून कसे राहिलां आहांत अशी महाभारताची वाणी टाहो फोडीत आहे. 'हस्तपादादिसंयुक्ताः यूयं किमवसीदथ ?'

लक्ष्मीचें आद्य निवासस्थान शिरकमल नसून करकमल आहे. करकमलांनी अुद्योग आणि पुरुषार्थ केल्यावांचून शिरकमलावर मुकुट चढावयाचा नाही. पांढरपेशा लोकांनी अुद्योगाची, शारीरिक श्रमाची गोडी चाखली तर त्यांचीं शरीरें जोमदार होतील, प्रजा वीर्यवान होईल, त्यांचें डोकें व्यवहारकुशल होईल, शंकाकुशंका व भांडणें बरींच कमी होतील, त्यांचें वातावरण समाजांत पसरेल, अुच्चनीचभावाचा रोग नाहीसा होईल, तेजस्वी जीवनानंद सर्वांना प्राप्त होईल आणि दारिद्र्याच्या रोगाचा नायनाट होईल.

# १०

## कर्ज

हिंदुस्थानमध्ये मोठमोठे कारखाने, स्वदेशी नाहीं तर परदेशी जंगी भांडवल, शेंकडो मैलांची यांत्रिक शेती आणि परदेशी वाढता व्यापार, असलें वातावरण चालूं द्यावयाचें किंवा नाही हें आपल्याला अेकदा कायमचें ठरवावें लागणार. हिंदुस्थान संस्कारी, सुधारलेलें व संघटित राष्ट्र आहे. त्याने अिंग्लंड, अमेरिका, जर्मनी किंवा जपानचें अनुकरण करण्याचें ठरविलें तर योग्य काळीं तें सहज शक्य आहे. रशियाला जर असाधारण परिवर्तन करतां आलें आणि रशिया आज जर वर सांगितलेल्या सर्व राष्ट्रांना भयंकर प्रतिस्पर्धी वाटूं लागला आहे तर हिंदुस्थानांत हीच प्रगति त्याहून थोड्या वर्षांत करून दाखविणें अशक्य नाही. पण हिंदुस्थानने तो मार्ग स्वीकारावयाचा किंवा नाही याचा विचार आत्तांच केला पाहिजे.

मनुष्यसमाजाचें आर्थिक संघटन त्याच्या जीवन-सिद्धान्तावर अवलंबून असतें. जर्मनीचें, अिंग्लंडचें किंवा रशियाचें अनुकरण करावयाचें तर त्यांचें तत्त्वज्ञान, त्यांची फिल्सुफी स्वीकारली पाहिजे. मग समाजरचनाहि त्यांच्या वळणावर आपोआप जाणारच. जशी अर्थनीति तशीच धर्मनीति. तेव्हा अितर देशांचें अनुकरण करावयाचें म्हणजे हिंदुस्थानानें भारतीयत्वाला मुकावयाचें. ही आपली तयारी आहे किंवा नाही ?

जर मुळांत भारतीयत्व ही कांही अलौकिक वस्तु नसली तर ती सोडून देण्याची आपली केव्हाहि तयारी असली पाहिजे. केवळ आपलेपणा किंवा जुनेपणा याची जीवनदृष्टया किंमत केवढी ! पण जर भारतीय जीवनदृष्टि कल्याणाची असेल, जगांतील माणुसकीचा

नाश करणारे स्वभावदोष टाळण्याची शक्ति जर भारतीयत्वांत असेल तर आपण 'अनुकरणाचा मार्ग कधीहि स्वीकारतां कामा नये. दुसऱ्याच्या आहारीं पडलें काय किंवा दुसऱ्यांच्या मागोमाग गेलें काय अनुकरण हें मरणच होय. अितर राष्ट्रांतील बाजार काबीज करून देशदेशांतरीचा पैसा हिंदुस्थानांत खेंचण्याची आणि मागासलेल्या देशांत दुष्काळ, बेकारी आणि परतंत्रता पाठविण्याची दुर्बुद्धि जर आपल्यांत नसेल तर आपण ' यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ' या तत्त्वावरच आपली समाजनीति व अर्थनीति रचली पाहिजे. भांडवल, प्राकृतिक शक्ति आणि सामाजिक सत्ता यांचें अवाढव्य केंद्रीकरण करणें म्हणजे सामाजिक जीवनांत साम्राज्यवाद अुत्पन्न करणें आहे; मग तें साम्राज्य अमेरिकन पद्धतीचें असो किंवा आजचें रशियन पद्धतीचें असो. 'संपत्तीमुळेच गरीबी अुत्पन्न होते' हें अर्थशास्त्राचें सूक्ष्म तत्त्व रशियाला पटूनहि न पटल्यासारखें आहे. यांतून जर मार्ग काढावयाचा असेल तर हिंदुस्थानची ग्रामसंस्कृति लक्षांत घेअून आपली अर्थनीति ठरविली पाहिजे. प्रजेचें संघटन राजकीय पायावर न करतां संस्कृतीच्या पायावर केलें पाहिजे. म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य कायम राहून मनुष्याचा आत्मगौरव टिकेल.

ही गोष्ट जर आपल्याला पटली तर खेडेगांवांच्या आर्थिक जीवनाची स्पष्ट कल्पना आपल्याला यअील.

लहान लहान कुटुंबें किंवा मोठीं कुटुंबें आपापलीं शेतें नांगरून सुखाने रहात आहेत, फावल्या वेळीं समाजोपयोगी लहानमोठे धंदे करीत आहेत, सर्व प्रकारचे अुद्योगहुन्नर सर्वत्र लहान प्रमाणावर ठिकठिकाणीं चालले आहेत आणि सार्वजनिक हिताचीं मोठमोठीं कामें लहान लहान घटक समजूतदारपणाने अेकत्र होअून मोठ्या पायावर पार पाडीत आहेत असेंच समाजाचें स्वरूप असणें आपल्याला अिष्ट आहे. प्रत्येकाजवळ नांगरावयाला थोडीफार जमीन, अुद्योगहुन्नर करावयास आअूतें व अवजारें, ठराविक गिऱ्हाअिकी

आणि वर्षभरचा व्यवहार सुरळीत चालावयास लागणारें भांडवल प्रत्येकाजवळ असावें हा आपला आदर्श आहे. अशा स्थितींत कोणालाहि कर्ज काढण्याची पाळी येअू नये. प्रसंगविशेषीं अधिक पैशाची जरूर पडलीच तर समानव्यवसायी लोकांकडून वर्गणीच्या रूपानें अुसनवार पैसे मिळाले पाहिजेत.

पण ही स्थिति मोठ्या प्रयत्नानेच आणतां येअील. तोंपर्यंत कर्ज काढण्याची आवश्यकता ही रहाणारच.

कर्जें दोन प्रकारचीं असतात. शेती, व्यापार, अुद्योग, हुन्नर, दलाली अथवा सामाजिक हिताचीं मोठमोठीं कामें करतां यावी यांसाठी काढलेलें कर्ज निराळें आणि आजारीपणाचा खर्च भागविण्यासाठी, मुलीचा हुंडा देण्यासाठी, कोर्टें लढण्यासाठी, अुपासमार टाळण्यासाठी अथवा व्यसनासाठी काढलेलें कर्ज निराळें. मनुष्य जर अकलेनें वागला तर पहिल्या प्रकारचें कर्ज हें ओझें नाही. अुलट भांडवल वाढल्यानें अशा कर्जाच्या योगानें अल्पांशानें कां होअीना मनुष्याचें सामर्थ्य वाढतेंच. दुसऱ्या प्रकारचें कर्ज हें जीवनांतील अडचणी अपरिहार्य आहेत असें समजूनच करावयाचें. आणि ते शक्य तो कमी घेअून लौकर फेडावयाचें असते.

दोन्ही प्रकारच्या कर्जांच्या योगानें कर्ज देणारा अिसम तें घेणाऱ्यांच्या जीवनावर आपला काबू प्रस्थापित करतो. कर्ज घेणारा जितका लहान, जितका दुर्बळ अथवा अज्ञान तितका तो कर्ज देणाऱ्याच्या कह्यांत जाअून अगदी गुलाम बनतो. कर्जाच्या सर्व शर्ती न्यायाच्या असोत किंवा पिळून काढणाऱ्या असोत धनकोच्या अिच्छेप्रमाणे ठरल्या जातात आणि ऋणकोला किती तरी बाबतींत ठराविक शर्तींबाहेरहि धनकोची भर करावी लागते. ऋणकोच्या दुःस्थितीचा फायदा सगळ्या बाजूंनी घेअून धनको न्यायाचा टेंभा मिरवितो अेवढेंच नव्हे पण परोपकार केल्याचाहि तो आव आणतो आणि या सर्वांना मान तुकविणें ऋणकोला प्राप्त होतें; म्हणूनच म्हण पडली आहे कीं, ‘ गरजवंताला अक्कल नसते. ’

व्यापार-अुद्योगासाठी काढलेल्या कर्जांत ऋणको जर सावधान नसेल तर व्यापार-अुद्योग करून लोणी लोणी सर्व धनकोस मिळाव-याचें आणि ऋणकोच्या वांट्यास केवळ ताकाचें पाणी रहावयाचें. ज्याप्रमाणे लोक गुरें बाळगतात, गुलाम बाळगतात, मधमाशा बाळग-तात आणि त्यांच्या मेहेनतीचा सर्व फायदा आपलासा करतात त्या-प्रमाणे भांडवलवाले आपल्या भांडवलाचा अुपयोग करून त्यांतून दूध आणि मध तयार करून देणारे ऋणको बाळगत असतात.

आणि जर घेतलेलें कर्ज द्रव्यवृद्धीसाठी नसून अडचणींतून मुक्त होण्यासाठी घेतलेलें असेल तर मग काय विचारावें ? असलें कर्ज म्हणजे शुद्ध गुलामगिरीच होय.

यासाठी खेडेगांवांतील लोकांनी होतां होईल तों कर्ज न काढ-ण्याचाच निश्चय करावा. कर्ज काढल्यान काटकसर नाहीशी होते, कशाचाच अंदाज रहात नाही आणि सगळाच आंधळा दरबार होतो. पण कर्ज काढावेंच लागलें तर कमींत कमी व्याजाने, स्वतःच्या सोयीच्या शर्तींने मिळेल अशी नजर ठेवावी. कर्ज फेडण्याचे हप्ते अथवा वेळा स्वतःच्या सोयीच्याच ठेवाव्यात. कर्जापायीं बुडून जाव-याचें नसेल तर कर्ज काढणाऱ्याने आपला हिशोब अगदी चोख आरशासारखा ठेवला पाहिजे. पुष्कळदा वर्षाची बेगमी वेळीं करून न ठेवल्यानेच कर्ज काढावें लागतें. गोर-गरीबांना वर्षाची बेगमी करून ठेवणें बहुधा कठीण असतें. अशांनी आपल्या विश्वासाच्या समजुतदार व चारित्र्यवान अशा लोकांशी मिळून आर्थिक संघ तयार करावेत आणि संघाच्या रूपाने वार्षिक बगमी करून ठेवावी. व्यक्तीला कर्ज काढावयाचें असेल तर तें स्वतंत्रपणे न काढतां संघामार्फत काढाव. असें केल्याने कर्ज देणारास उत्तम तारण मिळतें, आणि कर्ज घेणारास कर्ज सोयीने मिळून, काढलेले पैसे कसे वापरावेत, त्यांचा हिशोब कसा ठेवावा वगैरे बाबतींत संघाकडून मूल्यवान असा सल्लाहि मिळतो. संघाची देखरेख व संघाचा अंकुश व्यक्तिगत जीवन सुसंघटित आणि

पायाशुद्ध करण्याला खूप अुपयोगी असतो आणि कर्जामुळे येणारी गुलामी तर याच मार्गाने टाळणें शक्य आहे. कर्ज काढावयाचेंच तर तें काढण्याचें शास्त्र तयार करून सशास्त्र पद्धतीने तें काढावें. सांघिक जीवनामध्येंच हें शक्य असतें, व म्हणून संघ खूप विचाराने तयार केले पाहिजेत.

अशा संघाचा अुद्देश वस्तुतः आर्थिक असला तरी संघ हा जीवन-संघ आहे हें विसरतां कामा नये. जातीच्या किंवा धर्माच्या तत्त्वांवर हा संघ करूं नये. पण ज्यांच्यामध्यें मित्रत्वाचें नातें आहे, स्नेहाचा जिव्हाळा आहे, आर्थिक व्यवहार चोख असल्याबद्दल परस्पर विश्वास आहे, अेकमेकांना व्यवहारांत सल्लामसलत घेण्याची आणि देण्याची संवय आहे, अशांचेच संघ करावेत. संघांत नवीन मनुष्य घ्यावयाचा तो जुन्यांच्या मोठ्या बहुमतानेच घेण्याची पद्धत ठेवावी. संघाच्या मुख्य चालकांच्या अभिप्रायाला नेहमी मान द्यावा आणि हे मुख्य संचालक पसंत करावयाचे ते त्यांच्या केवळ चलाखीकडे पाहून पसंत न करितां समाजहितैषिता, निःस्पृहता आणि व्यवहाराचा कडकपणा हे गुण पाहून त्यांना पसंत केलें पाहिजे.

ज्याप्रमाणे आपण अेन्जिन चालवणाऱ्यांवर आणि गार्डावर सबंध आगगाडीचा विश्वास टाकून रात्रीं आपापल्या डब्यांत घोरत पडतों, त्याप्रमाणे पण विश्वासाने नव्हे, तर आळसाने संचालकांकडे सर्व गोष्टी सोंपवून संघांतले लोक पडून असतात. अशाने संघाचा मूळ अुद्देशच मारला जातो. संघांत सामील होणाऱ्या प्रत्येक मनुष्यास अुत्तमपणे जगावे कसें व स्वार्थ, परार्थ व परमार्थ संपादन करावा कसा याचें अुत्तम शिक्षण आणि अुत्तम तालीम मिळणें हा संघाचा मुख्य अुद्देश. हा अुद्देश पार पाडण्यास सर्वांना संघकार्यांत ध्यान दिलें पाहिजे. अेक-मेकांच्या व्यवहारांत ढवळाढवळ न करतां जेवढें लक्ष देतां येअील तेवढें देण्याची कला ही अत्यंत अुपयोगी जीवनकला आहे. या कलेच्या जोरावर समाज समर्थ होणार आहे. असें सामर्थ्य अेकदा मिळविलें

म्हणजे कर्जाचा व्यवहारच काय, सर्वच जीवनव्यवहार सुव्यवस्थित होणार आहे.

ही सर्व पुढची तयारी झाली. आज खेडेगांवांतून जो कर्ज-बाजारीपणा व्यापून राहिला आहे त्याला अुपाय काय ? आजची स्थिति ही स्वाभाविक नसून सामाजिक महारोगाची निशाणी आहे. जी वस्तु समाजव्यापी आहे ती स्वाभाविकच आहे व अशीच नेहमी असावयाची असें वाटणें हें जडतेचें लक्षण आहे.

या महारोगाचा अुपायहि वरील संघांतच आहे. संघ जसजसा विशाल व समर्थ होअील त्या मानाने त्याला गांवांतील सर्व कर्जव्यवहाराची माहिती अेकत्र करून त्याची तपासणी करण्याची शक्ति येअील. अेखाद्याचें कर्ज बुडणें हें जितकें अयोग्य आहे तितकेंच कर्जापायीं समाज व त्याचा पुरुषार्थ बुडणें हेंहि अयोग्य आहे. हें तत्त्व घ्यानांत ठेवून समदृष्टीने कर्जव्यवहाराची छाननी झाली पाहिजे, आणि ती सुद्धा कोर्टी न्यायाच्या पद्धतीने नव्हे, तर सामाजिक न्यायाच्या पद्धतीने. सर्व पक्षांना वांचवून घेअून आजची गुंतागुंत अुकलली पाहिजे. असाधारण परिस्थितींत अुपयोजण्याचे अुपायहि असाधारणच असतात. सरकारने व संघाने मध्यें पडून कांही विशिष्ट पद्धतीने शेतकऱ्यांच्या कांही कांही गरजांचा बोजा अुचलल्याशिवाय आणि बाकीचें कर्ज वितळवून टाकण्यासाठी शेतकऱ्यांस मदत केल्याशिवाय शेतकरी तगणें शक्य नाही. अेकदा अशी झडती केल्यानंतर पूर्वीच्या चुका न होतील, अशासाठी कांही व्यवस्था लावून द्यावी लागेल. नुसते कायदे कडक करून व व्यवहाराच्या पावलोंपावलीं परवानगी मिळविण्याची आडकाठी अुत्पन्न करून हें काम व्हावयाचें नाही. संघानेच सामुदायिक जबाबदारीच्या योगाने व्यक्तीला मजबूत केल पाहिजे.

आजच्या सावकार वर्गाला परिस्थितीचें यथार्थ आकलन करून देणारें कडकडीत शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आहे ही स्थिति चालणें शक्य नाही. ज्याप्रमाणे रात्रीं निजून म्हणजे अेका रीतीने मरून

दुसरे दिवशीं आपण नव्या दमाने अुठतों त्याप्रमाणे सावकार वर्गाने आजच्या अंकावर पडदा पाडून व तसे करतांना सोसावी लागणारी कळ सोसून सुरवातीला सांगितल्याप्रमाणे नवीन अंकाला सुरवात केली पाहिजे. ही नवी घडी बसविण्यास संघाची मदत पुष्कळ होअील.

जीवनच जर निःसत्त्व झालें तर कायदे काय आणि संघ काय, धर्म काय आणि धुरीण काय, कशानेच गाडा चालता व्हावयाचा नाही. खेडेगांवांतील अुद्योगधंदे पुनः चालते केले पाहिजेत. तेथेंहि नवीन दिशा आणि नवीन वळण हीं आवश्यक आहेतच. अुद्योगधंदे वाढले, सामाजिक पुरुषार्थ वाढला म्हणजे वाहतें जीवन आपोआप शुद्ध आणि जोमदार होतें. अुद्योगी राष्ट्रांतील विचारी लोक स्वतःस लागणारा माल अुत्तम रीतीने कसा तयार होअील याचा विचार करीत असतात. देशांत बाहेरून येणारा माल मूळ कोठे तयार होतो, कसा तयार होतो, त्याचें रूपांतर कोण व कसें करतें, मालाची ने-आण कोण करतें, आणि त्या मालाला दिलेल्या किमतींत कोणाकोणाचा कसा नफा विभागला जातो या सर्व गोष्टींचा छडा लावतात. त्याच-प्रमाणे देशांतून बाहेर जाणारा माल कोण कशासाठी कोठे घेअून जातो, त्याचें रूपांतर कसें होतें, तो माल कोणत्या कामीं लागतो व शेवटीं कोठे पोहोंचतो याचीहि त्यांनी माहिती काढलेली असते व या सर्व व्यवहारांत कोणता भाग आपल्याकडे असणें योग्य आहे, किती नफ्याचे आपण धनी आहोंत याचें ज्ञान ते मिळवितात. गुजराथमधील अेक शेतकरी दर वर्षी हजारों रुपयांची फळें पैदा करतो अितकेंच नव्हे तर कराची, लाहोर, दिल्ली, मद्रास वगैरे दूरवर प्रवास करून तेथील गिऱ्हाअिकांच्या घरीं माल पोहोंचेपर्यंतचा सर्व नफा स्वतःस कसा मिळेल याच्या तजविजींत असतो. त्याच्या वृद्ध पित्याला हिंदु-स्थानांतून विलायतचें टपाल विमानांतून जातें असें सांगितल्याबरोबर तो चटकन अुद्‌गारला, 'तर मग आमचे आंबे, चिकू आणि बोरें विमानांतून विलायतेला कां पाठवूं नयेत ? फळें मोसम सुरूं

होण्यापूर्वीं पिकावयास लागतात, व कांही झाडें मोसम संपल्यानंतर पाडास येतात, त्यांना भाव चांगला आलाच पाहिजे.'

सर्व जगाचा व्यापार करण्याची हाव मनांत न बाळगतां, जर आपले शेतकरी वरील वृद्धाप्रमाणे जागरूक झाले तर हिंदुस्थानचें दैन्य दूर होईल. जागरूक व कर्तबगार शेतकऱ्यांनी काढलेलें कर्ज त्यांना बुडवत नाही. अुलट, पोहण्याच्या फुग्याप्रमाणे, रबरी कड्या-प्रमाणे अथवा बुचाच्या जाकिटाप्रमाणे तरून जाण्यास मदतच करतें.

## ११

## व्यसनें

दारूपेक्षा अफू वाअीट, खोडकरपणापेक्षा अंदीपणा वाअीट, घोडे अुडविण्याच्या हौशीपेक्षा पालखीमेण्याची हौस वाअीट, अेवढें जर लोकांना पटलें तर समाजांतील व्यसनाची मीमांसा करणें आपल्याला अधिक सोपें जाअील. रजोगुण अतिशय चुळबुळ करतो, तमोगुण कोणाच्याहि अध्यांत ना मध्यांत स्वस्थ पडून असतो, म्हणून तो सत्त्व गुणास अधिक जवळ असल्याचा भास होणें स्वाभाविक आहे. पण तमोगुण हा सर्व बाजूंनी अधिक घातुक आहे; अभ्युदय आणि निःश्रेयस् दोन्ही बुडवणारा आहे; हें समजलें तर व्यसनांत देखील अुजवें डावें ठरविणें लोकांना साधेल.

व्यसनें सर्व येथून तेथून वाअीटच, पण कांही व्यसनांमध्ये डोकें चालवावें लागतें, हिकमती योजाव्या लागतात, आणि निरनिराळ्या कला अवगत करून घ्याव्या लागतात. अुलटपक्षी, कांही व्यसनें मनुष्याला त्याच्या माणुसकीचा व सर्व शक्तींचा विसर पाडतात. हीं दुसऱ्या प्रकारचीं व्यसनें ज्या समाजांत बोकाळलीं त्या समाजाची धडगत नाही; कारण तें जिवंतपणींच मरण आहे.

आपल्याला येथे खेडेगांवांतील खास व्यसनांचा विचार कर्तव्य आहे. दारू, अफू, गांजा वगैरे व्यसनांचा विचार करण्यापूर्वी कांहीहि न करतां वायफळ गप्पा मारणें आणि अड्ड्यांत ( मजलशींत ) हजर नसलेल्या लोकांची निंदा करण्यांत वाटेल तेवढा वेळ घालविणें हें व्यसन सर्वांत मोठें आहे. वायफळ गप्पाने मनुष्याचा पुरुषार्थ जितका क्षीण होतो तितका विषयसेवनानेहि कदाचित् होत नसेल. वाक्पात हा वीर्यपाताहून देखील अधिक अशक्ति अुत्पन्न करणारा आहे, असें बोलून बोलून थकणाऱ्यांविषयीं वैद्यकशास्त्राने म्हटलें आहे. 'वाक्-पातो वीर्यपातात् गरीयान्' हीच गोष्ट आध्यात्मिक अर्थानेहि खरी आहे. खेडेगांवांतील हें व्यसन काढून टाकण्यासाठी खेडेगांवांतील तरुणांमध्ये अेक जबरदस्त चळवळ चालविली पाहिजे. सामाजिक संस्कृति टिकविण्यासाठी टीकाशास्त्र आवश्यक आहे, असें म्हणतात व तें बऱ्याच अंशीं खरेंहि आहे. पण वायफळ गप्पा आणि हजर नसलेल्यांची कुटाळकी हें कांही सामाजिक अुन्नतीचें शस्त्र नव्हे. या-योगे समाज दिवसेंदिवस खालावतच जातो. भल्या पहांटे अुठून न्याहारी आटोपून शेतावर पोहोंचणें हें अेक शेतकऱ्याचें भूषण मानलें जात असे. रात्रीं जागरण कितीहि होवो, शेतकरी म्हटला म्हणजे भल्या पहांटेच अुठावयाचा. त्याअैवजी आतां अुशीराने अुठणें शिष्ट-पणाचें लक्षण मानलें जाअूं लागलें आहे. न्याहारीच्या अैवजी जेथे चहाचा प्रचार सुरू झाला आहे तेथे अर्धीमुर्धी सकाळ जवळ जवळ फुकटच जाते. हें व्यसन आहे हेंच लोकांच्या लक्षांत अजून आलें नाही.

आपल्या पूर्वजांनी शेंकडों पिढ्यांच्या कडक आग्रहाने स्वच्छता आणि शुचिर्भूतपणा यांच्या संवयी समाजांत रूढ केल्या होत्या; त्याहि आतां ढिल्या होत चालल्या आहेत, या गोष्टीकडे पुरेसें लक्ष गेलें नाही. आहारशुद्धि, शरीरशुद्धि, वस्त्रशुद्धि आणि वाणीची शुद्धि या गोष्टी संस्कृतीच्या अगदी पायाशी आहेत. कदाचित् कपडे पूर्वीपेक्षा आजचे लोक अधिक साफसूफ ठेवीत असतील, पण बाकीच्या बाब-

तींत शिथिलता वाढत आहे. पूर्वींचे लोक कपडे वापरतच फार थोडे. बाहेर जातांना घालण्याचे कपडे, धोतरसुद्धा निराळें असे व तें जपून घडी करून ठेवलेलें असे. आपल्या देशांत कपडे कमी वापरणाराला क्षयरोग आणि चामडीचे रोग बरेच कमी होतात असा वैद्यकीय अनुभव आहे. कपड्याची फॅशन वाढवून आपण खर्च वाढविला, रोगराअी वाढविली, अस्वच्छतेचें अेक साधन वाढविलें आणि कपडे खेडेगांवांत तयार होत नसल्याने दारिद्र्यवृद्धीचें साधनहि वाढविलें. अुगीचच्या अुगीच कपड्यांवर कपडे चढविणें याला व्यसन कां म्हणूं नये हाहि अेक प्रश्नच आहे.

कांही व्यसनें अितकीं रूढ आणि दृढमूल झालेलीं असतात की, त्यांच्या विरुद्ध लोकांची धर्मबुद्धिच बोथट झालेली असते. अश्लील शब्द वाटेल तेव्हा वाटेल तसे वापरणें, अेकमेकांला घाणेरड्या शिव्या देणें आणि स्त्रियांच्या समोर आणि मुलांमुलींच्या समोर देखील न लाजतां विचकट बोलणें याचें खेडेगांवांतील लोकांना कांहीच वाटत नाही. हा दोष सर्व जगभर पसरलेला असला तरी तो काढण्याजोगा नाही असें मात्र नव्हे.

आणि जणूं काय अश्लील शब्दांचें शब्दभांडार रिकामें होअील, शब्द न वापरल्याने गळून पडतील, या भयाने शिमग्यासारखे सण रूढीने चालू ठेविले आहेत. शिमग्याचा सण हा गुलामगिरीचें द्योतक आहे. तो बदलून टाकला पाहिजे, त्याचें शुद्धीकरण झालें पाहिजे.

समाजाला आंतून पोखरून खाणारें व्यसन म्हणजे वैवाहिक नीतिसंबंध भ्रष्ट करण्याचें होय. अेकाकाळीं वेश्यागमन आपल्या देशांत अमर्याद बोकाळलेलें होतें. हल्लीं तें बरेच कमी झालें आहे असें म्हणतां येअील. व्यभिचाराविषयीं असें म्हणतां येअील किंवा नाही हें सांगवत नाही. तरुणांमध्यें स्वतःला नामर्द करण्याचें व्यसन पूर्वीं कितपत होतें याची कल्पना करणें कठीण आहे. आज हें व्यसन शहरांत काय व खेडगांवांतून काय बरेंच पसरलेलें आहे. या व्यसनाला आळा घाल-

ण्याचें काम शाळामास्तर आणि आखाडयांतील वस्ताद केव्हा केव्हा करतात पण केव्हा केव्हा शेताच्या राखणीस घातलेलें कुंपणच शेत खाअून जातें. आअीबापांची बेदरकारी न समजण्याजोगी आणि अक्षम्य आहे. फॅशनचा नाजूकपणा वाढल्यामुळे शरीरसंवर्धनाकडे लक्ष कमी दिलें जातें. वाढत्या अंगाच्या तरुणवयीं, निर्दोष व पौष्टिक आहार मिळावयास पाहिजे आणि शरीरांतील सर्व वीर्याचा अगदी घाम होअून जाअीतोंपर्यंत मेहनत व कसरत मिळाली पाहिजे. त्या अैवजी जिभेला केवळ चटक लावणारा असा नि:सत्व आहार, कपडयांचा आणि केसांचा थाट, आणि अकालीं वार्धक्य आणणारे बैठे खेळ यांचेंच वातावरण वाढलेलें आहे. पूर्वीं खेडेगांवांतून तरुणांमध्ये पक्षा-पक्षांच्या मारामाऱ्या होत असत. आज मारामाऱ्या कमी झाल्या असल्या तरी पक्षापक्षी कमी झालेली नाही.

तंबाखूचें व्यसन वाढत्या प्रमाणावर आहे असें म्हणावें लागतें. या व्यसनामुळे दांत बिघडतात, गळ्याचे रोग होतात, फुप्फुसाचे रोग कायमचें घर करून बसतात, आणि टॉल्स्टॉयचें म्हणणें तर असें आहे की, सदसद्विवेकबुद्धि आणि चारित्र्याची दृढता या दोहोंचा चेंदामेंदा करून टाकण्याची शक्ति दारूपेक्षा तंबाखूंत अधिक आहे. त्याने अुदाहरण दिलें आहे की, अेका अिसमाला खून करण्याची हिंमत होअीना म्हणून त्याने प्रथम दारूच्या बाटल्या झोंकल्या पण खून हें निंद्य कर्म आहे, तें आपण करूं नये अशी आंतील टोंचणी कांही केल्या मरेना. शेवटी त्याने चिरूटाचा आश्रय केला. मग मात्र न्यायबुद्धि, धर्मबुद्धि, दयाबुद्धि सर्व लयास जाऊन तो 'मर्द' बनला, आणि त्याने योजलेलें नीच कृत्य केलें.

तंबाखूची शेती करणें यांत कांही चूक आहे असें शेतकऱ्यांना क्वचित्च वाटतें. राज्यकर्त्यांनी ज्या वस्तूला फॅशनेबल ठरविलें तिचा विरोध करण्याची लोक हिंमतच सोडून देतात आणि तंबाखू तर मोंगल काळापासून राजमान्य होअून बसली आहे. ज्यांना घरीं पोट-

भर खावयास मिळत नाही, अर्धपोटीं अुठणाऱ्या पोटच्या लेकरांचीं केंविलवाणीं तोंडें ज्यांना प्रत्यहीं निदान वर्षांतून पांचसात महिने पहावीं लागतात, त्यांना देखील तंबाखूसाठी पैसे खर्च करतांना पाहून दु:खाअितकेंच आश्चर्य वाटतें. हिंदुस्थानांत दरवर्षीं किती रुपयांची तंबाखू वापरली जाते याचा आंकडा प्रत्येकानें घोकून ठेविला पाहिजे.

अफू, गांजा, दारू, कोकेन वगैरे पदार्थ तर व्यसनांचा राजा. त्यांचें साम्राज्य अितकें मजबूत आहे की, तें तोडण्यासाठी धर्मनिष्ठाचें अेक मोठें पथकच अुत्पन्न झालें पाहिजे. मनुष्य अफू खातो कां अफू मनुष्याला खाते हें सांगणें कठीण आहे. रजपूत, गराशिया, जमीनदार वगैरे लोकांत अफूचें व्यसन बोकाळल्यामुळे देशांतील अेक मोठा कर्तबगार वर्ग अगदीच नि:सत्व व महत्त्वाकांक्षाशून्य होअूं लागला आहे. सर्व सामाजिक शक्तींचा ओघ हीं व्यसनें दूर करण्याकडे लावला पाहिजे. कपट आणि हिंसा अेवढें टाकून बाकीच्या अुपायांनी दारू, अफू, आदि व्यसनांचा नायनाट करितां येअील त्या बाजूनें केला पाहिजे. आसाम ओरिस्सा सारख्या प्रांतात ही हें व्यसन वाढलेले आढळते.

दारूमुळे शरीरप्रकृति, धनसंपत्ति, अब्रू आणि नीति सर्वांचाच नाश होतो. समाजाचें समाजतत्त्वच नष्ट करण्याची दारूची प्रवृत्ति आहे. हें बालंबाल अनुभवास आलें असूनहि जगांतील लोक दारूच्या नाशास प्रवृत्त होत नाहीत याचें आश्चर्य वाटतें. हिंदुस्थानांत या व्यसनांचा नायनाट करणें अितर किती तरी देशांपेक्षा सोपें आहे. प्रयत्नच झाले पाहिजेत.

घोडयांच्या शर्यती व तेथें चालणारा जुगार या व्यसनांमुळे अँग्लो-अिंडियन लोकांची बरीच पायमल्ली झाली आहे. पण सामान्य जुगार ठिकठिकाणीं दिसून येतो. कोठे कोठे तर जन्माष्टमीच्या शुभ मुहूर्तीं जुगाराला सुरवात होते किंवा भरती येते. जुगार हें चांगलेंच जुनें स्वदेशी व्यसन आहे. त्याला नष्ट करण्यास जालीम अुपायच योजले पाहिजेत.

# १२

## अुधळपट्टी

अवास्तव खर्च अथवा अुधळपट्टी खरोखर दोष आहे किंवा काय असा प्रश्न विचारण्याअितकीं कांही राष्ट्रें आज माजलीं आहेत. त्यांचा प्रश्न बाजूस ठेवूं व दरिद्री हिंदुस्थानाचाच विचार करूं. देशांत लोक अुपासमारीनें मरत असतांना , हातीं साधन आलें आहे अेवढ्या-साठी अुधळपट्टी करणें हा खरोखर समाजद्रोह आहे. पण आपल्या येथे कांही जुन्या चालीरीतींमुळे मनुष्याला अिच्छा नसतांनाहि अुधळपट्टी करावी लागते याचें अतिशय दुःख वाटतें. याचें अगदी प्राथमिक स्वरूप म्हणजे घरांतील लोकांच्या आवश्यकतेहून अधिक अन्न रोज शिजविलें पाहिजे अशी जुन्या कुटुंबांमधून धार्मिक समजूत आहे. तुपासारखा खाण्याचा पदार्थ दिवे लावण्याकडे किंवा हवन म्हणून जाळण्याकडे वापरणें हेंहि धर्माच्या नांवानेंच घडत असतें. यांत अुधळपट्टी असून त्याखेरीज हवा बिघडविणें आणि ज्या वासरांच्या तोंडांत मारून आपण दूध काढून घेतों त्यांचा द्रोह करणें हे अधिक दोष येतात. अुत्सवप्रसंगीं दरवाजांत दुधाच्या घागरी चिखल होअीतों ओतण्याचा रिवाज होता असें आपण वाचतों. हाहि याच प्रकारचा दोष होय. अुधळपट्टी हा श्रीमंती दाखविण्याचा अेक प्रकार आहे. अज्ञानानें होणारी अुधळपट्टी याहून निराळी असते. खताच्या अुपयोगीं पड-णारें मूल्यवान शेण, जळण म्हणून आपण वापरतों ही अुधळपट्टी अज्ञानमूलक आहे.

वर्षभर राबल्यानंतर घरांत जेव्हा धान्याची रास येते तेव्हा शेतकऱ्याचे डोळे दिपून जातात, व तो खुषींत येअून राजा बनतो व मागचापुढचा विचार सोडून चार दिवस हवी तशी अुधळपट्टी

करतो, याचें कारण त्याला हिशेब येत नसतो, मागचापुढचा अंदाज नसतो हें होय. याचप्रमाणे घरांतील बायकाहि भांडींकुंडीं किंवा भपकेदार मोहक वस्तू विकत घेण्यासाठी घरांतील धान्य व जुने कपडे फुका सवंग देतात. या अुधळपट्टीच्या मुळाशीहि अंदाजाचा अभाव हेंच मुख्य कारण आहे. हातांत पैसा नसणें आणि सरळ खर्च करण्याची मोकळीक नसणें हींहि गौण कारणें आहेत.

नोकरी मिळवितांना, लग्नसंबंध जुळवितांना, वशिल्याने कामें करून घेतांना, अथवा मोठीं मोठीं कंत्राटें पदरांत पाडून घेतांना पुष्कळदा आपण आहोंत त्याहून अधिक श्रीमंत आहोंत असें भासविण्याची आवश्यकता असते. कर्ज काढतांना देखील लोकांना हाच प्रकार करावा लागतो व यामुळे तोलाबाहेर अुधळपट्टी होत असते. पुढच्या फायद्याच्या आशेवर लोभांत गुंतलेला मनुष्य आज खर्च करून मोकळा होतो व बरेच वेळां पुढे पेचांत येतो. पाहुणचार हें प्रेमाचें अथवा समाजसेवेचें तत्त्व देखील घमेंड आणि बडेजावीचें साधन होअून बसलें आहे.

अुधळपट्टीचे हे सर्व प्रकार स्पष्ट दिसत असून देखील त्यांचा कोणी निषेध करीत नाही. समाजामध्ये अेकानें अुधळपट्टी चालविली तर दुसऱ्यास वाहत्या गंगेंत हात धुवून घेतां येतात. अशा स्थितींत समाज समजून असला तरी स्पष्ट बोलण्याची अिच्छाच करीत नाही. जेव्हा अुधळपट्टी हा अेक रिवाज होअून बसतो तेव्हा मात्र अेकाच्या चढाओढीने दुसऱ्यास अवास्तव खर्चांत अुतरावें लागतें, आणि मग मात्र लोक कुंथूं लागतात.

अुधळपट्टी हा सृष्टिरचनेविरुद्ध जसा गुन्हा आहे त्याचप्रमाणे तो समाजाविरुद्धहि गुन्हा आहे; हें ओळखून लोकांनी अुधळपट्टी करणाऱ्यांची कानअुघाडणीच केली पाहिजे. अुधळपट्टी करणाराची दाता, दानशूर, हौशी, रसिक, आस्थेवाअीक, मनुष्यप्रेमी, वगैरे शेलक्या विशेषणांनी खुशामत न करितां अुधळपट्टीमध्ये प्रतिष्ठा मुळीच नाही

असें समाजधुरीणांनी त्याला वजावून सांगितलें पाहिजे. द्रव्य ही सामाजिक वस्तु आहे, तिचा दुरुपयोग समाजाला सर्व बाजूंनी बाधक होतो हें ओळखून द्रव्याच्या दुरुपयोगाला समाजानें आळा घातला पाहिजे. अुत्सव, यात्रा, लग्नमुंजी, अित्यादि सार्वजनिक प्रसंगीं देखील निष्कारण होणारा खर्च आणि मेजवान्यांत होणारा अन्नाचा अपव्यय हीं सर्व असंस्कारितेचीं लक्षणें आहेत असें लोकमत नेहमी तयार करीत राहिलें पाहिजे. आजारीपणाच्या वेळीं घाबरून जाअून प्रेमातिरेकानें हवा तसा खर्च करणें यांतहि असंस्कारिता, भित्रेपणा, किंबहुना नास्तिकपणा आहे हीहि बाजू लोकांपुढे वारंवार मांडली पाहिजे; व ज्यांचेसाठी असा फाजील खर्च होतो त्यांनी स्वतःची लज्जा व नापसंति व्यक्त केली पाहिजे. अुधळपट्टी ही अधार्मिक आहे.

## १३

# सावकार

ज्याप्रमाणें मिशनरी लोकांनी आपल्या समाजव्यवस्थेची अेकेकाळीं पोटभर निंदा करून घेतली आणि समाजाला विस्कळित करण्याचें श्रेय पदरीं बांधून घेतलें, त्याचप्रमाणें सरकारी अम्मलदार आणि समाजहितैषी पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञ यांनी, अेक दोन पिढ्या होत आल्या, सावकारांची निंदा चालविली आहे. मिशनऱ्यांच्या टीकेमुळें विस्कळित झालेला समाज खडबडून जागा होअून ज्याप्रमाणें आतां पुनः जोमदार होअूं पहात आहे, त्याचप्रमाणें सावकार ही संस्थाहि स्वतःचे पिढीजात दोष टाकून देअून नव्या जोमानें आणि नवीन पद्धतीनें समाजाची सेवा करण्यास आणि सेवा करून समाजाचें पुढारीपण स्वीकाण्यास तयार झाली पाहिजे. राज्य गेलें म्हणजे ज्याप्रमाणें जुनी सेना बेकार होअून समाजाला भार-

भूत होते, नवीन संस्कृतीच्या नव्या संस्था राजाश्रयाच्या जोरावर प्रतिष्ठित झाल्या म्हणजे जुन्या संस्कृतीच्या जुन्या संस्था जशा कुजावयास लागून अथवा झुरणीस लागून घातुक बनतात, त्याचप्रमाणे सावकार या संस्थेचें झालें आहे.

जुन्या काळीं सावकार म्हणजे लोकांना व्याजाने पैसे कर्जाऊ देणारा केवळ दुकानदार नव्हता. सावकाराजवळ भांडवल असे, लोकांना त्याच्या भांडवलाची जरूर असे व व्याज घेऊन लोकांना तो भांडवल देअी हेंहि खरें, पण आजचा सावकार ज्याप्रमाणे नीतिशून्य कलाल बनला आहे तसा पूर्वीचा सावकार नव्हता. सावकार म्हणजे गांवचा पुढारी, सामाजिक नीतिमत्ता जिवंत ठेवण्याची जबाबदारी त्याची. अडीअडचणीच्या वेळेला तो लोकांना पैसे देत असे, अेवढेंच नव्हे तर सल्लामसलतहि देत असे. तो जबरदस्त व्याज घेत असे हें खरें पण अितकें व्याज घेअून तो कधी पाश्चिमात्य सराफासारखा लक्षाधीश झालेला नाही. तो व्याज कितीहि घेवो पण आपल्या गांवांतील कोणालाहि बुडूं द्यावयाचें नाही, मोडूं द्यावयाचें नाही असा त्याचा बाणा म्हणा, अथवा सामाजिक आदर्श म्हणा, असे. यामुळे त्याचें सर्व कर्ज वसूल होत असेच असें नाही. त्याला बुडित कुळांमुळे जें नुकसान सोसावें लागे तें अधिक व्याजांतून तो भरून काढीत असे अेवढेंच.

सावकार आणि रयत अेकाच समाजांतील असल्याने व दोघांचा अन्योन्याश्रय स्वभावसिद्ध असल्याने सावकाराचा रयतेला अनेक बाजूंनी पाठिंबा असे. सावकार हा प्रजाभक्षक नसून पित्यासारखा प्रजारक्षक असे. कोणी अनाचारी निघाला तर त्याची अुघडपणे कानअुघाडणी करून त्याला ताळ्यावर आणण्याचें काम सावकाराचें असे. गरीबांच्या घरच्या वैवाहिक अडचणी, घरगुती भांडणतंटे, आजार अथवा अितर अडचणी अशा सर्व प्रसंगीं लोकांना सावकाराची अूब असे. सार्वजनिक कामामध्ये पुढाकार घ्यावयाचा तोहि सावकारानेच.

गोर-गरीबांच्या लहानसहान ठेवी ठेवण्याची जागा देखील सावकारच. सावकाराने अेखाद्यास कर्ज देण्याचें नाकारलें तर त्याची आर्थिक पत नाहीशी होअी, अेवढेंच नव्हे तर तो मनुष्य सामाजिक नीतीच्या दृष्टीनेहि नालायक ठरत असे. ज्याप्रमाणे अेखाद्याकडे स्वतःचें बिल थकलें आहे अेवढ्यासाठी खरा डॉक्टर औषध देण्याचें नाकारीत नसतो, त्याचप्रमाणे अेखाद्याची आर्थिक स्थिति संशयांत येअून पडली आहे अेवढ्यासाठी सावकार कर्ज देण्याचें नाकारीत नसे. मनुष्य व्यवहार-बुद्धीनें भ्रष्ट झाला अथवा त्याची दानत बिघडली अशी खात्री झाली अथवा तो व्यसनांत चांगलाच बुडाला असला तरच सावकार त्याला कर्ज नाकारणार ! अर्थात् कर्ज बंद होणें ही सामाजिक नाचक्की असे.

वरील चित्र केवळ आदर्श नसून अशा प्रकारची समाजसेवा करणारे सावकार ठिकठिकाणीं असत. सावकार हें समाजाचें आवश्यक व महत्त्वाचें अंग असल्याने त्यांचा कोणास हेवा वाटत नसे. वरील आदर्श टिकविणें हें अर्थात् प्रत्येकाच्या धर्मबुद्धीवर अवलंबून असे. सावकार केवळ पैशाकडे पाहूं लागला, लोकांना पिळून स्वतःचें अुखळ पांढरें करूं लागला तर त्याला अडविण्याचें अथवा रोकण्याचें सरळ साधन कांहीच नसे. त्याची धर्मबुद्धी, कुलपरंपरेची चाड, सामाजिक प्रतिष्ठा आणि समाजाच्या स्थूल न्यायबुद्धीच्या पुण्यप्रकोपाची दहशत, हेच अंकुश सावकारावर असत व यामुळे सावकाराची सेवा अव्याहत चाले.

आधुनिक सरकाराने सामाजिक पुण्यप्रकोपाची नांगी मोडून टाकिली आहे. कायदेकोर्टांनी सामाजिक जबाबदारीविषयीं आंधळेपणा स्वीकारला आहे, आणि नागड्या स्वार्थाला राजमान्यता दिली आहे; व अितकें केल्यानंतर सावकार म्हणजे प्रजेला लागलेल्या जळवा अशी हाकाटी सुरू करून सावकाराची लोकप्रियता अगदी तोडून टाकिली आहे. अेकीकडे सावकाराला बेजबाबदार होण्यास व बिघडण्यास अुत्तेजन

देणें व दुसरीकडे सावकार हा वर्गच प्रजाद्रोही आहे असें युक्तीनें लोकमत तयार करणें असा हा आश्चर्यकारक खेळ चालू आहे.

सावकाराला अुडवून देअून त्याच्या जागीं पतपेढ्या स्थापून खेडेगांवांतील लोकांचा सर्व आर्थिक व्यवहार सरकारी वळणांत आणावयाचा, कर्ज देण्यांत अुदारता आणिली तरी माणुसकीचा संबंध त्यांतून काढून टाकावयाचा व खेडेगांवांचें सांपत्तिक जीवन शहराच्या सांपत्तिक जीवनाच्या शेपटास बांधून टाकावयाचें, अशी ही सगळी नीति जमली आहे.

या सर्व प्रकारांत अत्यंत कींव वाटते ती कर्ज काढणाऱ्या गरीब रयतेची नव्हे, पण आपल्या हातानें अथवा आपल्या आंधळेपणानें आणि मूर्खपणानें बिघडत चाललेल्या आणि नाश पावणाऱ्या सावकारवर्गाची.

सामाजिक नीतिमत्ता खालावत चालल्यामुळे, तसेंच खेडेगांवांतील अुत्पन्नाच्या बाबी कमी होअून खर्चाच्या बाबी वाढूं लागल्यामुळे सावकाराच्या धंद्यांतहि आता बरकत राहिली नाही. खेडेगांवांतील अुद्योगधंदे नष्ट झाल्यानें, दिलेलें कर्ज आतां अुत्पन्न वाढविण्याकडे वापरलें जात नाही. शेतकऱ्यामध्यें पेरलेले पैसे अुगवून हातीं परत येणें दुरापास्त झालें आहे.

कांही कांही ठिकाणीं सावकारींत कस राहिला नाही म्हणून सावकारांनी जीं क्षेत्रें सोडून दिलीं तेथे काबुलीवाले किंवा अितर दंडेलीचा कायदा चालविणारे क्रूर लोक सावकार म्हणून घुसले आहेत आणि प्रजा अधिकाधिक हवालदील होत चालली आहे.

प्राचीन काळची स्मृतिरम्य चित्रें रेखाटणें हें निराळें आणि प्राचीन काळचा पुनः अुद्धार करूं पहाणें निराळें. जो काळ गेला तो पुनः न येण्यासाठी गेला आहे हें विसरतां कामा नये. प्राचीन समाजव्यवस्था अथवा त्यांतील प्राचीन संस्था या पुनः चालू करितां याव-

याच्या नाहीत. तसें करणें शक्य असलें तरी नवीन काळांत प्राचीन गोष्टी कार्यकारी होणार नाहीत आणि हें सर्व शक्य झालें तरी जुन्या गोष्टींना फिरून चालन काय म्हणून द्यावें ? नवीन पिढीची स्वतःची म्हणून कांही जीवनप्रतिभा असली पाहिजे की नाही ?

प्राचीन व्यवस्थेंतील जीवनपोषक तत्त्वें ओळखून, नवीन रूपाने तीं अमलांत आणिलीं पाहिजेत.

व्यक्तीला ज्याप्रमाणे टेक असते, चारित्र्य असतें, जीवन कृतार्थ करण्याची वेळ आली असतां सर्वस्वाचा त्याग करण्याचें व वीरकर्म प्रकट करण्याची धर्मबुद्धि असते, त्याचप्रमाणे संस्थांनाहि टेक, चारित्र्य व धर्मबुद्धि हीं सर्व असतात व समाजाची सर्वांगीण अुन्नति करणारी हीं तत्त्वें प्रकट करण्याचें युग आतां प्राप्त झालें आहे. ज्या लोकांचें जीवन परस्पर ओतप्रोत आहे, अथवा ओतप्रोत होणें संभवनीय आहे अशांचे संघ बनवून त्या संघांनी सावकारी चालविली पाहिजे व त्या सावकारीमध्ये केवळ आर्थिक व्यवहाराचे नव्हे तर समग्र जीवन-व्यवहाराचे सिद्धांत ग्रथित केले पाहिजेत. अशा संघावर सरकारचा ताबा नसावा, समाजांतील प्रधान घटकांचा ताबा असावा, व तोहि बहु-मताच्या पद्धतीने न ठरवितां निःसंशय समाजमान्य अशा चारित्र्यशील व्यक्तींचा व कायमचा असावा. पिढीजाद राजाचे सामान्य दोष प्रजा ज्याप्रमाणे सहन करते, त्याप्रमाणे अशा पुढाऱ्यांचे दोष सहन करूनहि समाजाने त्यांच्या व्यवस्थेस स्थैर्य आणलें पाहिजे. मात्र अशा व्यवस्थेंत वंशपरंपरेचें तत्त्व घुसूं न देण्याची खबरदारी घेतलेली असावी.

अशा संघांत जुन्या वळणाच्या समाजहितैषी सावकारांना प्रथम स्थान दिलें पाहिजे. म्हणजे सहकारी पतपेढ्यांतील अिष्ट तत्त्वें आणि पिढीजाद सावकारींतील अिष्ट तत्त्वें यांचा मिलाफ होअील.

वाटल्यास मध्यवर्ती शासनसंस्थेने चारित्र्यवान व ग्रामसेवक तरुणांना थोडेंसें भांडवल पुरवून व नियम लावून देअून खेडेगांवांतील

लोकांमध्ये नवीन प्रकारची सावकारी करावयास प्रोत्साहन द्यावें, आणि अशा सावकारी भांडवलाच्या मदतीने खेडेगांवांतील नव्या जुन्या धंद्यांचें पुनरुज्जीवन कसें होओील याकडे लक्ष द्यावें.

आळस, अव्यवस्था, अप्रामाणिकपणा आणि पक्षपात या चार गोष्टी टाळल्या तर नव्या सावकारीच्या द्वारां ग्रामोद्धार बराच करतां येअील.

## १४

## कोर्टबाजी

हिंदुस्थानांत पराक्रम गाजविणाऱ्या कोठल्याशा अेका गोऱ्या सेनापतीच्या चरित्रांत वाचल्याचें आठवतें की, तो आपली फौज घेअून बंगाल्यांत प्रवास करीत असतां अेका गांवांतील लोक आपल्या सर्व चीजवस्तूंनिशी जीव घेअून पळत आहेत असें त्याने पाहिलें. लोकांना थांबवून त्याने विचारलें, 'तुमच्यावर असें काय संकट आलें आहे की, गांव सोडून तुम्ही पळत आहांत ? आमची अेवढी मोठी फौज आहे, आम्ही तुमचें सहज रक्षण करूं शकूं.' लोकांनी अुत्तर दिलें, 'तसाच कोणी शत्रु असता तर आम्ही तुमचें रक्षण मागितलें असतें. आम्ही आमचें गांव सोडून जातों आहोंत याचें कारण निराळें आहे. आम्ही अैकलें आहे की, आमच्या येथे ब्रिटिश अदालत स्थापन होणार आहे. अेवढ्यासाठी आम्ही देशत्याग करीत आहोंत.' हा अनुभव नमूद करतांना त्या गोऱ्या सेनापतीला काय वाटलें असेल ? ब्रिटिश लोकांना त्यांच्या न्यायाबद्दल नेहमी अभिमान वाटत असतो. सतराव्या शतकाच्या सुरवातीला मद्रासकडील अेका संस्कृत कवीने ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेची मुक्त कंठाने स्तुतीच केली आहे. असें असतांना लोकांनी कोर्टांना कां भ्यावें ?

ब्रिटिशपद्धतीचा न्याय कितीहि काटेतोल असला तरी तो फार खर्चाळ आहे, स्वस्त नाही, सोपा नाही. त्याचें शेपूट लवकर संपत नाही आणि कोर्टांत जाणाऱ्या लोकांची नीतिमत्ता वाढते असा ही अनुभव नाही. त्यामुळे धोपटमार्गी न्यायाने स्वतःचा व्यवहार चालविणाऱ्या पंचप्रमुख प्रजेला त्याची भीति वाटणें स्वाभाविक होतें. न्यायकोर्टामध्ये कायद्याच्या तत्त्वांची ज़ी छाननी केली आहे ती खरोखर प्रशंसेस पात्र आहे. पण त्याच्या मुळाशी ज्याप्रकारचा सामाजिक स्वभाव कल्पिलेला आहे तसला स्वभाव आपल्या लोकांचा नाही. मुळांत हा संस्कृतिभेदाचा प्रश्न आहे. आपलें जीवन अधिक सामाजिक होतें. लहानशा वर्तुळांत कां होओीना आपले लोक परस्परावलंबनाने राहतात व ज्या समाजांतील व्यवहाराचा झगडा असेल त्याच समाजांतील शहाण्यासुरत्या व दोन्ही पक्षांना ओळखणाऱ्या अशा पंचांमार्फत न्याय मिळविण्याची आपल्याला पूर्वीपासूनची संवय होती. व सामाजिक न्यायांत तराजू घेअून बसलेल्या व डोळे बांधून तरवार अुपसणाऱ्या न्यायदेवतेला संतुष्ट करावयाचा विचार नसून, व्यवहार सुरळीत चालेल, सामाजिक संबंध संभाळले जातील आणि लफंग्या लोकांना गुन्हा करण्यास अुत्तेजन मिळणार नाही अेवढीच बाळबोध दृष्टि ठेवण्यांत येअी. प्रेम आणि सहकार यांना विसरून जाणारा तागडीचा न्याय आपल्या लोकांनी मानलेला नव्हता; हा संस्कृतीचा मोठा फरक आहे.

ज्याप्रमाणे लहान व्यापाऱ्यांना भांडवल व्याजीं देअून धूर्त सावकार त्यांच्या धंद्यांतील बहुतेक सगळा कस चोखून घेतो त्याचप्रमाणे कोर्टें आणि कोर्टांच्या दारांत बसलेले वकील हे भांडणाऱ्या लोकांना न्याय मिळवून देतां देतां अगदी सोलून काढतात. आणि या न्यायाचें विधि-विधान अितकें लांबलचक असतें की, कोर्टाच्या चक्रांत मनुष्य अेकदा सांपडला म्हणजे त्याला नित्याच्या व्यवहाराकडे लक्ष देणेंहि जवळ जवळ दुरापास्त होतें. खेडेगांवांतील लोकांना तर कोर्टांच्या मागोमाग जातां जातां नाकीं नअू येतात आणि आजारांत

चांगला डॉक्टर मिळविणें हें जसें धनवंताच्याच भाग्यांत लिहिलेलें असतें त्याचप्रमाणें चांगला वकील मिळविणें हें देखील मोठ्या थैलीचेंच भाग्य आहे.

ज्याप्रमाणे धर्मप्रचारक, मिशनरी लोक स्वतःच्या धर्माची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी गोरगरिबांना औषधें देण्याची सोय अगदी फुकट व पुष्कळ वेळां कळकळीने करतात, त्याप्रमाणे आपल्या देशांतील बऱ्याचशा धर्मनिष्ठ कायदेपंडितांनी मिशनरी बनून लोकांना न्याय मिळवून दिला पाहिजे आणि त्यावरोबर न्यायाचें शिक्षणहि दिलें पाहिजे. खरा डॉक्टर ज्याप्रमाणे रोग्याला औषध देऊन स्वस्थ बसत नाही पण रोगाची कारणें समजावून देऊन रोग न होण्यासाठी काय काय केलें पाहिजे हें समजावून सांगतो, त्याप्रमाणे खरा कायदेपंडित समाजाला कायद्याचीं कलमें चुकविण्यासाठी अुलटयासुलटया कशा अुडया माराव्यात आणि कोणत्याहि घटनेला बुद्धीच्या शिताफीने हवा तो रंग कसा द्यावा हें शिकविण्याच्या अैवजी आपला व्यवहार कसा चोख ठेवावा याचेंच शिक्षण देअील. विद्यादानाचा ज्याप्रमाणे किफायतशीर धंदा होअू न देतां आपण त्याला समाजसेवेचा अेक पवित्र भाग बनवितो, त्याचप्रमाणे व्यवहारांत वुद्धिदान किंवा न्यायदान हेंहि अडचणींत सांपडलेल्या लोकांकडून पैसे अुकळण्याचें साधन न होतां समाजाचें कल्याण करण्याची ती अेक तपश्चर्या झाली पाहिजे.

अितिहास संशोधनाच्या बाबतींत ज्याप्रमाणे प्रथम पाश्चिमात्यांनी सुरवात केली पण आतां या देशांतील विद्वानांनी येथील संस्कृति यथार्थपणे समजून घेअून या विषयांत स्वदेशी पाया घातला आहे, त्याच प्रमाणे वैद्यक व न्यायखातें या दोन्ही बाबतींत पूर्वपरंपरा ओळखून, समाजाची नाडी तपासून, स्वदेशी पद्धत चालू केली पाहिजे. आजचे डॉक्टर आणि वकील केवळ गोऱ्यांचे अनुसरण करणारे शिष्य आहेत. या लोकांनी मनावर घेतल्यास या दोन्ही क्षेत्रांतील सबंध पायाच बदलणें अशक्य नाही. पण तसें करण्यास असाधारण

स्वार्थत्याग हवा आहे. देवांनीच यज्ञांना विरोध केला तर त्यांची चंगळ कशी चालेल ?

पुष्कळदा असें होते कीं, चालत्या स्थितीविषयीं ज्यांच्या हृदयांत असंतोष आहे, चालू पद्धतीचे दोष ज्यांना बरोबर समजले आहेत, आणि नवी घडी कोणत्या पद्धतीची असली पाहिजे याचीहि ज्यांना थोडीफार कल्पना आहे अशा लोकांमध्येहि जुनें बदलून नवें चालूं करण्याअितकें पुष्कळदा बुद्धिसामर्थ्य नसतें, तशी धमक नसते. अशा लोकांमध्ये आपापसांत सूक्ष्म मतभेद असल्याने त्यांचें संघटनहि होअूं शकत नाही आणि जुनी पद्धति तर संघटित, दृढमूल व प्रतिष्ठित असते. अशा स्थितींत सुधारकांची ओरड खरी असूनहि तिचा परिणाम होत नाही. आणि अशांनी केलेला दुर्बळ विरोध जुन्या पद्धतीचें कांहीं नुकसान करण्याअैवजी तिला मजबूतच बनवितो. शिक्षण, वैद्यकी व न्याय या तिन्ही क्षेत्रांत असें झालेलें आहे.

मनुष्याने जर अतिलोभाला बळी न पडतां, सज्जन लोकांशीच व्यवहार करावयाचें ठरविलें तर त्याला दोन्ही बाजूंच्या हिताहिताचा आणि स्वार्थाचा विचार करण्याची संवय सहज पडेल. अितकें असून जर मतभेद राहिलाच तर तिऱ्हाअीत तटस्थ पंचांमार्फत तो सोडवून घेणे मुळीच कठीण पडणार नाही. पण मनुष्य लोभाला बळी पडतो; आणि दोन्ही पक्षांनी आपापला स्वार्थ ताणावा असा नियम होअून बसतो. अेक दोन पिढ्या गेल्या, आपण म्हणत आलों आहोंत कीं कोर्टाच्या अैवजी लवाद-पंचायतीची स्थापना हवी. खरोखर पहातां पंचायतीची स्थापना होण्यास समाजांतील व्यवहारच अधिक शुद्ध व म्हणून मर्यादित होण्याची आवश्यकता आहे. शहरांतील व्यापारी वातावरणाला असें करणें कदाचित् जड जाअील पण खेडेगांवांतील व्यवहार सोपे व साधे असल्याने आणि परस्परसंबंध केवळ कराराचे नसून जीवनसंबंध असल्याने वरील सुधारणा खेडेगांवांतून सहजच झाली पाहिजे. आपले कज्जे कोर्टांत न्यावयाचे नाहीत असें जर कोणी व्रत

घेअील तर त्याला लवकरच पस्तावावें लागेल. कारण स्वतःचें भांडवल बुडवून सामाजिक सुधारणा करण्याचा दूरदृष्टी स्वार्थ फारच थोडया लोकांत असतो. पण कधी काळीं कोर्टांत जावें लागेल अशा प्रकारच्या व्यवहारांत पाअूलच टाकावयाचें नाही असें व्रत घेणें मात्र मनुष्याला शक्य आहे आणि हाच खेडेगांवांसाठी अेकमात्र मार्ग आहे.

कोर्टांत खऱ्याचें खोटें आणि खोटयाचें खरें केल्यावांचून निभाव लागत नाही असें सर्वच म्हणतात. पण मनुष्य जर दृढतापूर्वक आणि डोळयांत तेल घालून खरीखुरी वस्तुस्थितीच कोर्टापुढे नमूद करील तर कोर्टें कशींहि असोत, खाजगी व्यवहारांत तरी खराखुरा न्याय देण्याची कोर्टाची नैतिक जबाबदारी कोर्टास आपोआपच जाणवूं लागेल. मात्र यासाठी जो कालावधि लागेल तेवढा त्यागपूर्वक सोसला पाहिजे. अस्मानी (अीश्वरी कोपाच्या), व सुलतानी (राजाच्या जबरदस्तीच्या) कारणांमुळे होणारें नुकसान आपण मुकाटयाने सोसतों आणि तें जमेस धरूनच व्यवहार करतों, त्याचप्रमाणे रूहानी (आध्यात्मिक) कारणांसाठी सोसण्यास कां तयार होअूं नये ? अस्मानी-सुलतानी कारणें असूनहि जर व्यवहार सर्वस्वी बुडाला नाही तर रुहानी कारण कबूल केल्याने तो बुडेल असें मानण्यास कारण काय आहे ? वकील असोत किंवा समाजाचे पुढारी असोत, त्यांच्या हातून लोकांपुढे ही बाजू फारच थोडी मांडली जाते. शिक्षक किंवा प्रोफेसर ज्याप्रमाणे ठराविक पगार घेअून काम करतात त्याप्रमाणे ठराविक वेतनावरच वकिलांनी काम करण्याची पद्धत सुरू झाली पाहिजे आणि अपीलावर अपीलें करण्याची पद्धत अगदीच संपुष्टांत आणिली पाहिजे.

हें सर्व होअील तेव्हा होवो; आज खेडेगांवांतील प्रत्येकाने आपला व्यवहार सुधारून कोर्टें टाळण्याचाच प्रयत्न केला पाहिजे म्हणजे वसति सोडून पळून जाण्याचा प्रसंग येणार नाही.

## १५

# पंचायत अथवा लवाद

ग्रामसेवेमध्ये सर्वांत कठिण काम लवादाचें आहे. असें म्हणतात की, मोक्षसाधनेमध्यें सर्वांत शेवटचा विजय कामविकारावर मिळवावयाचा असतो. काम परिपूर्ण जिंकला म्हणजे मोक्ष जवळ आलाच म्हणून समजावें. त्याचप्रमाणे खऱ्या लवादाचें वातावरण स्थायी आणि समाजव्यापी झालें म्हणजे तेंच स्वराज्य असें म्हणतां येअील. लवाद स्थापन करण्याचे कामीं धीर धरला पाहिजे. अुतावळीनें नासणें बरें नव्हे.

ज्याप्रमाणें खेडेगांवीं औषधोपचार करतांना आपण म्हणतों किंवा म्हटलें पाहिजे की, 'आम्ही कांही सशास्त्र शिक्षण घेतलेले वैद्य नव्हे; थोडासा अनुभव आहे आणि आमच्या अुपायांनीं निदान नुकसान होणार नाही अशी खात्री आहे म्हणून थोडें करून पाहतों; दुसरा योग्य मनुष्य मिळाल्यास तिकडे तुम्ही जा. रोग आमच्या आवाक्या बाहेर असेल तर प्रथमच तसें आम्ही सांगूं. प्रतारणा करणार नाही.' त्याचप्रमाणें लवादाचें काम हातीं घेतांना भिअून चाललें पाहिजे. जेथे अीर्ष्या, द्वेष, अत्यंत लोभ, जुनी अदावत अथवा सर्वनाशाचा प्रसंग असेल तेथे आपण होअून लवाद अुपस्थित करूं नये. लवादाचें काम बहुमताने कोणी तरी चार पांच पंच नेमून त्यांचे मार्फत होण्याजोगें नसतें. लवाद हा सामाजिक पुरुष असावा लागतो. चारित्र्याने, निरपेक्ष सेवेने, धर्मबुद्धीने अर्थात् सर्वांविषयींच्या कळकळीने तो 'अल् अमीन' झाला पाहिजे.

लवादाचा विचार करतांना सर्वांत महत्त्वाची गोष्ट जी प्रथम-पासूनच ध्यानांत ठेविली पाहिजे ती ही कीं, लवाद म्हणजे कोर्टांतील खर्च आणि कोर्टांतील दिरंगाअी टाळून कोर्टाचाच न्याय देण्याची सोपी पद्धति नव्हे. लवादाने फक्त अेवढेंच काम केलें आणि कायदा

पाहून, पुराव्याचा विचार करून कोर्टाच्याच पद्धतीने कोर्टांत मिळणाराच न्याय दिला तरी लवादाने अुपयोगी काम केलें असें म्हणतां येअील. वेळ आणि खर्च वांचेल आणि आपण आगाअू पसंत केलेल्या माणसांच्या हातून न्याय मिळविण्याची व स्वीकारण्याची संवय लोकांना लागेल. पण लवादाचा हा खरा अुपयोग नव्हे.

कोर्टांत मिळणारा न्याय कितीहि काटेतोल असला तरी तो माणुसकीचा न्याय नव्हे. शुद्ध सामाजिक न्याय नव्हे. कोर्टांची न्यायदेवता जाणूनबुजून आंधळी होते. विवादी अशा दोन्ही पक्षांमध्यें शेवटीं सलोखा करण्याची दृष्टि कायद्यांत नसते. अेका हातांतील तलवारीने लोकांमधील सहकार, प्रेमसंबंध, घरोबा यांचा वध करून दुसऱ्या हातांतील तागडीने मालमत्तेचीं शकलें करून वाटून देण्याचें काम कोर्टातील न्यायदेवता करीत आली आहे. दोन पक्षांमधील भलेपणाचा नाश झाल्यानंतर यहुदी शायलॉकप्रमाणे मांसाचा रत्तल बरोबर तोलून घेण्याची वृत्ति बळावणारच. आणि त्या वृत्तीला संतुष्ट करण्याची जबाबदारी कोर्टातील न्यायदेवतेने 'स्वतःची' मानली आहे. कोर्टें पुष्कळदा अशा न्यायांत माणुसकीच्या दृष्टीने थोडाफार फेरफार करितात हें खरें, पण तें स्वतःचा मार्ग सोडूनच, न्यायाच्या आदर्शाला धरून नव्हे.

असमानता अन्यायमूलक आहे यांत शंका नाहीं. पण समानता न्यायमूलक असली तरी हीनवृत्तींतून अुत्पन्न झालेली असण्याचा संभव असतो. खरी स्थिति अैक्याची होय. जेथे हार्दिक अैक्य असेल तेथे असमानतेला अवकाश नसणार आणि समानतेचा आग्रह नसणार. वरील वाक्यांत अेक महान् जीवनतत्त्व ढिल्या भाषेंत मांडलेलें आहे. हेंच तत्त्व योग्य रीतीने समजून लवादाने वापरावयाचें आहे.

पैसा जोडणें हें जितकें व्यवहारांत महत्त्वाचें आहे, तितकेंच माणसें जोडणें हें अगत्याचें आहे. ही गोष्ट पक्षांध झालेल्या माण-

साला पटविण्याची जबाबदारी लवादाकडे आहे. दुष्टवृत्तीच्या अन्यायी मनुष्याचें सगळेंच जीवन अन्यायी किंवा दुष्ट नसतें. आणि तसें असलें तरी अशाला वांचवून जर त्याला सुधारणें शक्य असलें तर तसें करणें यांत मोठेपणा नसून तें आवश्यक कर्तव्यच आहे.

मनुष्य हा सामाजिक प्राणि आहे. त्याचे जीवन-संबंध अनेक लोकांशीं आलेले असतात. अपराध्याला शिक्षा करूं जातां, त्याच्याशी संबंध असलेल्या निरपराधी आणि दयापात्र अशा कितीतरी लोकांना संकटांत पडावें लागतें. सामाजिक न्यायाला हें कधीहि पसंत पडणार नाही. आपण पुष्कळदां म्हणतों की, 'दांत आपले व ओठ आपले, दांतांनी ओठ चावला म्हणून दांत पाडून टाकणें बरोबर होईल काय?' आपण म्हणतों 'अेकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारूं नये'. वासरूं मारण्यांत सुडाची बुद्धि तृप्त होईल; पण अेकाच्या ठिकाणीं दोन गोवध होतील. क्रूरतेचा अिन्साफ करण्यासाठी दुसरी क्रूरता केल्याने अन्यायाची फिटंफाट न होतां ती दुणावते. अेकाने शेजाऱ्याचा मुलगा ठार केला म्हणून शेजाऱ्याने किंवा शेजाऱ्याच्या वतीने सरकारी कोर्टानें त्याचा मुलगा ठार केल्यास कोर्टाच्या न्यायालाहि तें पसंत पडणार नाही. पण खून करणाऱ्यास फांशी दिल्याने आणि त्याची सर्व मालमत्ता जप्त केल्याने खुनी मनुष्य कायमचा सुटून जातो आणि त्याचीं अर्भकें मात्र वधाहून घोर अशी दुर्दशा अनुभवतात. जुनें वचन आहे कीं वृत्तिछेद करणें हें शिरच्छेद करण्याहूनहि अधिक घातकी आहे. अेखाद्याने अन्याय केला असतां त्याच्या हालअपेष्टा करणें आणि त्यांत संतोष मानणें हें समाजाला अिष्ट नसून अन्याय पुढे चालू न राहील, जुन्या अन्यायाचे दुष्परिणाम शक्य तितके कमी होतील आणि लोकांमध्ये प्रेम, सलोखा सहकार या सामाजिक वृत्तींचा विकास होईल आणि प्रत्येकाला त्याच्या योग्यतेनुसार निर्भयपणे डोकें वर काढण्यास अवकाश मिळेल असें करणें हा लवादाचा सामाजिक न्याय असतो.

समाजसेवकाने अुतावळ करून लवादाचें काम डोक्यावर घेतलें आणि कोर्ट पद्धतीचा न्याय तो देअू लागला तर त्याच्या निवाड्याचा अम्मल होणें दुरापास्त होअील, त्याच्यासंबंधाने नाही नाही ते गैर-समज अुत्पन्न होतील, ग्रामकंटक त्या परिस्थितीचा फायदा घेतील आणि लवादाचें काम तर बिघडेलच पण समाजसेवेचीं त्याचीं अन्य कामेंहि संकटांत येअून पडतील. जेथील वातावरण अत्यंत कलुषित आहे अशा ठिकाणीं प्रथमपासून लवादांत पडल्याने समाजसेवकांत देखील पक्षाभिमान अुत्पन्न होणें संभवनीय आहे आणि पक्षापक्षी हा खेडेगांवांतील सर्वोपरी दोष असल्याने पक्षाभिमानी मनुष्याला खरी ग्रामसेवा करणेंच अशक्य होअून जाअील. पक्षाभिमानी मनुष्याचें वजन व सामर्थ्य खूपच वाढतात पण त्याच्या हातून सामाजिक कल्याण होत नाही. त्याची स्वराज्यवृत्ति तर नष्टच होते.

यापेक्षा समाजसेवकांनी नम्रपणे आळस, अज्ञान आणि बेकारी हीं दूर करण्याचा आणि सामाजिक रूढी सुधारण्याचा कसून प्रयत्न करीत रहावें; आणि लोकहृदयांत आर्यवृत्ति प्रतिष्ठित होअील असा सतत प्रयत्न करावा. अशा प्रयत्नामुळे समाजामध्ये जो प्रेमादर अुत्पन्न होतो त्याची मात्रा (प्रमाण) वाढली म्हणजे मग निवडक लोकां-च्यामधील सामान्य विवादांत लवाद म्हणून पडावें आणि तेंहि लोकांचा आग्रह असेल तेथेंच.

लवादाच्या निकालाने र्‍न्ही किंवा दोहोंपैकी अेकाहि पक्षास संतोष होअीलच असें सांगतां येत नाही. तो अुद्देशहि मनांत बाळगणें शक्य नाही. अुभयपक्षांचें कल्याण व्हावें, कोणाचाहि सर्वस्वी घात होअू नये, आणि तटस्थ अशा समाजाच्या धर्मबुद्धीला संतोष व्हावा, हीच महत्त्वाकांक्षा लवादाची असावी. लवादाच्या कामाने समाजाला संतोष होअूं लागला म्हणजे समाजाची आर्यवृत्ति व्यक्त होअूं लागते, आणि लोक लवादपद्धतीला प्रतिष्ठित करतात. असें झालें म्हणजे दुर्बळ आणि सात्त्विक लोक लवादाकडे अधिकाधिक धांव घेअूं

लागतात आणि जबरदस्त आणि रजोगुणी लोक लवादाचा विरोध करूं धजत नाहीत. अशी स्थिति आल्यानंतरहि लवादाने रजोगुणी अथवा दुर्जन लोकांचें नाक ठेंचण्याचा हेतु कधीहि मनांत ठेवूं नये. प्रत्येक हृदयांत सात्त्विकतेचा अुदय होअील, समाज हें अेक प्रकारचें मोठें व्यापक असें कुटुंब आहे या वृत्तीचें संवर्धन होअील असाच प्रयत्न लवादाने करावयाचा आहे.

समाजाला दुर्जनांचें पारिपत्य करणेंच असेल, दुर्जनांना अद्दल घडविणेंच असेल तर समाजाने तें अन्य मार्गाने करून पहावें, लवादामार्फत कधीहि करूं नये.

अनुक्रम ........
विभाग ........
क्र. ...
नों. दि.

## १६

## मजूरवर्ग आणि बेकारी

हिंदुस्थानांतील अुद्योगधंदे कमी झाल्याने बऱ्याचशा लोकसंख्येचा बोजा शेतीवर पडला आहे आणि अितक्या लोकसंख्येचा भार सहन करण्याची कुवत शेतीमध्यें नाही; म्हणूनच खेडेगांवांतील लोकांना शेतीच्या बरोबर दुय्यम पोटधंदे शोधून काढून दिले पाहिजेत, असें सरकारी अंमलदार आणि देशसेवक दोघेहि म्हणतात. सरकारी आंकड्यांवरून अनेक गोऱ्या अंमलदारांनी ही गोष्ट सप्रमाण सिद्ध केली आहे. सरकारने नेमलेल्या रॉयल कमिशनने विचार करूनहि हेंच अनुमान स्वीकारलें आहे.

अुलटपक्षीं शहरांतच मुख्यत्वे दिवस काढणारे आणि सुगीच्या दिवसांत अथवा गुऱ्हाळाच्या दिवसांत खेडेगांवांत जाअून येणारे बरेचसे पांढरपेशे लोक चर्चा करतांना म्हणतात कीं, 'आजकाल मजुरी कोण महाग झाली आहे. मजूर मिळणेंच कठीण झालें आहे आणि भरपूर मजुरी घेअूनहि हे मजुर पुरे आठ तास काम करतील तर

शपथ ! येतांना अुशीराने येतात, अुशीर कां केला म्हणून रागें भरावें तर परत जाण्याची धमकी घालतात. चिलिमतंबाखूच्या पायीं तासचे-तास घालवतात, आणि काम पुरें न करतांच केव्हा केव्हा दुसरीकडे जातात असा आमचा अनुभव आहे आणि तुम्ही म्हणतां मजूर लोकांना काम नाही, हें कसें ?'

'सुगीच्या दिवसांत मजुरांना सर्वच ठिकाणीं बोलावणें असतें; सर्वांना आपापली मळणी वेळेवर आटोपून घ्यावयाची असते; म्हणून थोडे दिवस कामाची चणचण असते खरी; पावसाळ्यांत मजुराचे हाल कुत्रा खात नाही.' असें अुत्तर दिलें असतां शहरी लोक पुन: म्हणतात, "अहो, पावसाळ्याचा अनुभव देखील आम्हांला आहे. कौलांतून पाणी गळून घराच्या भिंती पडूं लागल्या तरी देखील कौलें शाकारणारे लोक मिळत नाहीत. आजकाल पांढरपेशा कार-कुनांचीच दैना आहे. जिकडे तिकडे मजूर माजुरी झाले आहेत. स्वयंपाक्यास जेवून खाअून पंधरा रुपयांवर रहा म्हटलें तर तो म्हणतो "मला कारकून समजलांत कीं काय ?" तेव्हा हें गौडबंगाल आहे तरी काय ?

मजूर वेळेवर कामास येत नाहीत, मन लावून काम करीत नाहीत, बरीच टंगळमंगळ करितात ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे. शहरांत पावसाळ्यांत घर शाकारणारे मजूर मिळाले नाहीत अेवढ्या-वरून सर्वच ठिकाणी मजूर मिळणें मुश्किल आहे असें अनुमान शहरी लोकांनी काढणें स्वाभाविक आहे. स्वत:च्या थोड्याशा अनुभवावरून जगांत सर्वत्र अशीच स्थिति आहे असें ठरविणें हा मनुष्यस्वभावाचाच दोष आहे.

खरोखरच पावसाळ्याच्या दिवसांत पोटाला न मिळाल्यानें अर्थात् मजुरी नसल्याने अुपासमार होअून लोक मृत्युमुखी पडल्याचीं अुदाहरणें आहेत. आधुनिक पद्धतीचे लहानमोठे कारखाने जेथे चाल-तात तेथे बाजारभावापेक्षा अधिक मजुरी दिली जाते आणि काम अगदी

पिळून घेतलें जातें. त्यामुळे कारखान्याच्या आसपासच्या प्रदेशांत शेतीचीं कामें अडून रहातात, मजूर मिळत नाहीत आणि शेतीचा कसहि दिवसेंदिवस कमी होतो. कारखान्याच्या शहरांतून प्लेग किंवा अिन्फ्लुअेंझा सुरू झाला म्हणजे मजूर पटापट मरूं लागतात. कारखानदार कारखाना बन्द न पडावा यासाठी मजुरीचे दर वाढवीत जाअून आसपासच्या खेड्यांतून नवे नवे मजूर आणवितात. सांथीच्या रोगाला तेहि बळी पडले म्हणजे पुन: थोडी मजुरी वाढवितात. अशा रीतीने सांथीच्या दिवसांत शहरी कारखाने म्हणजे मजुरांची बळी देण्याचीं मजूर-सत्रेंच बनलीं आहेतसें भासूं लागतें.

अहमदाबाद, मुंबअी, कानपूर, कलकत्ता, जमशेदपूर, मदुरा वगैरे ठिकाणीं मजुरांचा प्रवाह मागावा तसा अेकसारखा चालूं शकतो. ही गोष्ट हेंच दाखविते कीं, खेडेगांवांतून बेकारी यथेच्छ असून फालतू मजूर रिकामे पडलेले आहेत. शहराच्या आसपासच्या खेडेगांवांतून बेकारी कमी असल्याने शहरी लोकांना खेडेगांवांची दु:खें दिसत नाहीत अितकेंच. हिंदुस्थानांत असे किती तरी भाग आहेत की, जेथे गरीब लोकांनी चवली पावलीहून मोठें चांदीचें नाणेंच पाहिलें नाही. कोठे कोठे गाअी म्हशी असल्या तरी दुधातुपास गिऱ्हाअिकच नाही.

अशी भिन्न भिन्न परिस्थिति असलेल्या देशाच्या खेडेगांवांतील मजूरवर्गाचा विचार करावयाचा आहे.

खेडेगांवांतून शेतीवांचून बाकी सर्व धंदे बसल्याकारणाने मजुरांना बाराहि महिने काम मिळेल अशी सोय कोठेंच नाही. मजुरांनीं शेतीच्या हंगामांत शेती करून अितर वेळीं मजुरीसाठी शहरांत जाणें हें शहरांना परवडत नाही आणि शेतकी पेशाच्या कुटुंबांनाहि असलें भटकें जीवन परवडत नाहीं. कोकणांतील बेकार लोक घरची शेती संभाळून मुंबअीच्या गिरण्यांत कामास येअूं लागले तेव्हा गिरणीवाल्यांनी हाकाटी चालविली की, हा मजूरवर्ग मुंबअींत स्थायी रहात नाही, त्यामुळे आमचें फार नुकसान होतें. खेडेगांवांत रहाणाऱ्या प्रत्येकाला थोडी

तरी जमीन आणि गाअी बैल कांहीतरी असलें पाहिजे. शहरांत कारखाने काढून शेती आणि ग्रामसंस्कृति या दोहोंचा नायनाट करण्यापेक्षा घर-बसल्या चालूं शकतील असे सर्व प्रकारचे धंदे खेड्यांत पुनः नेअून पेरले पाहिजेत.

असें होण्यास, ज्यांना थोडीबहुत अैपत आहे, अक्कलहुषारी आहे अशा पांढरपेशा वर्गांतील लोकांनी खेडेगांवांत जाअून रहाण्याचें पसंत केलें पाहिजे. आज निकृष्ठ स्थितींतहि पांढरपेशीं कुटुंबें खेडेगांवांत जाअून राहिलीं आणि त्यांनी जर पोटभर अन्नवस्त्रांत समाधान मानलें आणि खेडेगांवांतच मिळणाऱ्या आरोग्य आणि जीवनानंदाची त्यांना गोडी लागली तर हें सर्व शक्य आहे. खेडेगांवांत पांढरपेशांचा चरितार्थ त्यांनी सेवावृत्ति स्वीकारल्यास सुखाने चालूं शकेल. खेडेगांवांतील विचाऱ्या शेतकऱ्यांना व अितर लोकांना दरेक प्रकारची सेवा फारच महाग मिळते. बाजारांत विकत घ्यावयाचा जिन्नस, औषधपाण्याची मदत, वकिलीचा सल्ला, शेतकीचा माल विकतांना लागणारा व्यापारी सल्ला, रोगराअीच्या वेळीं देवदैत्यांना संतुष्ट करण्यासाठी लागणारा धार्मिक सल्ला, भुतेंखेतें काढण्यासाठी लागणारा मांत्रिक सल्ला, जिवाच्या समाधानासाठी आवश्यक वाटणारे ब्राह्मणांचे आशीर्वाद सर्वच कांही त्यांना महाग पडतें. मग अडचणीच्या वेळीं कर्जाअू घेतलें जाणारें भांडवल महाग पडेल यांत नवल तें काय ?

खेडेगांवांतील शेतकऱ्यांना वर्षभर शेतकीचें काम नसलें तरी कांहीना काही अुद्योग शोधून तरी काढणें शक्य असतें व त्याने पोट न भरलें तरी वेळ भरते. पण मजुरांचे तसें नाही. मजुरांना व शेतकऱ्यांना स्वतःची स्थिति सुधारण्याअितका पोंच नाही व अुत्साहहि नाही. तेव्हा समजुतदार लोकांनी त्यांचा पुढाकार करून त्यांना बारीकसारीक अुद्योगधंद्यांस लावलें पाहिजे. लक्षावधि रुपयांचीं यंत्रें आणून मोठमोठे कारखाने काढण्यांत व्यक्तीचें स्वार्थसाधन असेल पण हिंदुस्थानांतील गरीब प्रजचें त्यांत मुळीच कल्याण नाही आणि लक्षावधि रुपयांचें

भांडवल गोळा करण्याची शक्तीहि फार थोड्यांत असते. पण लक्षावधि समजुतदार देशसेवकांनी खेडेगांवांत जाअून राहून तेथे कोट्यावधि लोकांना बारीकसारीक अुद्योगधंदे शिकविणें व अशा रीतीनें क्षुधितांना कायमचे अन्नास लावणें मात्र सहज शक्य आहे; व म्हणूनच प्रजाकीय शिक्षणामध्यें पुस्तकी विद्येने होणाऱ्या बौद्धिक विकासाचें स्तोम कमी करून अुद्योग हुन्नराचें तत्त्व सुरूं करण्याची आवश्यकता आहे. ज्यांना परोपकारासाठी जगावयाचें आहे त्यांनी तरी निदान बौद्धिक विकासाचे चोचले बाजूस ठेवून गरीबांच्या हितासाठी अुद्योगाकडे हात वळविले पाहिजेत. अशांना लागणारा बुद्धियोग सर्वांतर्यामी परमात्मा स्वतः देअील. त्याचें तसें वचन आहे.

## १७

## लोकशिक्षण

साहित्य हें ज्ञानाचें मोठें सोअीस्कर संग्रह-स्थान असल्याने साहित्याचा अुपयोग करतां येणें, अर्थात् लिहितां वाचतां येणें, हें ज्ञानप्राप्तिचे अेक मोठें साधन आहे. मनुष्याला लिहितां वाचतां आलें म्हणजे ज्ञानप्राप्ति आणि स्वतःच्या मतांचा प्रचार या दोन्ही बाबतींत तो स्वतंत्र होतो; म्हणून शिक्षणाच्या सुरवातीसच शिक्षणाचें साधन म्हणून लिहिण्यावाचण्याची कला शिकविण्यांत येते. याचा परिणाम असा झाला आहे कीं लिहितां वाचतां येणें म्हणजेच शिक्षण अशी कल्पना जवळ जवळ सार्वत्रिक झाली आहे.

लेखनकलेचें महत्त्व कोणत्याहि रीतीनें कमी न करितां त्या कलेस शिक्षणांत मिळणारें स्थान अवास्तव आहे असें म्हणणें शक्य आहे. पण लोकांना या कलेचा मोह अितका आहे की, हिच्या अुपयुक्ततेच्या मर्यादा जर कोणी सांगूं लागला अथवा दुसरी बाजू यत्किंचित्हि

मांडू लागला तर त्याला साक्षरतेचा, साहित्याचा, शिक्षणाचा, विद्वत्तेचा, किंवहुना सर्व ज्ञानाचा शत्रु ठरविण्यास वरेचसे लोक मागेपुढे पाहणार नाहीत. अिटलीमध्ये ज्याप्रमाणें मुसोलिनीच्या विरुद्ध अवाक्षर काढण्याची सोय नव्हती, त्याचप्रमाणें आपल्याकडे साक्षरता-प्रसाराच्या आग्रहासंबंधान आहे, आणि यांत विशेष दुःखाची गोष्ट अशी की साक्षरतेच्या अंध अभिमानाच्या या युगांतहि साक्षरता-प्रसाराचे प्रत्यक्ष जोरकस प्रयत्न क्वचितच होतात. निर्वीर्य अभिमान थोडाच फलसिद्धि पर्यंत नेअून पोहोचविणार!

अक्षरांचा, लिपीचा शोध झाला नसता तर भाषा नामशेष झाली असती असें जसें म्हणतां येत नाही, तसेंच लिपीच्या अभावीं साहित्य संभवलेंच नसतें असेंहि म्हणतां यावयाचें नाही. साहित्याने निराळे स्वरूप ग्रहण केलें असतें अेवढें खरें. आणि मनुष्याला स्मरणशक्ति अधिक तीव्र करावी लागली असती. पण सुदैवाने लिपीचा शोध झाला आणि मोठी सोय घरीं आली. आमचें म्हणणें अेवढेंच आहे कीं लिपि जरा अुशीरा शिकवावी.

शिक्षणाच्या बाबतींत अनुभव असा आला आहे की, शिक्षणाच्या सुरवातीस लिपिकार 'गणेश' आणून बसविल्यामुळे तो विघ्नहर्ता स्वतःच अेक मोठें विघ्न होअून बसला आहे. शिक्षण म्हणजे योग्य काळीं योग्य रीतीने सर्व अिंद्रियांची शक्ति वाढविणें; विश्वासंबंधाची त्या त्या काळीं आवश्यक अशी माहिती मिळविणें; निरीक्षण, परीक्षण, प्रयोग, अनुमान वगैरे ज्ञानप्राप्तीच्या साधनांत तरबेज होणें; आणि जीवन कृतार्थ करण्यासाठी विचार, विकार, वासना, आकांक्षा या सर्वांना अिष्ट तें वळण लावणें. हें सर्व योग्य व्यक्तींच्या देखरेखीखालीं लिपीच्या आधारावांचूनच सुरू झालें पाहिजे. बालक लहान असो वा मोठें असो, ज्याप्रमाणे आअीच्या अैवजी रबराच्या बोंडाच्या वाटलीने त्याचें भागावयाचें नाही त्याचप्रमाणे ज्ञानदात्या गुरुजनांच्या अैवजी मुलांपुढे रोचक आणि विविध साहित्य पसरून काम भागावयाचें

नाही. ज्ञानाच्या वाढत्या भुकेला जेव्हा शिक्षक अपुरे पडतील तेव्हाच साहित्य-ग्रंथांची ओळख आवश्यक होते. यासाठी शिक्षणाची सुरुवात लिपि-ज्ञानापासून न करितां श्रवण, अनुकरण आणि निरीक्षण यांपासूनच केली पाहिजे. कंठांतून निघणारा आणि कानांनी ग्रहण होणारा ध्वनि, वोटांनी निर्माण होणाऱ्या व डोळयांना दिसणाऱ्या रेखाद्वारां आणि आकृतिद्वारां व्यक्त करणें हा गुंतागुंतीचा व्यापार आहे. अेखादा लोटा पाहून तशी आकृति काढणें हें स्वाभाविक आहे पण 'ढ' असा आवाज काढल्यावरोवर तो व्यक्त करण्यासाठी ज्ञानदात्या गणपतीच्या सोंडेचें चित्र कां काढावें? आवाज आणि आकृतीचा हा संवंध कोठून आला, हें त्या विचाऱ्या बालकास कसें समजावें? आकृति पाहून ध्वनि ओळखणें आणि ध्वनि अैकून त्याची आकृति ठरविणें ही जादू अथवा कसरत विद्यार्थ्याला साधली नाही म्हणजे त्याला हळूहळू वाटूं लागतें कीं, आपण खरोखरच 'ढ' आहोंत. आणि शिक्षकहि सांगतो कीं, 'अरे ठोंब्या तुला म्हणावें तरी काय? तुला तर 'ढ' हि ओळखतां येत नाही!"

शिक्षणाच्या सुरुवातीसच बालकांमधील आत्मविश्वासाचा वध करून त्यांच्यामध्ये कनिष्टकांति (अिन्फिरिऑरिटी कॉम्प्लेक्स) अुत्पन्न करणें याहून अधिक प्रजाद्रोह दुसरा कोणता असेल?

आजवर शिक्षणाचे संस्कार पांढरपेशा लोकांतच असत. त्यांच्या मुलांना घरींदारीं लेखन-पठनाचें दर्शन अहर्निश होत असतें. शिकल्या-वांचून पोट भरावयाचें नाही असा बोधहि त्यांना अगदी बालपणा-पासून मिळत असतो. यामुळें त्यांना अक्षरज्ञान प्राप्त करून घेणें कांहीसें सोपेंहि जातें आणि आवश्यकहि वाटतें. पांढरपेशीं मुलें अक्षरज्ञान सहज करून घेतात. श्रमजीवी जातींच्या मुलांत स्वाभाविक-पणे हस्तकौशल्य अधिक असतें. त्यांचे हातपाय धडधाकट असतात. कान, डोळे, जीभ वगैरे ज्ञानेंद्रियें तीव्र असतात. पण अक्षरग्रहणाचे बाबतींत पांढरपेशांच्या मुलांपेक्षा सुरुवातीला तीं मंद भासतात. यामुळे

खऱ्या शिक्षणाच्या बावतींत खेडेगांवांतील श्रमजीवी वर्गाचीं मुलें वरचढ असूनहि मठ्ठ ठरतात; कारण शिक्षणाच्या सुरुवातीसच लिपीची धोंड 'गणेशायनमः' म्हणून आडवी पडलेली असते.

खरें पाहतां खेडेगांवचें शिक्षण म्हणजे मुख्यत्वें ब्राह्मणेतरांचें शिक्षण; श्रमजीवी जातींचें शिक्षण; शेतकरी, हुन्नरी, कारागीर व मजूर यांचें शिक्षण; या दृष्टीनेच खेडयांतील शिक्षणाचा विचार केला पाहिजे व याचसाठी शिक्षणाची सुरूवात लिपिज्ञानापासून न करितां सामान्य ज्ञानापासून केली पाहिजे. पुष्कळशी माहिती तोंडीं सांगणें, बरेचसे प्रयोग हातून करून घेणें, कलाकौशल्याचें महत्त्व वाढविणें, कर्तब-गारीच्या कामांत भाग घेणें व प्रसंगोपात्त सुंदर साहित्य श्रवण करणें आणि पाठ करणें येथूनच शिक्षणाची सुरूवात झाली पाहिजे. बरेंचसें ज्ञान विद्यार्थ्याला पोहोंचलें, ज्ञानाच्या प्रवाहांत गटांगळया न खातां तो सुखानें पोहूं लागला व अधिकाधिक ज्ञानाची गोडी लागूं लागली म्हणजे मग त्याला लिपीची ओळख करून द्यावी. यापूर्वींच साहित्यश्रवणामुळे लिपीचें महत्त्व त्याला कळून, 'मला हें सर्व केव्हा वाचावयास येंईल ?' असें त्याला होऊन गेलेलें असतें. दृष्टीचा तरबेज, विविध हस्तकौशल्यांत पटाईत, प्रयोगांत चिकाटी असलेला असा विद्यार्थी, आत्मविश्वासाची आणि अुत्साहाची महत्त्वाकांक्षेने मुसमुसणारी मूर्तीच असतो. त्याला अक्षरज्ञानाची प्राप्ति अशा काळीं सहज लीलेने करून घेतां येते.

खेडेगांवांतील शिक्षण म्हणजे केवल बालकांचेंच शिक्षण नव्हे. आबालवृद्ध स्त्री-पुरुष सर्वांनाच आधुनिक करून सोडलें पाहिजे. या-साठी खेडेगांवांतील शिक्षण म्हणजे प्रधानतया शालेय शिक्षण नसून लोकशिक्षण हेंच होय.

येथेहि लेखनाच्या पूर्वीं ज्ञानकथा व साहित्यश्रावण (अैकविणें) यांचा पुरस्कार केला पाहिजे. अशा रीतीने शिक्षणाची सुरुवात गुरु-मुखाने व श्रौत पद्धतीने झाल्यास शिक्षण बरेंच सुलभ होऊन

प्रजेचे श्रम बरेच वांचतील. ज्यांच्यामध्यें गरीबांची कळकळ आणि सेवाभाव असेल त्यांचीच छाप प्रजेवर पडेल.

या पद्धतीचा साहित्यावर फारच अिष्ट असा परिणाम होअील. ज्याप्रमाणे कांहीं नाटकें रंगभूमीवर येण्याच्या लायकीचीं नसतात, कांही कविता मुळीच गेय नसतात, त्याचप्रमाणे बरेचसें साहित्य सुबोध असूनहि सुवाच्य अथवा सुपाठच असत नाही. गद्य म्हणजे कर्ता, कर्म, क्रियापद असलेलीं आणि कांहीं तरी अर्थ होणारीं ओबडधोबड वाक्यें नव्हेत. भाषाभिज्ञ आणि त्या त्या विषयाची माहिती असलेला मनुष्य मोठयाने वाचूं लागला असतां जें वाचून त्याला कंटाळा किंवा थकवा न येअील आणि अैकणाऱ्यांना देखील श्रवणरुचिर, व्यवस्थापूर्ण, प्रमाणबद्ध अशा अुत्कृष्ट कलाकृतीचें आपण पान करीत आहोंत असें वाटेल, त्याचें नांव गद्य. साहित्याचें श्रवण-श्रावण समाजांत वाढेल तेव्हांच साहित्याची ही बाजू खुलेल. अुत्कृष्ट गद्यांत अेक प्रकारचा सहज ओळखूं न येणारा पण गळयाला व कानाला सुखावह असा ताल असतो; भाषेच्या प्रवाहांत कधी लहान लहान लहरी असतात; कधी मोठयामोठया लाटा असाव्या लागतात, तेच ते शब्द पुन:पुन: अैकावेसे वाटतात; हा विचार, ही कल्पना, ही माहिती, अथवा हें विवेचन दुसऱ्या शब्दांत मांडणेंच शक्य नाही असें हळूहळू वाटूं लागतें व शेवटीं शेवटीं ती रचना पद्याप्रमाणे कंठस्थ होअून जाते.

असलें गद्य नाटकांतूनहि जेथे सार्वत्रिक नाही तेथे सामान्य लेखांत त्याची अपेक्षा कशी करावी? श्रवण-श्रावणाच्या परिपाठाने साहित्याचें रूप, लावण्य आणि ओजस् हीं सर्व वाढतील, आणि त्याचा जनतेच्या चारित्र्यावर व संस्कारितेवर परिणाम होअील.

खेडेगांवांतील लोक साहित्य-शौंड नसले तरी साहित्यरसिक स्वभावत:च असतात. रुचिर साहित्य व तेजस्वी विचार यांची बहुधा ते फारकत करीत नाहीत. साहित्य ग्रंथांतरीं वाढणें बस्स नाही. लोकांच्या बोलण्याचालण्यांत, सल्लामसलतींत, अूहापोहांत व विवेच-

नांत साहित्याची संस्कारिता मुरली पाहिजे. तरच साहित्यानें आपलें काम केलें असें होईल. वर आंखलेलें ग्रामशिक्षण थोडीं वर्षें चाललें तरी हा परिणाम डोळयांत भरण्याइतका दिसून येईल.

इंग्लंड, युनायटेड स्टेट्स, जर्मनी, फ्रान्स, बेल्जम, कांही अंशीं इटली आणि पूर्वेकडे जपान एवढे देश वगळले असतां, बाकीची दुनिया ग्रामप्रधान आहे. आज काल पाहूं जातां वर सांगितलेले नगर-प्रधान देशांचेंच अधिराज्य जगावर आहे. नगरजीवन उद्योगधंद्यानें म्हणजे यांत्रिक कारखान्यांनी भरभराटलेलें आहे, ही गोष्ट खरी असली तरी त्यांचें अधिराज्य आणि त्यांची कल्पनातीत संपत्ति, हीं यंत्रप्रधान संस्कृतींत ज्यांनी पुढाकार घेतला नाही आणि म्हणून ज्यांना सुधारलेले असें कोणी म्हणत नाही, अशा देशांना पिळून काढण्यावर अवलंबून आहेत. पण ही स्थिति कायम टिकणार नाही. ग्राम-संस्कृती-चा भाग्योदय आतां नजीक आहे. मनुष्यजातीचा मोठा भाग खेडयां-पाडयांतून रहातो, खेडयांपाडयांतच त्याला सुखासमाधानानें रहाणें शक्य आहे. नगरांवांचून खेडीं टिकूं शकतील पण खेडयांवांचून नगरें तीन वर्षें देखील टिकाव धरूं शकणार नाहीत. जळवांप्रमाणे खेडयांचा कस शहरें शोषीत आहेत. म्हणूनच शहरें आज इतकीं माजलीं आहेत.

एकाकाळीं शेजारच्या देशांतील लोकांना मारून, त्यांची जमीन, गुरेंढोरें व बायकापोरें लुटून घेण्याचा धंदा मनुष्यजातीनें केला. पुढे हजारो आणि लाखो लोकांना पकडून गुलाम करून गुरांप्रमाणे त्यांचे-कडून जबरदस्तीनें काम घेण्याचा धंदाहि करून पाहिला. आज अज्ञान, दुर्बळ, भोळसट अथवा दुःस्थित अशा लोकांच्या मेहनत-मजुरीचा गैर-फायदा घेऊन धूर्तांनी स्वतःच्या वांटयाला लोणी व त्यांच्या वांटयाला ताक असा धंदा चालविला आहे. याला इंग्रजींत 'एक्स्प्लॉयटेशन' असें म्हणतात. आपण त्याला 'नवनीत–कर्षण' असें म्हणूं. जगद्व्यापी

रोग किंवा द्रोह जर अेखादा असेल तर तो जबरदस्त व धूर्त अशा लोकांनी केलेलें हें मधुकर्षण हा होय.

पण या परिस्थितीकडे गरीबांचें लक्ष गेलें आहे. त्यांना आत्म-परिचय झाला आहे. स्वसामर्थ्याचा साक्षात्कार होअूं लागला आहे. गरीबांचा देव जागृत झाला आहे. तेव्हा यापुढे शहरांना स्वतःच्या पायावर उभें राहिलें पाहिजे. अथवा खरें म्हणावयाचें तर शहरांनी आजवर आपल्याच हातांनी आपले पाय तोडण्याचा जो आत्मघाती अुपक्रम केला तो आतां टाकून दिला पाहिजे. खरोखर पहातां खेडींपाडीं हींच शहरांचे लुले पडलेले पाय आहेत. त्यांचें संरक्षण व संवर्धन केलें तर शहरें अधिक सुटसुटीत होअून मजबूत पायावर अुभीं रहातील.

आपण हेंहि दूरदृष्टीने ओळखलें पाहिजे की, जगाचे यापुढील पुढारी खेडेगांवांतील असतील. जनतेचे धुरीण जानपदच असतील.

'जिच्या हातांत पाळण्याची दोरी तीच जगाला तारी' या म्हणीचा थोडासा व्यापक अर्थ करून आपण असें म्हणूं शकूं की, खेडेगांवचें शिक्षण ज्यांच्या हातीं असेल तेच जगाला नवीन वळण लावणार आहेत. या येत्या पन्नास वर्षांत जी अेक जगद्व्यापी संस्कृति स्थापन होणार आहे अथवा ज्या जगद्व्यापी प्रेरणेच्या योगाने जगांतील प्रत्येक संस्कृतीची अेक अेक अभिनव आवृत्ति तयार होणार आहे, ती संस्कृति अथवा ती प्रेरणा ग्रामशिक्षणाच्या अेका नवीन सामर्थ्यशाली आणि निष्पाप अशा शिक्षणपद्धतींतून निघणार आहे. जगाचा पुढाकार खेडयांना मिळणार तो या नवीन शिक्षणाच्या जोरावर. म्हणून खेडेगांवांतील या नवीन शिक्षणाचें स्वरूप कसें असणार त्याचें थोडेंसें दर्शन येथे करूं.

आजवर प्रतिष्ठा पावलेलें शहरी थाटाचें शिक्षण बरेंचसें खर्चीक, कर्जाअू, अलंकारिक आणि चारित्र्यनिरपेक्ष आहे. शिक्षणाच्या पायीं पैसा पाण्यासारखा खर्चला जातो ही अेका रीतीने आनंदाची गोष्ट असली तरी शिक्षणाने मनुष्य ज्ञानपूत होतो, चारित्र्यसंपन्न होतो, सर्व-

भूतहिते रत होतो, स्वार्थविस्मृत होतो, असें समजून कोणी शिक्षणाविषयीं अितके लोलुप झाले नाहीत. शिक्षणांत सामर्थ्य आहे, संपत्ति आहे, सत्ता आहे, भोगैश्वर्य आहे, आणि भोगैश्वर्याचा किळसवाणा नागवेपणा झांकण्याची कलाकौशल्यप्रधान संस्कारिता आहे; यासाठी लोकांना आजचें शिक्षण हवें आहे. धर्मशक्ति आज क्षीण झाली असल्या-कारणानें आणि जगांतील राजकीय पुढारी पट्टीचे दांभिक झाले असल्याकारणाने, जगाच्या कल्याणाच्या गोष्टींची चर्चा करण्याचें काम शिक्षणक्षेत्राकडे आलें आहे. पण सर्व मांगल्याची ही कळकळ शिक्षित समाजानें पुरेपूर सिद्ध करून दाखविली नाही. शिक्षण-शास्त्राने तयार केलेल्या जीवनरसायनांत अमुक तोळे मांगल्याची अिच्छा घातली असतां तें चवदार होतें आणि आपला गुण तावड-तोब दाखवितें अेवढेंच आज कळलेलें आहे.

सामान्य जनतेला सदाचारहि हवा आहे, आणि भोगैश्वर्यंहि हवें आहे. लुबाडलेलें धन हातचें जाऊं नये आणि अधर्महि घडूं नये अशी आंधळी धृतराष्ट्री वृत्ति सामान्य लोकांत दिसून येते. त्यामुळे लोक शिक्षणाग्रणींना म्हणतात, 'तुम्हाला सुचतील त्या सर्व सुधारणा शिक्षणांत करा आणि जुन्या शिक्षणांतील बरेवाअीट सगळे फायदेहि त्यांत असूं द्यात.' जुने फायदे हे फायदे नसून ती महत् हानि आहे, लोकांचें रक्त शोषून पुष्ट होण्याचा तो प्रकार आहे, हें अजून लोकांना पटलें नाही. यामुळे 'भुक्ति मुक्ति च विंदति' असलें आशाळभूत तत्त्वज्ञान सर्वत्र पसरलेलें आहे. अीस्ट अिंडिया कंपनीचे भागीदार डायरेक्टर्स लॉर्ड क्लाअिव्हला आणि वॉरन् हेस्टिंग्जला लिहीत असत की, न्यायाने राज्य करा; नेटिव्हांना दया दाखवा; पण अधिक पैसा पाठवीत चला.' आणि या शेवटच्या वाक्यावर सर्व भर असे.

आजकाल पुढारलेल्या देशांतून शिक्षणापायीं जो पैसा पाण्या-सारखा खर्चला जातो, तो परदेशांतून पिळून आणलेला असतो.

मागसलेल्या देशांचें तेल काढून त्या चरबीवर स्वकीयांना पोसण्याचें काम सुरवातीस सांगितलेल्या देशांतच होत असतें.

खरें शिक्षण या तेली राष्ट्रांतील शिक्षणपद्धतीहून भिन्न असलें पाहिजे. खरें शिक्षण या तेली शिक्षणाइतकें भडक, तकाकित व रामबाण दिसणार नाही हेंहि खरें व यामुळेच खरें शिक्षण घेऊं लागलें असतां, मिरची मसाला नसलेल्या सात्विक, पौष्टिक व पवित्र हविष्यान्नाप्रमाणे तें प्रथम प्रथम मिळमिळीतच लागणार आणि तें घेत असतांना अव्यवहार्य अशा ध्येयवादाला बळी पडून आपण संपत्ति, सामर्थ्य, सत्ता आणि प्रतिष्ठा यांना बावळटपणाने मुकतों आहोंत की काय अशी शंका वारंवार अथवा अहर्निश येऊं लागणार. 'सतीच्या दरवाजांतील मिणमिणीत वत्तीची सर कुलटेच्या दरवाजांतील झुलत्या हत्तीला यावयाची नाही,' ही जुनी म्हण ज्यांच्या हृदयापासून रोमापर्यंत भिनली असेल, त्यांनाच हें जीवन-परिवर्तन व शिक्षणपरिवर्तन पचणार आहे.

अकृत्वा परसंतापं अगत्वा खलनम्रताम्।
अनुत्सृज्य सतां वर्त्म यदल्पमपि तद् वहु ॥

'कोणालाहि गांजल्यानाडल्यावांचून, नीच लोकांसमोर कोणत्याहि रीतीने मान वाकविल्यावांचून आणि सज्जनांनी घालून दिलेल्या मार्गास न सोडतां आपल्या परिश्रमाने जें कांही थोडेंहि फळ मिळेल तें नीतिदृष्टया आणि परिणामदृष्टया पुष्कळ आहे असें समजावें.' या श्रद्धेवांचून युगांतर व्हावयाचें नाही.

आजकालचें वैद्यकशास्त्र असें कांही विचित्र रीतीने वाढलें आहे की प्रत्येक गरीबाला पश्चाताप वाटत असतो कीं 'मजजवळ पुरेसे पैसे असते तर थोरल्या डॉक्टरला बोलावून अतिशय मूल्यवान् औषधें आणून माझ्या मुलाला किंवा सहधर्मचारिणीला मीं बरें करून घेतलें असतें. पण काय करावें! गरीबाची ही दुनियाच नव्हे.' असा विषाद

गरीबाच्या घरांतील दरेक मरणामागे राहून जातो. शिक्षणाचेंहि असेंच झालें आहें. संपत्ति आणि संस्कारिता ही अेकमेकांवर अवलंबून आहेत अशी स्थिति अथवा भ्रांति सर्वत्र अुत्पन्न झाली आहे.

खेडेगांवांतील सार्वत्रिक सर्वोदयकारी शिक्षणाचा विचार करीत असतांना शिक्षणांत आज माजलेल्या लोभाला प्रथम दूर लोटून दिलें पाहिजे. जगांत असलेली सर्व माहिती म्हणजे कांही ज्ञान नव्हे आणि अमर्याद सामर्थ्य मिळविणें हा कांही शिक्षणाचा अुद्देश नव्हे. शिक्षणाच्या योगाने मनुष्याला स्वतःच्या सर्व शक्तींचा परिचय व्हावा, परिस्थितीचें यथार्थ आकलन व्हावें, सर्वांच्या अुदयांत स्वतःचा अुदय आहे हें पटून हृदयांत अहर्निश चाललेला स्वार्थ-परार्थाचा झगडा कायमचा मिटावा, श्रेय आणि प्रेय। हीं अेक व्हावींत, हृदय अुन्नत आणि व्यापक व्हावें, जीवन निरोगी, अुद्योगपूर्ण, प्रसन्न, त्यागमय आणि कौशल्ययुक्त व्हावें व अशा जीवनांतून सर्वकाळ व सर्व परिस्थितींत संतोष आणि आनंद यांचीं कारंजीं अुडत रहावींत, आणि सरते-शेवटीं रसाळ फळाप्रमाणें जीवन परिपक्व होअून तें अंतीं परमात्म्याच्या पदरीं पडावें. खऱ्या शिक्षणाचा असा व्यापक अुदात्त आदर्श आहे !

या आदर्शासाठी आजचा प्रचलित विराट कार्यक्रम आवश्यक नाही, अितकेंच नव्हे तर तो अुपयोगीहि नाही. आधिभौतिक आणि आध्यात्मिक ज्ञान वाढवत वसणें ही अेक प्रकारे विघात्याची, परमात्म्याची भक्ति किंवा अुपासनाच आहे. पण हें सर्व ज्ञान शिक्षणक्रमांत कोंबलेंच पाहिजे असा आग्रह नसावा.

जगाचें अैक्य होण्यास प्रत्येकाने जगांतील प्रत्येक देश पाहिला असला पाहिजे, आणि तेथील भाषा व साहित्य यांच्यांशी त्याचा परिचय असला पाहिजे असें म्हणणें हास्यास्पद होअील आणि अितकें करूनहि अैक्य वाढेल का लोभ वाढून विग्रह वाढेल, हें सांगणें कठीण आहे. मांजर जसें सगळीं घरें धुंडाळतें त्याप्रमाणे जगांतील सर्व

देशांत ज्यांचे पाय पोहोंचले आहेत अशीं राष्ट्रें जगाचें अैक्य साधीत आहेत असा अनुभव नाही. जगांतील सर्व जातींशी गुण्यागोविंदाने रहाण्याची सात्विक वृत्ति अथवा माणुसकी अेकाच खेडेगांवांत जन्मभर राहून देखील वाढवितां येईल. गीतांजलीसारख्या ग्रंथांत सगळया जगाचा अितिहास नाही पण तो ग्रंथ जगाच्या सर्व देशांतील लोकांना आपलासा वाटतो. कारण त्या गीतांतील हृदय शुद्ध व सार्वभौम आहे. शिक्षणामध्य अखिल सृष्टि सिद्ध करावयाची नसून व्यापक आणि उदार दृष्टि सिद्ध करावयाची असते, अेवढें ध्यानांत ठेविलें तरच शिक्षणक्रम बहुजन-समाजाच्या जीवनाजोगता आटोपशीर होईल. राष्ट्राच्या अैक्यासाठी हिंदी भाषा शिकली पाहिजे. धार्मिक साहित्याच्या प्रत्यक्ष परिचयासाठी संस्कृत आणि आरबी या सारख्या भाषा शिकल्या पाहिजेत; अिस्लामी राष्ट्राच्या दोस्तीसाठी फारसी भाषा शिकली पाहिजे; आशियाच्या संघटनेसाठी चिनी आणि जपानी भाषांचा परिचय साधला पाहिजे; युरोपची आद्य-प्रेरणा ओळखण्यासाठी लॅटिन आणि ग्रीक साहित्याचा मासला पाहिला पाहिजे; आधुनिकतेसाठी आणि भौतिक शास्त्रांच्या आकलनासाठी जर्मन आणि अिंग्लिश किंवा फ्रेंच या भाषा आपल्याशा केल्या पाहिजेत; आणि पुढच्या पिढींतील राजकारण यशस्वी रीतीने चालविण्यास रशियन भाषेचा परकेपणा मोडला पाहिजे; अशा तऱ्हेने जर आपण भाषांचा भार भरीत गेलों तर जन्मभाषेला घर सोडून पळावें लागेल, आणि या भाराखालीं अुंट चेंगरून जाअील तें निराळेंच. राष्ट्रीयतेच्या दृष्टीने हिंदीला स्थान भलें असो, पण सर्व शिक्षण अेका भाषेंत-देशभाषेंत, स्वभाषेंत-देतां आलेंच पाहिजे आणि असा आग्रह जर नसेल तर देशभाषा दुबळीच राहील आणि तिचा शाप लागून प्रजा क्षीणपुरुषार्थ होअील.

कोणत्याहि भाषेंतील साहित्य हें ती ती भाषा बोलणाऱ्या प्रजेचें अत्यंत मूल्यवान असें भांडवल आहे. कोणी कोणी त्याला आजन्म आवश्यक असलेलें दूधहि म्हणतात. प्रजेच्या बहुविध पुरुषार्थाचा जसा तो सांठा

आहे त्याचप्रमाणे नवीन पराक्रमाचेंहि तें अेक क्षेत्र होअूं शकतें. अेवढे ठाअूक असून आणि स्वीकारूनहि म्हणावें लागतें की, शिक्षण साहित्य-प्रधान होणें हें अनिष्ट आहे. आणि आपलें शिक्षण तर साहित्य प्रधान आहे, अेवढेंच नव्हे तर तें साहित्यपरायण आहे. शिक्षणाची आणि जीवनोद्देशाची फारकत झाली असल्याकारणानेच ही कृत्रिम परिस्थिति आजवर टिकली आहे. साहित्य म्हणजे शिक्षण नव्हे. साहित्य हें शिक्षणाचें अेक साधन आहे, किंमती आणि अुपयोगी साधन आहे; आणि विशेष गोष्ट अशी की, शिक्षणाचें साधन या दृष्टीनेहि साहित्य अुत्तम कमावलें गेलें असल्याकारणाने साहित्याच्या द्वारा शिक्षण देणें सोपें होअून बसलें आहे. परिणामीं, सर्व शिक्षणाचा मक्ता साहित्यालाच मिळालेला आहे. यामुळे शिक्षणाचीं अन्य साधनें अगदीच मागे पडलीं आहेत. किंबहुना तीं शिक्षणाचें साधन होअू शकतील याविषयीं शिक्षण-शास्त्र्यांमध्ये आणि लोकधुरीणांमध्ये बरीच नास्तिकता आहे.

बुद्धीचा विकास कितीही होवो आम्हांस त्याची पोटदुखी नाही; अुलट केवळ बुद्धीच्या विकासासाठी अितके आटोकाट प्रयत्न होत असूनहि शिक्षणाच्या कृत्रिमपणामुळे, अेकांगीपणामुळे आणि भाडोत्री-पणामुळे, बुद्धीचा विकास होण्याअैवजी ती बोथट व कुंठित होते व पडलेल्या चाकोरीच्या बाहेर जाअूंच धजत नाही, या गोष्टीचा खेद वाटतो.

बुद्धीचा विकास झाला म्हणून मनुष्याने पंगू, परोपजीवी, अैतोबा व्हावें हा न्याय कोठला? स्वातंत्र्य, हिंमत व सुचणूक यांच्या पोषणा-साठी, व सामान्यपणे सर्व प्रकारच्या कर्तबगारीसाठी, कौशल्य, योजनाशक्ति, व्यवस्थाशक्ति व सर्जनशक्ति यांचा विकास झाला पाहिजे. या अुद्देशांच्या पूर्तीसाठी शिक्षणाने साहित्य व तत्त्वचर्चा यांची कोंडी फोडून बाहेर निघालें पाहिजे. अुद्योगहुन्नर, कला कौशल्य, समाज-सेवेचीं कामें, पराक्रमांत पुढाकार वगैरे नवीन क्षेत्रातून हें शिक्षण घेतलें पाहिजे व त्या शिक्षणांत सामाजिक जबाबदारी, आध्यात्मिक आदर्श,

सर्वहिताची नजर या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे व माणुसकीच्या या संवयी अंगवळणी पडण्यासाठी व्यायामशाळेंत शरीर कसल्याप्रमाणे जीवनक्रम अुत्तम रीतीनें कसला पाहिजे. 'पडीलें वळण अिंद्रियां सकळां भाव तो निराळा नाही तुझा.' अशी स्थिति झाली पाहिजे.

## १८

# औद्योगिक शिक्षण

खेडेगांवांत पुस्तकी शिक्षण मुळीच नको असें म्हणण्याचा आमचा आशय आहे, असें अनुमान जर कोणी काढील तर तो येथील सर्व योजनेला अन्याय करीत आहे असें म्हणावें लागेल. पुस्तकी शिक्षणांत मुरून जाअून ज्यांचें अगदी लोणचें झालें आहे, असे लोक स्वतः पुस्तकी शिक्षण आपल्या मुलांबाळांना देण्याव्यतिरिक्त त्याच्या प्रचारासाठी, विशेषतः खेडयांतील प्रचारासाठी कांहीच करीत नाहीत आणि खेडयांतील जनतेच्या कल्याणासाठी शिक्षणक्रमांत पुस्तकी ज्ञानाला जर कोणी दुय्यम स्थान देअूं पाहील, तर त्याला ते ज्ञानाचा शत्रु, विद्वत्तेचा विरोधी, बुद्धिविमुख, परागतिक वगैरे शेलकीं विशेषणें देअून अेकच कोल्हेकुअी सुरूं करतील. यांना खरें पहातां खेडेगांवांतून विद्येच्या प्रसाराचा अुत्साह बेताचाच असतो. पांढरपेशा धंद्याच्या मागे लागलेल्या आपल्या मुलांच्या शिक्षणक्रमांत शारीरिक श्रमाचें तत्त्व येअूं नये अेवढीच काळजी त्यांच्या सुप्त (सबकान्शस्) मनांत वसत असते, आणि हा कौटुम्बिक अथवा स्वज्ञातिगत स्वार्थ जनकल्याणाचें रूप धारण करतो अेवढेंच. बूर्झ्वा लोकांचा हा स्वभावच आहे. आजकालचें शिक्षण पंगू बनवितें, बुद्धिमांद्य अुत्पन्न करतें वगैरे सर्व दोष आपण पोपटाप्रमाणे बोलून जातों पण पुराणप्रियते-

मुळे गेलीं दीडशें वर्षे अंगवळणी पडलेली शिक्षणपद्धति सोडण्याचें मात्र आपल्या जिवावर येतें. युरोप, अमेरिका, जर्मनी, जपान अित्यादि देशाप्रमाणें अुद्योगधंदे आपल्याकडे चालविले पाहिजेत; त्यासाठी मोठमोठे कारखाने काढले पाहिजेत असें म्हणणाऱ्या लोकांना हिंदुस्थानांत शहरांची संख्या वाढवावयाची आहे आणि खेडेगांवांचा सत्यनाश करावयाचा आहे. आणि अुद्योगधंद्यांची सुरवात करावयाची म्हणजे बूर्झ्वा तरुणांना परदेशांत पाठवून शिक्षण द्यावयाचें अेवढाच त्याचा अर्थ होतो. आधीच मरणोन्मुख झालेल्या खेड्यांना पार धुळीस मिळविण्याचा हा मार्ग आहे.

खेडेगांवांमध्ये खेड्यांच्या परिस्थितीला अनुकूल असे धंदे चालविले पाहिजेत. खेड्यांतील भांडवल, खेड्यांतील मजूरी, खेड्यांतील कारागिरी आणि खेड्यांतीलच गिऱ्हाअिकी अशी स्थिति अुत्पन्न केली तरच खेड्यांचा अुद्धार होणार आहे. पूर्वी खेडेगांवांतून लहान लहान असे दहा वीस धंदे चालत. झोपड्यांतून चालणाऱ्या धंद्यांची गळचेपी दोन रीतीनें झाली आहे. पैसेदार पांढरपेशे बूर्झ्वा लोक शहरांत जाअून राहिले, तेथे राहून परदेशी माल विकत घेअू लागले, खेड्यांत तयार होणाऱ्या मालापेक्षां परदेशी माल स्वस्त पडतो असें पाहून परदेशी माल खेडेगांवांत नेअून विकण्याचा पापी धंदा त्यांना सुचला व खेडेगांवांतील कारागिरांच्या पोटावर पाय देअून स्वतःची खळी भरण्याचा अुपक्रम त्यांनी केला. त्यांनी खरोखर पाहतां खेडेगांवांत तयार होणारा माल सोप्या रीतीनें व सुबक कसा होअील याचा विचार करून खेड्यांतील कारागिरांचीं हत्यारें व अवजारें सुधारून द्यावयास पाहिजे होतीं. खेड्यांतील तरुणांना हस्तकौशल्याचें शिक्षण द्यावयास पाहिजे होतें. आपलेपणानें व आंतड्याच्या कळकळीनें खेडेगांवांतील अुद्योगधंद्यांना अुत्तेजन द्यावयास पाहिजे होतें. व परदेशी मालाचे अेजंट बनण्याचे अैवजी खेड्यांतील अुद्योगधंद्यांचे पोशिंदे बनावयास हवे होतें.

आजवर चाललेली स्वदेशी म्हणजे शहरांतील गरीब पांढरपेशांना कसेबसे चालणारे लहान मोठे शहरी धंदे चालविण्यास दिलेलें अुत्तेजन असेंच म्हणावें लागतें. आणि कपडयाच्या बाबतींत तर, मुंबअी अहमदाबादकडील स्वराज्याविषयीं जवळ जवळ अुदासीन असलेल्या लक्षाधीशांना आणि कोटयाधीशांना अधिक श्रीमंत करून पाश्चिमात्य पद्धतीची रहाणी वाढविण्यास मदत करणें होय. मोडकळीस आलेल्या खेडयांतून किती तरी लाचार लोक घरदार, शेती, खेडयांतील धंदे, जातगोत, आणि जुना घरंदाजपणा, हीं सर्व सोडून देअून जातात, चहादारूला आश्रय देतात, अल्पायुषी होतात आणि पुनः खेडेगांवांचें दर्शन क्वचितच करतात. गिरणीच्या स्वदेशीचा हा अर्थ आहे. आज देशामध्ये सर्वांत मोठा द्रोह जर चालू असेल तर तो लक्षावधि खेडे-गांवांतील कोटयवधि गरीबांच्या अुद्योगधंद्यांचा द्रोह होय.

स्वदेशवासीयांविषयीं जर खरें प्रेम असेल तर खेडेगांवांत अुपयोगी पडेल असें औद्योगिक शिक्षण दिलें पाहिजे. शेतीमधील मोलमजुरीची प्रतिष्ठा वाढविली तर तीं कामें जास्त अुत्साहाने, अधिक नियमित व चांगल्या प्रकारे होअूं लागतील; शेतीच्या व्यवसायाची प्रतिष्ठा वाढेल; शेती आणि शेतकऱ्याचें जीवन याविषयीं कवि कविता लिहूं लागतील; जनसमाज अुत्साहाने तीं गीतें गाअूं लागेल; शेतीकडे भांडवलाचा प्रवाह वाहूं लागेल व अशा रीतीने खेडेगांवांची आबादी वाढून लोक सुदृढ, सुखी व दीर्घायु होतील.

अन्न, वस्त्र व आसरा या तीन गरजा प्राथमिक व सार्वभौम आहेत. तेव्हा शेती, विणकाम, गवंडीकाम, सुतारकाम व लोहारकाम हे धंदे प्राप्तीच्या दृष्टीने सामान्य असले तरी मोठयांतल्या मोठ्या संख्येला पोसण्याच्या दृष्टीने आणि राष्ट्रीय अुपयोगितेच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. अेवढया धंद्यांचें शिक्षण सर्व जातींच्या तरुणांना देणें शक्य आहे, अिष्ट आहे, अत्यावश्यक आहे. सबंध राष्ट्राची बुद्धि या धंद्यांकडे वळल्यास या धंद्यांत सुधारणा होअून ते अूर्जितावस्थेस

पोहोंचतील. बुद्धिवंतांनी राष्ट्रीय अुद्योगाकडे दुर्लक्ष करण्यासारखी दुसरी राष्ट्रीय आपत्ति नाही. देशांतील लोकांना अुपाशी मरूं देअून पर-देशांतील माल हौसेने विकत घेणें या सारखा दुसरा प्रजाद्रोह नाही. हा प्रजाद्रोह जेथे अखंड चालतो आणि शिष्टमान्य होतो तें राष्ट्र क्षीणवीर्य झालेंच पाहिजे.

'ज्यांना सुतार किंवा लोहार व्हावयाचें असेल त्यांना त्या त्या कलेचें शिक्षण द्या. सार्वत्रिक शिक्षणास त्याचा काय अुपयोग ?' असें म्हणणारे लोक पुष्कळ आहेत. माती, लाकूड, लोखंड, यांच्या सहवासांत कौशल्य प्राप्त केल्याने हाताचीं बोटें, डोळे व शरीरांतील सर्व स्नायू यांना केवढें महत्त्वाचें शिक्षण मिळतें याची त्यांना कल्पना नाही. राष्ट्रव्यापी व सामाजिक महत्त्वाचे अुद्योगधंदे लहानपणींच शिकून ठेविल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास किती वाढतो व सामाजिक जीवनाचें यथार्थ स्वरूप किती अुत्तम समजतें व या सर्वांची समाज-शास्त्र समजण्यास व समाजसेवा साधण्यास किती मदत होते याची त्यांना कल्पना नसल्यामुळेच ते वरील आक्षेप घेतात.

'ज्याला कवि व्हावयाचें असेल त्याला कविता शिकवा, ज्याला अितिहासकार व्हावयाचें असेल त्यालाच अितिहास शिकवा, ज्याला संपादक व्हावयाचें असेल त्याच्याकडूनच निबंध लिहवून घ्या, ज्याला मोजणीदार व्हावयाचें असेल त्यालाच क्षेत्रमापन शिकवा, ज्याला चित्रकार व्हावयाचें असेल त्यालाच ड्रॉअिंग शिकवा, ज्याला पोलिसांत किंवा लष्करांत जावयाचें असेल त्यालाच कवाअीत शिकवा, सर्वांच्यामागे या सर्व विषयांचें शुक्लकाष्ठ कशाला ?' असें जर या लोकांना कोणी म्हटलें तर मात्र चिडून ते लोकांना म्हणावयाचे, 'तुम्हांला' व्यापक व संस्कारी जीवनाची कल्पनाच नाहीं.' कावाडकष्ट, शारीरिक श्रम, व अुपजीविकेसाठी हातपाय हलविणें यांचा ज्यांना कंटाळा, त्यांची विचारसरणी अशीच असावयाची ! दुसऱ्याच्या निढळाच्या घामाचा फायदा घेण्यास सोकावलेले व खांद्यावर अुचलून घेणारासच लाथा

मारणारे हे पांढरपेशे लोक खेडेगांवांतील राष्ट्रीय शिक्षणाचा विचारच करूं शकत नाहीत.

ज्याप्रमाणे औद्योगिक कौशल्य आणि नफानुकसानीची गणितो दृष्टि ही जीवनाच्या पूर्णत्वाला आवश्यक आहे, त्याचप्रमाणे मोजमापाचा विनचूकपणाहि अत्यंत आवश्यक आहे. आपल्या समाजांत गबाळेपणा आणि अनुमानधवक्याचा व्यवहार यांच्या योगाने जीवन जितकें महाग पडत आहे तितकें परराज्याच्या ओझ्यानेहि महाग पडत नसेल. सर्वांत मोठी अुधळपट्टी म्हणजे वेळेची व आयुष्याची होय. कोणत्याहि कामाला किती वेळ लागेल, काय साधनें पाहिजेत, किती खर्च येअील, किती नफा किंवा नुकसान होअील आणि त्या कामाचा अितर कामाशीं कोठे कोठें कसा संबंध बांधला जाअील याची बरोबर अटकळ असणारे लोक समाजांत किती असतील ? ज्यांना शंभरापर्यंत विनचूक मोजतां येत नाही असे प्रौढ वयाचे अथवा म्हातारे लोक पाहून समाजशिक्षणाचा भार वहाणाऱ्या लोकांनी आजवर केलेला महान् प्रजाद्रोह असह्य वाटूं लागतो. लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांना दोन मार्गांनी प्रतिष्ठित व संपन्न होतां येतें. आपलें ज्ञान आपल्याकडेच ठेवून, सामान्य जनतेला अज्ञानांत खितपत ठेवून त्यांच्या अज्ञानाचा व दुर्दशेचा सर्व बाजूंनी फायदा घणें आणि त्यांना सहजासहजी लुटून खाणें हा अेक मार्ग आहे. दुसरा मार्ग म्हणजे जनसमुदायाची ज्ञानाच्या बाबतींत, कर्तबगारीच्या बाबतींत सर्व प्रकारें पातळी (लेव्हल) वाढविणें, त्यांना सामर्थ्यसंपन्न करणें व अशा संपन्न लोकांचा पुढाकार घेअून त्यांची सेवा करतां करतां स्वतःची बहुविध अुन्नति साधणें हा होय. पहिला मार्ग नामर्दांचा व नास्तिकांचा आहे. दुर्दैवाने तोच मार्ग आपल्या लोकांना अधिक पटलेला दिसतो.

आज प्रजाकीय शक्ति जागृत करावयाची असेल, लोकांची दृष्टि निर्मळ व डोळस करावयाची असेल, तर यच्चयावत् लोकांना गणितामध्ये प्रवीण केलें पाहिजे. गणितावांचून कौशल्य, कर्तबगारी व काटकसर हीं वाढावयाचीं नाहीत. आळस, दैववाद व वृत्तीचें म्हातार-

पण हीं जाणार नाहीत. व्यवहार्य गणित आणि जमाखर्चाची माहिती हा खरोखर राष्ट्रीय महत्त्वाचा विषय आहे. याच्या योगाने श्रमजीवी प्रजेचें सामर्थ्य वाढणार आहे. सुधारलेलीं हत्यारें अवजारें वापरणें, नवीन नवीन शोध लावणें, लहानमोठे कारखाने चालविणें, या सर्वांसाठीं सूक्ष्म गणिताची माहिती व सराव आवश्यक आहे. जरा कांही खुबीची वस्तु पाहिली म्हणजे 'आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं' अशी आपल्या लोकांची स्थिति होऊन जाते. पण आंत खुबी खरोखर आहे काय, हें ओळखण्याचा पुरुषार्थ फारच थोड्यांत दिसून येतो. प्रजेमधील ती बाजूच आपण अर्धांगपीडित होऊं दिली आहे. 'श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।' निरीक्षण करणें, परीक्षण करणें, प्रयोग करणें, अनुभव टिपून ठेवणें, दरेक वस्तूचें मोजमाप करणें, साधर्म्य वैधर्म्य तपासणें, कार्यकारणसंबंध नक्की करणें आणि सर्व जीवनांतून अनुमानधबक्याला फांटा देणें हें प्रजाकीय शिक्षणाचें सर्वांत महत्त्वाचें काम आहे. गणित आणि कौशल्य यांच्या पायावरच हें होणें शक्य आहे.

# १९

# खेडेगांवांच्या पुनरुज्जीवनाचे मुद्दे

## १. दारिद्र्य

कारणें: —

१. भांडवल आणि मशागत यांच्या अभावीं शेतीची अुपज अगदी निकृष्ट होणें.

(सा) वाअीट आअूतें.

(री) गुराढोरांची दुर्बलता.

(ग) अपुरें खत.

(म) बियांची अुत्तम निवड न करणें.

(प) वर्षानुवर्ष तेंच तें पीक घेणें.

(ध) पाण्याचा मुबलक पुरवठा नसल्यामुळे आलटून पालटून पिकें घेण्याकडे दुर्लक्ष.

(नी) हातांत पैसा नसल्याने व कर्जाअू पैसे काढण्याची बरोबर सोय नसल्याने शेतीच्या महत्त्वाच्या क्रिया वेळच्यावेळीं करितां न येणें.

२. प्राप्ति होण्याचा संभवच नाही अशीं लहान लहान शेतें. प्राप्ति होण्याजोग्या शेताची व्याख्या :—सामान्य कुटुंबाचा चरितार्थ चालेल आणि बैलाच्या अेका जोडीला वर्षभर पुरेसें काम मिळेल अेवढें जें शेत तें प्राप्तीलायक शेत (अिकानामिक होल्डिंग) असें म्हणावें.

३. कौटुंबिक वाटणीमुळे अथवा अशाच दुसऱ्या कारणांमुळे शेताचे तुकडे पडणें.

असे तुकडे पडल्याने वेळेचा दुर्व्यय होतो, आणि फुटक्या भांड्यांतून ज्याप्रमाणे पाणी गळून जातें त्याप्रमाणें बरीचशी मजुरी फुकट जाते.

४. काळीचा (जमिनीचा) बराच मोठा भाग जातीने शेती न करणाऱ्या पांढरपेशांच्या ताब्यांत असणें.

अशा जमिनीकडे सामान्यतः दुर्लक्षच होतें. जमीन नांगरणाऱ्या शेतकऱ्याला स्वामित्वाच्या अभावीं कसून मशागत करण्याविषयीं अुत्साह बेताचाच असतो.

वर निर्दिष्ट केलेल्या कारणांमुळे शेतीचा खर्च वाढतो. त्यामुळे शेतीचा धंदा फायदेशीर पडत नाही.

याला अुपाय म्हणजे वरील कारणें दूर करणें हा होय.

## २. कर्जबाजारीपणा

शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा सामान्यपणे वाटतो त्याहून बराच अधिक आहे. हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांवर असलेलें कर्जाचें ओझें दोन हजार कोटीपर्यंत असावें असा अंदाज आहे. याचीं कारणें :—

(१) सामान्य कुटुंबांना जमाखर्चाच्या तोंडमिळवणीची कल्पना नसणें. अर्थात् खर्चाच्या मानाने अुत्पन्न पुरें पडत नाही.

(२) खेडेगांवांत चालणाऱ्या अुद्योगहुन्नरांचा नाश. यामुळे —

(सा) वर्षांतून चार पांच महिने सक्तीची बेकारी सहन करावी लागते. याचा अर्थ असा नव्हे कीं, चार पांच महिने मुळीच काम नसतें. पण सात महिन्यांत होणारें काम रेंगाळत रेंगाळत वर्षभर केलें जातें. बेकारीचे दिवस कमी-अधिक प्रमाणाने सबंध वर्षावर वांटले जातात. असें नसतें तर शेतकरी मजुरी (रोजगारा-)साठी चार पांच महिने कसब्यांतून आणि शहरांतून तरी जाअून आला असता. आजच्या परिस्थितींत शेतकऱ्याला पुरेसें कामहि नाही आणि शेती सोडून जाणेंहि शक्य नाही. अशी दुःस्थिति प्राप्त झाली आहे.

(री) अंगभर काम नसल्याने शेतकरी शहरांतील आणि परदेशांतील भांडवलवाल्यांच्या आहारीं पडतो. तो त्यांचा नेहमी ओशाळलेला असल्याकारणाने ते लादतील त्या शर्ती त्याला स्वीकाराव्या लागतात व अशा रीतीने तो त्यांच्याकडून पिळला जातो.

(ग) बेकारांची संख्या वाढली म्हणजे खाणाऱ्या तोंडांचें ओझें जमिनीवर पडतें.

(३) सरकारी करांचें प्रमाण बेसुमार आहे आणि कर वसूल करण्याची पद्धत कडक आणि निर्दय आहे. शेतीचें पीक शेतकऱ्याच्या घरीं येअून पडण्यापूर्वीच सारावसुलीची तारीख नेमण्यांत येते.

(४) तंबाखू, गांजा, अफू, ताडी, माडी, दारू वगैरे व्यसनें.

(५) कोर्टबाजी.

(६) सावकाराकडून घेतला जाणारा व्याजाचा जबरदस्त दर आणि लबाडीचा व्यवहार. या व्याजाच्या जबरदस्त दराचीं कारणें तीन :—

(सा) व्याजीं लाविलेले पैसे बुडण्याची भीति.

(री) खेडेगांवांतील बरेंचसें भांडवल शहरांकडे वाहून गेलेलें आहे.

(ग) हिंदुस्थानच्या संपत्तीला स्राव (ड्रेन) लागला आहे. या बाबतींत खालील गोष्टींचा अूहापोह होणें जरूरीचें आहे:—

१. शेतकऱ्यांचा बचाव म्हणून सरकारनें जे शेतसाऱ्याचे कायदे केले ते सर्व निष्फळ गेले आहेत. अेवढेंच नव्हे तर, या कायद्यांच्या योगाने शेतकऱ्यांची स्थिति अुलट हलाखीची झाली आहे.

२. सरकारकडून शेतकऱ्यांना देण्यांत येणारें तगाअी-कर्ज.

३. सहकारी पतपेढयांचा कारभार आणि त्यापासून होणारे परिणाम.

४. अब्रूदार आणि प्रामाणिक सावकारांचा खेडयांत अुत्तरोत्तर अभाव. चांगले सावकार खेडीं सोडून शहराकडे गेले आहेत. किंवा खरा सावकारधर्म सोडून पैसे अुकळणारे व्याजखोर झाले आहेत.

(७) पैशाच्या बाबतींत कुटुंबाला पेंचांत आणणारे सामाजिक रिवाज.

हुंडा व इतर लग्नखर्च, मरणोत्तर भोजनें, बायको विकत घेणें वगैरे बाबतींत होणारा खर्च, कुटुंबाच्या जुन्या किंवा काल्पनिक प्रतिष्ठेच्या धोरणानें केला जातो आणि आजच्या आर्थिक स्थितीला मुळीच झेपत नाही. या कारणानें किती तरी कुटुंबें कर्ज-बाजारी होअून धुळीस मिळालीं आहेत.

(८) हिंवताप (मलेरिया) आणि अशाच इतर रोगांना दरवर्षी कुटुंबांतून बरींच माणसें बळी पडतात, आणि या संख्यच्या दसपट लोक जरी प्रत्यक्ष मरून न गेले तरी शेतीच्या कामीं कुचकामाचे होतात.

अिलाज :—

१. शेतीची सुधारणा.

२. खेडेगांवांतील अुद्योगधंद्याचें पुनरुज्जीवन.

३. शेतकऱ्याला त्याच्या परिस्थितीचें आणि विशेषतः आर्थिक स्थितीचें आकडयांच्या पुराव्यानिशी यथार्थ ज्ञान करून देणें.

सामान्यपणें वर सांगितलेलीं कारणें दूर करणें.

४. याच पोटीं शेतकऱ्यांवर असलेला आजचा कर्जाचा बोजा सूट देअून आणि हप्तेबंदी करून देअून दूर केला पाहिजे.

५. शेती न करणाऱ्या पांढरपेशा खातेदारांचा आणि जमीन-दारांचा जमिनीवर हक्क खरोखर कितपत पोहोंचतो याचा तपास होअून या मालकीहक्काला बराचसा आळा बसला पाहिजे.

जमिनीच्या मालकीहक्काबरोबर योग्य जवाबदारीहि लावून दिली पाहिजे.

## ३. खेडेगांवांतील अुद्योगधंदे

(१) खादी : सक्तीची बेकारी दूर करण्याचा सार्वभौम आणि रामबाण अिलाज.

(२) गुराढोरांची जोपासना आणि संवर्धन : शेतकऱ्यांनी हा धंदा जवळजवळ सोडूनच दिला आहे. म्हशी बाळगण्याचा रिवाज वाढ-ल्यामुळे दूध तूप मिळतें खरें, पण जमिनीची मशागत करण्यास लागणारे बैल मात्र घरीं तयार होत नाहीत आणि रेडयांचा फारसा अुपयोग नसल्याकारणाने प्रथमपासून त्यांच्याकडे दुर्लक्ष होतें आणि ते लहान-पणींच मरतात. म्हशींच्या अैवजी चांगल्या गाअी बाळगल्यास घरीं दूध

तूप होऊन घरच्या घरीं बैलहि होतील. आजकाल बैल अधिकाधिक महाग होऊं लागले आहेत आणि चांगले बैल विकत घेणें हें सामान्य शेतकऱ्याच्या ऐपतीबाहेरचें झालें आहे.

(३) कुंभाराचा धंदा: टिनचे पत्रे परदेशांतून येऊं लागल्यामुळें घराचीं छपरें आणि घरांत माल सांठवून ठेवण्याचीं साधनें अशा पत्र्यांचींच होऊं लागलीं आहेत. परिणामीं, कुंभाराचा धंदा बसला आणि त्यांना आजीविकेसाठी प्रत्यक्ष शेतींत पडावें लागलें. अशा रीतीनें जमिनीवरचा बोजा वाढला आहे.

(४) कातडीं कमावण्याचा धंदा: या धंद्यांत पुष्कळ सुधारणा होणें आवश्यक आहे. अशी सुधारणा झाली म्हणजे खेडेगांवांतील चांभाराचें जीवन सुधारेल, गौरक्षेला मदत होईल आणि त्याचा फायदा शेतकऱ्यालाहि मिळेल.

(५) कापसांतील सरकी काढणें आणि तेली बियांतून तेल काढणें: गिरण्या स्थापन झाल्यापासून खेडेगांवांतील हे दोन्ही धंदे बुडाले आहेत.

दरेक शेतकऱ्यानें तेलाचा घाणा घरीं चालू ठेवणें शक्य नसल्यास निदान दोघाचौघां शेतकऱ्यांनी मिळून समाईक घाणा ठेवावा, व दरेकानें आपल्या घरच्या बैलामार्फत किंवा रेडयामार्फत तो चालवून घरच्या तेली बियांचें तेल व पेंड घरींच तयार करावींत. घरीं वापरून उरेल तो माल विकावा. या रीतीनें हें काम गिरणीहून स्वस्त पडेल. कारण सर्वच घरचें: कच्चा माल, साधनें, मजुरी, देखरेख.

(६) दळणकांडण: तांदूळ कांडण्याच्या आणि पीठ दळण्याच्या गिरण्या आल्यानें दळणकांडण करणाऱ्या बायाबापडयांच्या तोंडचा घांस काढून घेतला गेला आहे व या धंद्याऐवजी या अनाथ विधवांना दुसरा कोणताच धंदा न मिळाल्यानें त्यांना मृत्यूची वाट दाखविल्यासारखें झालें आहे.

(७) शेती व वाहतुक: पाणी काढण्याचे पंप, जमीन नांगरण्याचे ट्रॅक्टर्स, आणि मोटारचे खटारे यांच्या योगाने खेडेगांवांतील वहातुकीचा धंदा बुडाला व त्यामुळे शेतीसाठीं बाळगलेल्या बैलांचा रिकाम्या दिवसांचा खर्च देखील शेतीवरच पडूं लागला आहे. शेतीमध्ये मजुरी करणारे शेतकरी व बैल या दोघांवर सक्तीची बेकारी येअून पडल्यामुळे शेतकीच्या धंद्यांत किफायत मुळीच न राहून तो अुलट आंतबट्टयाचा धंदा झाला आहे.

तसेंच कोंवडया, वदकें वगैरे पाळणें, मधमाशा पाळून कृत्रिम पोळ्यांतून मध तयार करणें, वांबूकाम, वेतकाम, रेशमाची पैदास, कशिद्याचें काम, जरीचें काम, अित्यादि झोपडींत चालण्याजोग्या कितीतरी धंद्यांचा विचार करितां येईल.

## ४. स्वच्छता आणि आरोग्य

(१) घरच्या विहिरी आणि तलाव वगैरेंच्या आसपासची घाण व चिखल दूर करणें.

अुघड्यावर शौचास जाणें आणि मळ मातीने झांकून न टाकतां हवा आणि पाणी दोन्ही विघडविण्यासाठी त्याला तसाच अुघडा राहूं देणें ही आजची स्थिति आहे. या स्थितींत योग्य सुधारणा केल्यास स्वच्छता आणि आरोग्य दोन्हीं सुधारतील व अत्यंत किंमती असें खत मिळेल.

(२) दिव्यासाठीं रॉकेलच्या भुसभुशा चिमण्या वापरणें. याच्या योगानें तेलाचा अतोनात खर्च होतो, कपडे बिघडतात, धूर पोटांत जाअून आरोग्य बिघडतें आणि केव्हा केव्हा आगीहि लागतात आणि सर्वांत मोठें नुकसान म्हणजे डोळे बिघडतात. आजवर कोणी याकडे लक्ष दिलें नाही. अुलट लोक म्हणतात की, आजवर कोणाचें नुकसान झालें नाही तें आतांच कां होअूं लागलें?

(३) घरांतून स्वच्छ हवा, पाणी आणि मुबलक प्रकाश खेळता रहाण्याची कांहीच व्यवस्था नसणें. यामुळे प्रजा दिवसेंदिवस क्षीण-सत्त्व होअू लागली आहे. फुप्फुसें कमजोर होअू लागलीं आहेत. कोठे कोठे तर असल्या कोंडमाऱ्याच्या घरांत माणसें आणि गुरें अेकत्रच निजतात.

(४) खेडेगांवांत ठिकठिकाणीं डबकीं साचलीं असून त्यामुळे डासांचा आणि हिंवतापाचा अुपद्रव वाढला आहे. अशीं डबकीं भरून काढलीं पाहिजेत. तात्पुरता अिलाज म्हणजे डबक्यांतील पाण्यावर मुबलक रॉकेल ओतणें हा आहे. सांठलेल्या पाण्यावर डासांचीं अंडीं असतात. रॉकेलने तो अुपद्रव टळतो.

(५) हातापायांत, गळयांत आणि नाकाकानांत नेहमी दागिने राहूं दिल्याने तेथे मळ सांचतो व घाणेरडेपणाच्या संवयी लागतात.

(६) अंथरुण-पांघरुण, घरेंदारें स्वच्छ न ठेविणें; शरीरस्वच्छते-कडे देखील दुर्लक्ष करणें.

यापुढील हिन्दुस्थानची जी कांही राज्यव्यवस्था होईल तीमध्ये ग्राम हेंच राज्यव्यवस्थेचें मूलघटक म्हणून धरलें गेलें पाहिजे आणि ग्रामाला आपला कारभार आपणच चालविण्याची मोकळीक दिली पाहिजे. प्रांतरचना भाषावार झालीच पाहिजे. आज जिल्हे आणि तालुके हे कसे तरी बनविले गेले आहेत; त्यांच्या घटनेच्या मुळाशी कांहीच तत्त्व नाही. यापुढें प्रांतांचे विभाग भूमीच्या आणि हवापाण्या-च्या सारखेपणावर पाडले गेले पाहिजेत. हे प्रादेशिक विभाग आपल्या खर्चासाठी आपल्या अुत्पन्नापैकीं ७५ टक्के ठेवून घेतील आणि प्रांतीय सरकारला २५ टक्के म्हणजे रुपयांत चार आणे देतील. या प्रादेशिक विभागांचें व्यवस्थातंत्र कसें असावें व त्यांचीं कार्यें कोणकोणतीं असावींत याची चर्चा येथे कर्तव्य नाही. फक्त ग्रामपंचायतीचें कार्य येथे देण्यांत येत आहे.

(१) न्यायखातें पंचायतीला सोंपवून देण्यांत यावें. गुंतागुंतीच्या खटल्यांत विभागीय सरकाराची मदत घेण्यास हरकत नाही. पण सामान्यपणे खेडेगांवांतील सर्व मुलकी न्यायावर पंचायतीचा संपूर्ण तावा असावा. फौजदारी खटले चालविण्यासाठी खास मॅजिस्ट्रेट नेमावयास हरकत नाही, पण त्यांनी देखील ग्रामपंचायतीची मदत घेतली पाहिजे.

(२) खेडेगांवांतील चौकीपहारा आणि पोलिसांचा बंदोबस्त ग्रामपंचायतीच्या ताब्यांतच असावा.

(३) खेडेगांवांतील मुलांमुलींच्या शाळा पंचायतीच्या ताब्यांत असाव्यात. दरेक शाळेला जोडून आखाडा असलाच पाहिजे.

साक्षरता आणि संस्कारिता यांचा लोकांत प्रसार झाला पाहिजे. आजकाल असें दिसून येतें की, ज्या मानाने अक्षरज्ञान वाढतें त्या मानाने संस्कारिता अुलटी संकुचित होते. तसें न होतां लोकशिक्षण अर्थात् संस्कारिता खूप विशाल आणि व्यापक झाली पाहिजे.

## संकीर्ण प्रश्न

(१) अस्पृश्यतानिवारण.

(२) स्त्रियांचा दर्जा वाढविणें.

(३) शेतकी-मजुरांची स्थिति. आज जवळजवळ आश्रिता-सारखी—अर्धगुलामा (सर्फ) सारखी-आहे ती बदलून त्यांना आर्थिक व सामाजिक सामर्थ्य मिळवून दिलें पाहिजे.

(४) बालविवाह.

(५) धर्मसंस्करण — भ्रामक समजुती आणि धर्मांधता अित्यादि धर्मवेडें दूर करून धार्मिक आदर्श, धार्मिक संस्था, संस्कार व रिवाज यांचें संस्करण म्हणजे पवित्रीकरण झालें पाहिजे.

२०

# महाभारताचा आस्वाद

महाभारत जसजसें वाचावें तसतसा त्याच्या संबंधींचा आदर वाढतच जातो. 'प्रतिपर्वं रसावहम्' हें वर्णन अगदीच सामान्य वाटतें. भारताला जर अेकच विशेषण द्यावयाचें असेल तर 'आर्यभव्य' हेंच विशेषण त्याला शोभेल. रामायण वीणा-मधुर आहे. महाभारत मेघ-गंभीर आहे. भारताने मनुष्यस्वभावाचा ठाव पाहिला आहे. चरित्र-चित्रणामध्यें भारतकाराचें सर्व वैभव धृतराष्ट्राला हुबेहुब रंगविण्यांत खर्च झालें आहे. हा आंधळा राजा कांही करीत नाही. हा सर्व कांही आणि सर्वांचें केवळ अैकतो, तरीहि प्रथमपासून शेवटपर्यंत—अगदी शेवटपर्यंत—याला आपल्या नजरेसमोरून दूर करणें शक्य नाही. पावलोंपावलीं ज्या दैवाची महती तो गात असतो त्या दैवाची प्रत्यक्ष मूर्तिच असा हा राजा आहे. सर्व जाणून अुमजून दैव जसें आंधळें असतें, तसाच धृतराष्ट्र आहे. भीष्म, विदुर आणि संजय यांसारखे धर्मज्ञ सल्लागार त्याच्या आसपास आहेत; गांधारीसारखी धर्मनिष्ठ पतिव्रता ही त्याची कानअुघाडणी करते; श्रीकृष्ण हा प्रत्यक्ष परमात्मा आहे हेंहि त्याला ठाऊक आहे; तरी पण या आंधळयाने डोळसपणा धरण्याचें साफ नाकारलें आहे.

शेक्स्पियरचा जसा हॅम्लेट तसा हा क्षीणसंकल्प धृतराष्ट्र 'आपल्या कडून कांही करावयाचेंच नाही, आपोआप जें होणार असेल तें होवो' अशा वृत्तीने राहतो. चेतनवान (चेतनाधारी) असूनहि 'जडवल्लोक आचरेत्' या सूत्राचें त्याने विकृत पालन केलें आहे. सर्व दोष दुर्योधनावर लादीत असूनहि याचा अधिकाधिक पाठिंबा दुर्योधनालाच. प्रसंगवशात् हा विदुराला दूर करील, पण दुर्योधनावर अंकुश चालविणार नाही. द्यूतामध्ये शकुनी जसजसा जिंकू लागला

तसतशा या म्हाताऱ्याला आनंदाच्या अुकळया फुटूं लागल्या. 'कोणी जिंकलें? काय जिंकलें? पण काय होता?' असें मोठया आतुरतेने तो विचारीत असे. यांतच म्हाताऱ्याचा मूळ स्वभाव दिसून येतो. भारतीय युद्धाच्या अंतीं या कौरव राजाने लोहभीमाचें पिष्ट केलें यांतहि हाच स्वभाव शेवटपर्यंत पोहोंचल्याचा पुरावा आहे. धृतराष्ट्र हें असमर्थ मनोवृत्तीचें अतिसमर्थ चित्र आहे.

*　　　*　　　*

दरेक नाटकांत आणि कथेंत नायक अुपनायक असतात. साहित्य-शास्त्रामध्ये यांचा स्वभाव कसा असला पाहिजे याविषयीं मर्यादा बांधल्या आहेत. पण केव्हा केव्हा कथानकामध्ये नायकाखेरीज अेक मंगलमूर्ति असें पात्र असावें लागतें. व्हिक्टर ह्यूगोच्या 'ले मिझरेबल' या कादंबरींत 'बिशप ऑफ डी' हें एक असें मंगलमूर्ति पात्र आहे. दीर्घ आणि विपुल अशा कथानकामध्ये बिशपचा संबंध फारच थोडा येतो. पण त्याची मंगल छाया शेवटपर्यंत पोहोंचलेली दिसते आणि कथानकांतील कोणतेंहि पात्र बिशपहून श्रेष्ठ होअूं शकत नाही.

रवींद्रनाथ ठाकुर यांच्या 'घरे बाहिरे' मध्यें नायक आणि खल-नायक निखिल संदीप आहेत. पण मंगलमूर्ति, निखिलचा अध्यापक 'नत नयने अनिमेषे' त्याची चिंता वाहणारा, चंद्रशेखर आहे.

महाभारतामध्ये मंगलमूर्ति तीन: भीष्म, कृष्ण आणि व्यास. या त्रिमूर्तींमध्येहि प्रधान स्थान भीष्मालाच दिलें पाहिजे. कृष्णाची विभूति बोलून चालून दिव्य असल्याने भव्य ठरूं शकत नाही. व्यास एखाद्या वानप्रस्थाप्रमाणे दूरदूरच रहातात. सबंध महाभारतावर आपली मंगल छाया पसरविणारा धर्मात्मा भीष्मच आहे. तो सागरा-प्रमाणे गंभीर, हिमालयाप्रमाणे प्रचंड आणि अनंत आकाशाप्रमाणे शांत, निर्मल आहे.

भीष्म हा कृष्णाच्या अुत्तम भक्तांपैकी एक आहे. 'प्रल्हाद-नारद-पराशर-पुंडरीक-व्यासांबरीष-शुक-शौनक-भीष्म-दाल्भ्यान्। रुक्मांगदार्जुन-

वसिष्ठ-विभीषणादीन्। पुण्यान् अिमान् परमभागवतान् स्मरामि॥'
असें ज्यांचें आपण रोज सकाळीं अुठून स्मरण करितों त्या परमभागवतांमध्येहि भीष्माचार्यांचें स्थान न्यारेंच आहे. बाकीचे भागवत भगवंताला अधीन होऊन त्याच्या प्रेरणेनुरूप वागतात. भीष्मांच्या वाट्याला आपल्या या परमप्रभूचा अखंड विरोध करण्याचेंच आलें होतें आणि अितकें असूनहि त्यांची भक्ति विरोधी नव्हती.

भीष्म आणि कृष्ण या दोघांचा राष्ट्रपुरुष म्हणून विचार केला तरी त्यांच्यामध्यें आत्यंतिक स्वभावभेद दिसतो. दोघेहि धर्मनिष्ठ, धर्मपरायण, आणि धर्मकार; परंतु दोघांचें जीवन-तत्त्वज्ञान अगदी निराळें! भीष्मांचें जीवनतत्त्व बरेंचसें प्रभु रामचंद्रांसारखें आहे. दोघेहि मर्यादापुरुषोत्तम, स्वतःला धर्मपरतंत्र मानणारे आणि धर्मपालनार्थ कोणताहि त्याग शीतलवृत्तीनें करणारे. मनुष्यजातीला धडा घालून द्यावा तर यांनीच! अुलटपक्षी श्रीकृष्ण जसे प्रतिष्ठाभंजक तसे मर्यादाभंजकहि खरेच. धर्ममार्गांतील प्रत्येक नियमाला अपवाद कसे असूं शकतात, हें दाखविण्यासाठीच जणूं काय त्यांचा अवतार! बंकिमचंद्रानें कृष्णाचें चरित्र लिहिलें आहे. चरित्र कसचें? कृष्णावर येणाऱ्या आरोपमालेचें अेक मोठें खंडनच तें! न्यायनिपुणांनी स्वतःचें बुद्धिसर्वस्व खर्चून बचाव केल्यावांचून श्रीकृष्णाच्या अेकाहि कृत्याची योग्यता समजावयाची नाही. गांधींनी ज्याप्रमाणें गाअीचें बासरूं मारून अहिंसा-धर्माचें पालन केलें, त्याप्रमाणेंच श्रीकृष्णांनी प्रत्येक वेळीं धर्माचें पालन केलें असावें असा भास होतो. धर्माच्या सिद्धांताच्या मुळाशी जाअून तत्त्वार्थाच्या पालनार्थ शब्दार्थाच्या विरुद्ध कसें जावें लागतें याचाच श्रीकृष्णांनी अभ्यास केलेला असावा.

भीष्माचार्यांनी अैन तरुणपणीं अेक भीष्मप्रतिज्ञा केली आणि राज्य व स्त्री यांचा त्याग केला. ही अेक प्रतिज्ञा पाळण्यासाठी त्यांनी सर्व बाजूंनी हानि होअूं दिली. प्रतिज्ञेचें प्रयोजन संपल्यानंतरहि त्यांनी प्रतिज्ञा कशी ती सोडलीच नाही. आणि त्यांचें नशीबहि कसें विलक्षण!

त्यांनी राज्याचा स्वीकार केला नाही तरी राज्याचा भार त्यांनाच वहन करावा लागला. भाअूबंदकीचा तंटा नको म्हणून स्वतः लग्न करण्याचें त्यांनी नाकारलें पण त्यांना किती तरी लग्नें आणि नियोग घडवून आणावे लागले! फार काय सांगावें? त्यांनी स्वयं-वरांत भाग घेअून तरण्याबांड मुलीहि जिंकून आणिल्या, आणि जी भाअूबंदकी टाळण्यासाठी त्यांनी आजन्म ब्रह्मचर्य स्वीकारलें त्याच भाअूबंदकीच्या पायीं अिच्छेविरुद्ध असत्पक्षाच्या वतीने लढून लाखों लोकांचा संहार करून स्वतःचे प्राण त्यांना खर्ची घालावे लागले. भीष्मप्रतिज्ञा ही जगाला आदर्शभूत आहे. भीष्माचें ब्रह्मचर्यहि तसेंच अलौकिक! या ब्रह्मचर्याच्या जोरावर ते परमज्ञानी, परमसमर्थ आणि धर्मज्ञ झाले अेवढेंच नव्हे तर अिच्छामरणीसुद्धा झाले. पण त्यांच्या त्या प्रतिज्ञेने कौरवकुलाचा किंवा आर्यसंस्कृतीचा लाभ असा कोणता झाला? निदान आपण सत्यासाठी लढलों असें तरी समाधान त्यांस मिळावयास पाहिजे होतें. राज्यावरचा हक्क सोडल्यानंतर ते राजाचे सेवक झाले. त्यांची निष्ठा राजगादीला वाहिली गेली. आपण जें खातों तें या गादीचें अन्न खातों, गादीची जी आज्ञा होअील ती शिरसावंद्य मानलीच पाहिजे, अशी सनदशीर वृत्ति धारण केली. भीष्मासारखा तन्त्रवादी (कॉन्स्टिटयूशनॅलिस्ट) क्वचितच दुसरा असेल. पण तंत्रालाच देव समजून वागल्याने त्यांनी राष्ट्रहिताचें मात्र मातेरें केलें.

अुलटपक्षी, श्रीकृष्णांनी दरेक प्रसंगी वंडखोरपणाच कायम ठेविला. ज्या ज्या प्रसंगीं त्यांची सर्वज्ञता व त्यांची धर्मवृत्ति जें कांही योग्य म्हणून ठरवील त्याचेंच निशंकपणे पालन करावयाचें, हा श्रीकृष्णांचा मार्ग. त्या मार्गाने पांडवांचें रक्षण झालें, त्यांना विजय मिळाला हें खरें; पण हा विजय पिर्‍हसच्या विजयासारखा गळ्यांत आला. धर्मराजाला शेवटीं अश्रुपूर्ण नयनाने म्हणावें लागलें:

जयोऽपि अजयाकारो भगवन् प्रतिभाति मे।

राष्ट्रांतील क्षात्रकुलाचा ऱ्हास झाला. अर्जुनाला वाटलेली भीति खरी ठरली. सांबासारखे राजपुत्र नाच्या पोऱ्याचें काम करूं लागले. कश्यपासारखे वैद्यविशारद ब्राह्मणहि तक्षकाकडून लांच खाऊन राजसेवा सोडून परतले. क्षत्रिय राजे ब्राह्मणांच्या गळयांत सर्प घालूं लागले. अशी सर्व बेबंदशाही माजली.

आणि श्रीकृष्णाच्या घरीं? तेथे तर सुरामत्त कलह चालून महान् कुलक्षय झाला. श्रीकृष्णाने धर्माची स्थापना केली यांत शंका नाही. कारण त्याने अर्जुन-गीता, उद्धवगीता, अनुगीता यांसारखा सर्वोच्च धर्मोपदेश जगाला केला. पण श्रीकृष्णाच्या काळांत किंवा त्यानंतरच्या हजार वर्षांत कृष्णधर्माचा प्रचार किंवा त्यापासून होणारी मनुष्यसमाजाची भरभराट यांचा मात्र मागमूस नाही. राजसूय यज्ञ करून धर्मराजाने राजकुळाचा नायनाटच केला म्हणावयाचा.

पण भीष्माचा मार्ग आणि कृष्णाचा मार्ग दोहोंची परीक्षा तात्कालिक परिणामाच्या दृष्टीने करणेंच चुकीचें होईल. श्रीकृष्ण निधनानंतर जर धृतराष्ट्र जिवंत असता तर त्याने खात्रीने म्हटलें असतें कीं, 'काल हाच बलवान आहे, त्याचें अिच्छित अन्यथा करण्याचें सामर्थ्य कोणासच नाही.'

गीताधर्माप्रमाणे यथायोग्य चालून नम्रपणे कर्तव्य करणारा आणि मानवी प्राण्याला जेवढें समाधान मिळविणें शक्य आहे तेवढें मिळविणारा असा राष्ट्रपुरुष काय तो अेक युधिष्ठिर आहे. धर्म, अर्थ, काम मोक्ष या चतुर्वर्गाचा त्याच्या ठायीं योग्य मिलाफ झाला होता. अैहिक विजय, अैहिक सुख आणि अैहिक वैभव हीं सर्व बाहेरून आकर्षक आणि आंतून निःसार अशा कवंडाळाच्या फळांसारखीं असतात, हें समजून तो वागला आहे. 'धर्मो रक्षति रक्षितः' हें त्याचें ब्रीदवाक्य. धर्ममार्गावर जेवढी श्रद्धा युधिष्ठिराची होती तेवढी कोणाचीच दिसून येत नाही. धर्ममार्ग आपणांस कोठेहि नेवो, निःशंकपणे तेथे जावयाचें आणि धर्माच्या हातीं आपण केव्हांहि सुरक्षित आहोंत अशी श्रद्धा कायम ठेवावयाची, या वृत्तीने धर्मराजाचें जीवन सर्व बाजूंनी सफलच झालें आहे.

धर्माचा थोरला भाऊ कर्ण. विचाऱ्याला जन्मापासून आर्य आणि शुभ असे संस्कार मिळालेच नाहीत. कर्ण निष्ठेचा धड, हृदयाचा अुदार, रणांत शूर आणि आदर्श दाता असा होता. पण हीनत्वभाव (अिन्फिरिऑरिटी कॉम्प्लेक्स) त्याच्या हाडींमासीं खिळलेला होता. कांही गोष्टी ज्या दुर्योधनाला समजत नसत त्या त्याला समजत होत्या. तरीहि त्यां त्याने दुर्योधनापुढे स्पष्टपणे मांडल्या नाहीत. मित्रनिष्ठा म्हणजे कांही अनुयायित्व नव्हे, छंदानुवर्तितत्वहि नव्हे. कर्णाने निष्ठेचा अतिरेक करून दुर्योधनाच्या सर्व हीन वृत्तींना अुत्तेजनच दिलें. त्या-मुळे कर्णासारख्या अनन्य मित्रनिष्ठेची प्रतिनिष्ठा म्हणून दुर्योधनाला आपल्या अधर्म्य मार्गांत अधिकाधिक दृढ व्हावें लागलें !

कर्णाचा सर्वांत मोठा दोष म्हणजे त्याचा अभिमान व त्याचें अहंप्रेम. त्याच्याजवळ हिशोब असा तो कसलाच नव्हता. प्रत्यक्ष भारतीय युद्धापूर्वी अनेक वेळां पराभव पावून त्याने आणि दुर्योधनाने स्वपरबलाबलाचा अनुभव घेतला होता. पण तिकडे अखंड दुर्लक्ष करणें यांतच बहाद्दुरी आहे, असें कर्णास वाटत असलें पाहिजे. पांच पांड-वांनी मिळून जो दिग्विजय केला तो अेकट्या कर्णानें करून दाखवून दुर्योधनाहातीं त्यानें वैष्णवयाग करविला आणि अशा रीतीने घोषयात्रेमुळे दुर्योधन आत्मविश्वास गमावून बसला होता त्याला याने पाणी चढविलें. परशुरामापासून अस्त्रें मिळविणें किंवा अिंद्रास कुंडलें देणें या कृत्यांपेक्षा देखील कर्णाच्या त्या दिग्विजयाची किंमत अधिक होती. पण महा-भारतकारांनी त्याला फारसें महत्त्व दिलें नाही. कदाचित् पांडवांच्या दिग्विजयानंतर कर्ण गेल्यामुळे त्याला तो दिग्विजय जवळ जवळ फुकटांत पडल्यासारखा झाला असेल. हिताची गोष्ट अैकण्यांत धृतराष्ट्र, दुर्योधन आणि कर्ण या तिघांचे प्रकार तीन तऱ्हेचे. धृतराष्ट्राला जें सांगावें तें चटकन पटे पण त्याप्रमाणे वागण्याच्या नांवाने मात्र शून्य; पांडवगीतेंत दुर्योधनाच्या तोंडीं जो श्लोक घातलेला आहे तो खरोखर धृतराष्ट्राच्या स्वभावाचा द्योतक आहे.

जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः। जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः।
केनापि देवेन हृदि स्थितेन। यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि ।।

धृतराष्ट्राच्या वाट्याला देव आणि दैव यांच्यांत अेका मात्रेचा देखील फरक नव्हता.

दुर्योधन पक्षाभिमानी, स्वार्थी आणि दीर्घद्वेषी असल्याने त्याच्यांत अंतर्मुखता कशी ती नव्हतीच ! तो वारंवार अुसळे, वारंवार स्वतःच्या कृत्यांचें समर्थन करी, बोध करणाऱ्याच्या हेतूविषयींच शंका व्यक्त करी, आणि आपल्या निश्चयांत सर्वांना पुरून अुरे. तरी दुर्योधनाविषयीं अेका बाबतींत आदरच वाटतो की, तो अंतर्बाह्य सारखाच होता. तो स्वतःच्या मनोवृत्तींशी अिमानदारीने वागे. कर्णाविषयीं असें म्हणतां येत नाही. कित्येक गोष्टी कर्णाला अेका रीतीने समजत पण निष्ठेने वागण्याच्या आग्रहाला बळी पडून तो दुसरीच बाजू ग्रहण करी व मग मनापासून तीच धारण करून तिला चिकटून राही. या त्याच्या स्वभावामुळे त्या थोर पुरुषाविषयीं म्हणावें लागतें कीं, हा प्रथमपंक्तीचा पुरुष नव्हे. भीष्म आपला अभिप्राय अगदी प्रांजळपणे सांगत; तो त्यांचा अभिप्राय धर्मज्ञान आणि परिस्थितीचें संपूर्ण ज्ञान याला धरून असे. हा अभिप्राय अर्थात् दुर्योधन-पक्षाच्या विरुद्ध असे. पण जेव्हा प्रत्यक्ष लढण्याचा प्रसंग येअी तेव्हा शंभर टक्के निष्ठेने ते लढत. ही भीष्मांची कर्तव्यनिष्ठा आणि राजनिष्ठा कर्णासारख्या दुय्यम प्रतीच्या माणसास कशी समजावी ? अनुयायांमध्ये जी अेकनिष्ठेची मुसंडी असते तीच अेक त्याला अवगत; यामुळे त्याने भीष्माचार्यांना प्रत्यहीं अन्यायच केला आहे आणि त्याने दुर्योधनाचें मन भीष्मांविषयीं अत्यंत कलुषित करून टाकलें आहे. भीष्म मनापासून लढत नाहीत, त्यांच्या मनांत पक्षपात आहे, म्हणून ते अंग चोरतात असें दुर्योधनास वाटण्यास कर्णच कारण. भीष्मांच्या दहा दिवसांच्या युद्धांत शेवटीं शेवटीं त्या पितामहाला दुर्योधनाच्या तोंडून जीं टोंचून बोलणीं (अन्काअींडेस्ट कट्स) सहन करावीं लागलीं आणि ज्यांच्या

योगाने त्या वीराच्या डोळ्यांत आसवें आलीं त्याचें कारण कर्णच-स्वपरबलांविषयीं यथार्थ कल्पना नसणें आणि चिडीस पेटून रुसून बसणें, हे जर युद्धकलेच्या दृष्टीने मोठे दोष असले तर भीष्माचार्यांनी कर्णास अर्धरथी ठरविलें हें यथायोग्यच होतें.

रथीपणा हा केवळ शौर्यावर अवलंबून आहे असें म्हणतां यावयाचें नाही. 'युद्धे अपलायनम्' हा प्रत्येक क्षत्रियाचा स्वभावधर्म असला पाहिजे, हें जरी खरें असलें तरी कुशल योध्याला प्रसंगीं वळण घ्यावें लागतें, माघारहि घ्यावी लागते आणि पुढील धोरणाकडे नजर ठेवून पाठहि दाखवावी लागते. धर्मराजाने पुष्कळदां पाठ दाखविली आहे, दुर्योधनाने दाखविली आहे, मग कर्णानेहि दाखविली असल्यास आश्चर्य कसचें ? निष्प्रभ होणें, हतबल होणें आणि पाठ दाखविणें हें निराळें आणि शत्रूचें बळ अजमावून पहातां या क्षणीं आपला निभाव लागणार नाही असा अंदाज करून वेळ टाळणें हें निराळें; हें ज्याला समजत नाही आणि जो आंधळेपणाने मरण पत्करतो त्याला विरक्त म्हणतां येअील; कदाचित् तो मरण-परायण असेल; पण त्याने क्षात्रधर्माचा परम अुत्कर्ष दाखविला असें म्हणतां यावयाचें नाही.

भीष्माने कर्णास अर्धरथी म्हटलें तें मत्सराने किंवा द्वेषाने म्हटलें नाही, पण त्याचा पाणअुतारा हाच त्याच्या हृदयांत भिनलेल्या अभिमानविषाचा अुतार आहे असें समजून आणि दुर्योधनाने युद्धास चंग बांधतांना जो चुकीचा हिशोब करून ठेविला होता तो सुधारण्याच्या हेतूने. 'भीष्म जिवंत आहेत तोंवर मी युद्धांत भाग घेणार नाही' असें जाहीर करून कर्णाने क्षात्रधर्मास आणि मित्रनिष्ठेसहि हरताळ फांसला आणि युद्धांत भीष्म विजयी न होतां मारला जाणार आहे या कल्पनेला दृढ करून आरंभालाच अपशकुनी वातावरण अुत्पन्न केलें. मित्रनिष्ठ, दानप्रतिज्ञ आणि युद्धदुर्दम तनुत्यागी कर्ण शेवटीं अहंप्रेमीच होता असें त्याने तेथे सिद्ध केलें !

कर्णाचें वीर्य, त्याची मित्रनिष्ठा, जन्माच्या बाबतींत त्याला झालेला अन्याय या सर्व गोष्टींमुळे कर्णाविषयीं जनतेमध्ये स्वाभाविक सहानुभूति, कौतुक आणि पक्षपात आहे. या पक्षपातामुळे कर्णाच्या दोषांकडे लक्ष न जाऊन कर्णाला अुदार न्याय देअू जातां कृष्णार्जुनादि पांडवपक्षीयांना अन्याय होअू नये आणि भीष्माचार्यांचें मन कर्णाच्या बाबतींत कांहीसें प्रमाणाबाहेर कलुषित झालें होतें असा ग्रह बांधला जाअू नये म्हणूनच हें अेवढें विवेचन करणें आवश्यक वाटलें.

अेका रीतीने पाहतां भीष्म आणि कर्ण दोघेहि आपली बाजू असत्पक्षाची आहे ,आणि बलकौशल्याच्या दृष्टीनेहि लंगडी आहे हें जाणूनबुजून केवळ कर्तव्यनिष्टेने स्वतःच्या आर्यवृत्तीला जागून फलाविषयीं गीतोक्त संपूर्ण अुदासीनता बाळगून लढले आहेत. भारतवर्षावर राजेपणाचा खरा हक्क जसा भीष्माचा तसा तो कर्णाचाहि होता. भीष्माने सावत्र आओीच्या अुपेक्षेमुळे गादीचा हक्क सोडून दिला. भीष्माची पितृनिष्ठा आणि प्रतिज्ञानिष्ठा आणि कर्णाची मित्रनिष्ठा आणि पक्षनिष्ठा या दोन्ही आर्यसंस्कृतीचें मोठें धन आहेत.

कर्ण आणि भीष्म अेकमेकाला पाण्यांत पहातात असें वाटणें जरी स्वाभाविक आहे तरी थोर पुरुष अेकमेकांची थोरवी ओळखल्यावांचून रहात नाहीत हीच गोष्ट जगाच्या निदर्शनास आणण्यासाठी भीष्म पडल्यानंतर आणि अुभय पक्षांनी शोकानिमित्त युद्ध तहकूब ठेविल्यानंतर भारतकारांनी कर्णाला दुःखनम्र मनाने भीष्मांकडे अेकटा आणिला आहे. हा प्रसंग खरोखरीच अुदात्त-करुण आहे. हा म्हातारा पक्षपाती आहे, आपणा सर्वांना हा पाण्यांत पाहतो, असें नेहमी दुर्योधनाच्या मनांत भरवून देणारा कर्ण बाष्परुद्ध आवाजाने 'हा मी कर्ण आपल्या भेटीला आलों आहें, मजकडे दयेने पहा आणि दोन शब्द बोला,' अशी जेव्हा विनवणी करितो, तेव्हा खरोखरच कलियुगाचें भीषण बीजारोपण करणारा काल संपून प्रेमधर्माचें सिंचन करणारा आणि सत्ययुगाची आठवण करून देणारा काल आला आहे की काय

असा तेथे भास होतो. राजकारणी लोक प्रसंगविशेषीं मअू मनाचे होअून दाखवितात. मतलब जाअू न देतां अुदारता, आर्यता, आणि अंतर्मुखता-हि दाखवितात. पण हा प्रसंग अशा दंभी संस्कारितेचा मुळींच नाही.

'आदौ नम्राः पुनर्नम्राः कार्यकाले च निष्ठुराः । कार्यं कृत्वा पुनर्नम्राः' अशा बीभत्स मुत्सद्यांपैकी भीष्म किंवा कर्ण कोणीच नव्हते. कणिकनीतींत सांगितल्याप्रमाणे कार्यभाग साधल्यानंतर डोळे ओले करून दाखविण्याची धूर्तताहि या ठिकाणी नव्हती. अेक आर्य पुरुष दुसऱ्या आर्योत्तम आणि अर्हत् पदाला पोहोंचलेल्या पुरुषाला प्रणामांजलि देण्यासाठी आलेला आहे. भीष्मांनी सद्‌गदित अंतःकरणाने कर्णाला जवळ करून त्याच्याविषयीं स्वतःच्या मनांत किती आदर आहे तें बोलून दाखविलें. कर्णाचा नेहमी तेजोवध करण्यांत आपला काय हेतु होता हेंहि त्यांनी आतां सांगितलें; आणि जन्मभर ज्या शांतीसाठी जिवापाड मेहनत केली त्या शांतीची कर्णाकडे निर्मळपणे याचनाहि केली. कर्णानेहि तितक्याच मोकळ्या मनाने तसें कां करितां येत नाही याचीं आपलीं कारणें सांगून आपल्या निश्चयासाठी भीष्माचा आशीर्वाद याचिला. अुदार भीष्माने तो दिला आणि त्याला गौरवून अनासक्तपणाने लढण्याची आणि कौरवांचें पुढारीपण स्वीकारण्याची त्याला शिफारस केली. हिमालयासारखें अुत्तुंग आर्यत्व आणि महा-सागरासारखें गंभीर कारुण्य अेकाच वेळीं व्यक्त करणें दुसऱ्या कोणत्या प्रसंगीं शक्य आहे? युद्धाच्या वर्णनाप्रमाणे या प्रसंगाचें वर्णन न लांबवून भारतकाराने प्रसंगाचें पावित्र्य आणि वर्णनाचें औचित्य दोन्हीं सांभाळलीं आहेत. भारतवर्षासारख्या समृद्ध आणि सर्वसौंदर्यबहुल देशाचीच ज्याला अुपमा साजेल अशा महाभारत ग्रंथांत देखील असले देवदुर्मिळ प्रसंग किती असतील?

—o—

ग्रंथालय ठाणे
मराठी
अनुक्रम 7.4594
दिनांक 21.10

REFBK-0007762

## विवेक आणि साधना

लेखक : **केदारनाथ**

मानवी जीवन, त्याचें ध्येय, मानवतेचा विकास अित्यादि विषयांची विवेकाच्या कसोटीवर मीमांसा करून ग्रंथांत धर्म्य जीवन-व्यवहार कसा असावा याचेंहि थोडेसें दिग्दर्शन केलें आहे. शेवटच्या विभागांत चित्ताच्या अभ्यासाविषयीं मौलिक विचार मांडण्यांत आले आहेत.

ग्रंथास जोडलेल्या 'आत्मपरिचयां' त लेखकांनीं आपण प्रस्तुत विचारावर कशा रीतीनें आलों त्याचा स्वतःच्या अनुभवांच्या अनुषंगानें थोडक्यांत वृत्तान्त सांगितला आहे.

पृ. सं. ३६+३८८  कि. रु. ४-०-०  टपालखर्च ०-१२-०

## आश्रम-भजनावलि

संग्राहक : **नारायण मोरेश्वर खरे**

गांधीजींच्या प्रस्तावनेसहित

या भजनावलींत गांधीजींच्या सत्याग्रह आश्रमांतील सांज-सकाळच्या प्रार्थनेचा नित्यपाठ, अुपनिषदांतील निवडक मंत्र, संस्कृत स्तोत्रांतील वेंचे, साधुसंतांचीं हिन्दी, गुजराती, मराठी, बंगाली, अुर्दू व अिंग्रजी भजनें सर्वधर्म-समभावाच्या संप्रदायनिरपेक्ष दृष्टीनें संग्रहीत केलीं आहेत. संस्कृत श्लोकांचा हिन्दी अनुवाद व भजनांतील कठिण शब्दांचे हिन्दी अर्थ शेवटीं दिले आहेत.

प्रस्तुत आवृत्तीस श्री. काकासाहेब कालेलकर यांनीं प्रस्तावना लिहून 'भजनावलीचा विकास' निवेदन केला आहे.

आवृत्ति १६ वी  किंमत १० आणे
पृ. सं. २०,२३०  ट. ख. ३ आणे